# MODERN COLLEGE MAGAZINE



*With Best Compliments From*

# J. Sams & Co.

WE DEAL IN

SCIENTIFIC EQUIPMENT GLASS APPARATUS

AND

ALL VARIETIES OF LABORATORY EQUIPMENTS & CHEMICALS

**Kindly Visit Our Show Room at:**

680, Kanse Building, Near Gajalaxmi Lodge,
Deccan Gymkhana, POONA 4.

१९७१-७२

वर्ष दुसरे : अंक दुसरा

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य
महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५

संपादन
प्राचार्य मो. भा. लिमये, अध्यक्ष
डॉ. प्रा. भीमराव कुलकर्णी
प्रा. रा. गि. मिजार
डॉ. अ. के. पांडे

मुखपृष्ठ
मुकुंद कडुसकर, द्विववा

प्रकाशक
मो. भा. लिमये, प्राचार्य,
मॉडर्न कॉलेज, पुणे ५

मुद्रक
चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय,
'शिव-पार्वती', टिळक रस्ता, पुणे ३०

संपादक
डॉ. प्रा. भीमराव कुलकर्णी



# मॉडर्न महाविद्यालय

## नियतकालिक



## श्रेयनामावली

अनिल कुलकर्णी द्विवा ९ □ मुरलीधर एरंडे प्रवा १०, ५८ □ प्रदीप सिधये प्रवा ११ □ शाम वाघ प्रवा १३ □ हेरंब वेडेकर प्रवा १५ □ कु. हेमा अभ्यंकर प्रवसा १६, ३१ □ सतीश शहा द्विवा १७ □ कु. प्रतिभा कान्हेरे प्रवा १८, ६९ □ कु. कुमुद जोशी द्विवा २१ □ रवींद्र गुहागरकर द्विवा २२ □ कु. ज्योत्स्ना विंझे प्रवसा २४ □ कु. लता कुबेर प्रवा २७ □ कु. मंगला जाधव प्रवसा २९ □ सु. श्री. परांजपे प्रवा ३० □ प्रा. व. गो. नांदेडकर ३४ □ प्रा. आर. व्ही. शुक्र ३७ □ वसंत दाणी द्विवा ३८ □ प्रा. एस. आर. रायकर ४१ □ प्रा. जे. व्ही. नर्वे ४३ □ मुकुंद कडुसकर द्विवा ४५ □ अ. ग. सोमण प्रवशा ४८ □ रा. का. आडकर पपूशा ४९ उदय पाटील द्विवसा ५०, ५२ □ संजीव कुलकर्णी पपूशा ५० □ पी. एस. निंबाळकर ५०, ५७ □ चंद्रसेन वोन्हाडे प्रवा ५१, ५९ □ विलास दबडे द्विवा ५१ □ सुहास निर्मळे पपूवा ५१, ५७ □ दिलीपराज डेरे द्विवा ५१ □ शरद पोंक्षे प्रवा ५२, ५६ □ रावसाहेब फडतरे प्रवा ५३ □ नरेंद्र बोरगावकर पपूशा ५४, ५६ □ सुरेशचंद्र पाध्ये प्रवा ५४ □ अमर सतहतपत्रादी (एस. डी. पाठक) प्रवा ५४ □ के. बी. ठोंबरे पपूवा ५५ □ वसंत कुलकर्णी द्विवा ५६ □ अशोक शेलार द्विवा ५८, ५९ □ आनंद ओघले प्रवा ५९ □ पुणेकर ६१

संक्षेप–खुलासा ■ पपू पदवीपूर्व ■ प्रव प्रथमवर्ष ■ द्विव द्वितीय वर्ष ■ सा साहित्य ■ शा शास्त्र ■ वा वाणिज्य

संवत्सर: भारतीय ऐकात्मतेचे एकजुटीचे निर्धाराचे व विजयाचे



# 'मॉडर्न'चे दुसरे वर्ष

*संपूर्णपणे गतिमान झालेले महाविद्यालय*

महाविद्यालयाचे हे दुसरे वर्ष. अनेक उपक्रम, नव्या योजना व नव्या उमेदींनी भरलेले. या वर्षी विद्यार्थ्यांची संख्या ७०७ वरून ११२० वर गेली. दुसऱ्याच वर्षी पदवी-महाविद्यालय (Degree College) म्हणून महाविद्यालयाला मान्यता मिळाली व या वर्षी या महाविद्यालयातून पहिले पदवीधर बाहेर पडत आहेत. पहिल्याच वर्षी या महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या पदवीपूर्व परीक्षेत पहिल्या दहांत येण्याचा विक्रम करून उज्ज्वल परंपरा निर्माण केली. या परंपरेला क्रीडाक्षेत्रातही तशीच साथ मिळाली. आंतर महाविद्यालयीन बॉल बॅडमिंटन स्पर्धेत नव्यानेच उतरलेल्या 'मॉडर्न'च्या संघाने विजेतेपद मिळविले!

आता हे महाविद्यालय केवळ नव्या नवलाईचे म्हणून क्रमाक्रमाने वाढत जाणारे असे राहिले नाही. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघराच्या केंद्रस्थानी संपूर्णपणे गतिमान झालेले व नव्या युगाला जाणीवपूर्वक सामोरे जाणारे ते एक प्रतिष्ठेचे, परंपरेचे, स्वयंपूर्ण व सर्वांगपरिपूर्ण असे महाविद्यालय झाले आहे.

विद्यापीठ अनुदान मंडळाने दुसऱ्याच वर्षी या महाविद्यालयास मान्यता देऊन महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली आहे; हे या ठिकाणी अभिमानाने नमूद करण्यास आनंद वाटतो.

*पंधरा लाखांची भव्य इमारत*

ह्या स्वयंपूर्णतेत व वैभवात फार मोठी भर पडली आहे ती महाविद्यालयाच्या देखण्या, भव्य व नव्या इमारतीने. गेली दोन वर्षे अविश्रांत परिश्रम करून संस्थेच्या कार्यकर्त्यांनी ही अद्ययावत व सर्व सोयींनी युक्त अशी इमारत उभी केली आहे. आधुनिक शिक्षणाच्या साऱ्या गरजा लक्षात घेऊन वारंवार चर्चा-चिकित्सा करून या इमारतीची डोळसपणे उभारणी करण्यात आली आहे. पुण्यासारख्या ठिकाणी नव्यानेच एवढे महाविद्यालय सुरू करण्याचे ठरवावे, हे आताच्या काळात स्वप्नवत ठरावे, अशी आजची स्थिती आहे. भक्कम पायावर उभ्या असलेल्या मोठ्या संस्थांनाही आज आर्थिक दुरवस्थेने घेरले आहे. अशा परिस्थितीत दोन वर्षांत पंधरा लाख रुपये उभे करून ही भव्य वास्तू बांधण्यात संस्थेच्या कार्यकर्त्यांची जिद्द, निष्ठा व दूरदृष्टी साऱ्या महाराष्ट्राच्या प्रत्ययास आली आहे. संस्थेचे अध्यक्ष-उपाध्यक्ष व श्री. वि. त्र्यं ताटके, प्रा. न. गो. सुरू, श्री. मायदेव, डॉ. काळे, श्री. लिमये, आर्किटेक्ट श्री. आपटे (पितापुत्र) व संस्थेचे अन्य कार्यतत्पर सदस्य यांनी यासाठी जी योग्यता दाखविली आहे, तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे आमचे कर्तव्य आहे. गेल्या वर्षांत विद्यार्थि-विद्यार्थिनींसाठी वसतिगृहे, प्रशस्त विश्रामिका, ग्रंथालयासाठी व अभ्यासिकेसाठी स्वतंत्र व्यवस्था, विद्यार्थी पुस्तकपेढी विभाग, स्वतंत्र उपाहारगृह, सायकल स्टँड, प्राचार्य-निवासस्थान, विद्यार्थी कल्याण मंडळासाठी उपयुक्त उपकरणांची खरेदी, ग्रंथालय परिपूर्ण करण्यासाठी अधिक आर्थिक तरतूद इत्यादी विविध प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध करून महाविद्यालयाच्या साऱ्या गरजा पूर्ण

करण्याची संस्थेच्या चालकांची मनीषा आहे. ज्या धडाडीने महाविद्यालय उभे राहिले त्याच तत्परतेने ह्या सोयी उपलब्ध होतील, अशी आमची खात्री आहे.

### कै. डॉ. वि. ना. भावे

संस्थेच्या कार्यकर्त्यांबद्दलचा हा कृतज्ञताभाव व्यक्त करताना साहजिकच आठवण येते ती डॉ. वि. ना. भावे यांची. २७ मे १९७१ रोजी त्यांचे मुंबई येथे आकस्मिक निधन झाले. महाविद्यालयाच्या आखणीमध्ये व मांडणीमध्ये त्यांनी प्रथमपासून फार लक्ष घातले होते. संस्थेचे कार्यवाह श्री. ताटके यांजबरोबर महाविद्यालयाच्या उभारणीच्या प्रत्येक टप्प्याच्या वेळी आपली सारी महत्त्वाची कामे दूर सारून ते महाविद्यालयाच्या आवारात उभे असलेले नेहमी दिसायचे. महाविद्यालयाच्या वाढीसाठी त्यांच्या अनेक प्रकारच्या योजना होत्या व आणखी काही वर्षे ते आमच्यात राहते तर अनेक स्तरांवर, अविरत प्रयत्नाने त्यांनी या योजना प्रत्यक्षात आणल्या असत्या यात कसलीही शंका नाही. पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे सदस्य म्हणून व विद्यापीठाच्या विद्यार्थि-शारीरिक तपासणी योजनेचे तळमळीचे प्रवर्तक म्हणून त्यांनी केलेले कार्य सर्वांच्या स्मरणात आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक कार्याबरोबरच महाविद्यालयांतून विद्यार्थि-सहकारी संघटना जोमाने कार्य करू लागाव्यात अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या निधनाने महाविद्यालयाची अपरिमित हानी झाली आहे. आम्ही त्यांच्या निरंतर कार्यरत अशा मूर्तीला व त्यांच्या प्रेरक स्मृतीला आदरपूर्वक श्रद्धांजली वाहतो.

### प्राचार्य लिमये

वाढत्या महाविद्यालयाची सर्व सूत्रे कुशलतेने सांभाळून आत्मविश्वासाने प्राचार्य मो. भा. लिमये यांनी महाविद्यालयात अनेक चांगल्या उपक्रमांचा भक्कम पाया घातला आहे. महाविद्यालयाच्या वाढीसाठी सर्व प्रकारांनी त्यांनी या वर्षात हालचाल केली आहे. विद्यार्थि-संपर्क, सहपाठ योजना, युद्धकाळात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये त्यांनी निर्माण केलेली कर्तव्याची जाणीव व महाविद्यालयाच्या वाढत्या शाखोपशाखांची तत्परतेने जोपासना करण्यात ते सतत कार्यतत्पर राहिलेले आहेत. प्राध्यापक-चर्चामंडळ ( Staff Academy ) स्थापून महाविद्यालयातील प्राध्यापकांमध्ये त्यांनी अभ्यासाचे व सौहार्दाचे वातावरण निर्माण केले आहे.

### पहिले उपप्राचार्य डॉ. गाडगीळ

रसायन शास्त्राचे प्राध्यापक डॉ. ल. ह. गाडगीळ यांच्या महाविद्यालयाचे पहिले उपप्राचार्य म्हणून झालेल्या नियुक्तीने सर्वांना संतोष वाटला. डॉ. गाडगीळ हे त्यांच्या विषयातले अत्यंत नाणावलेले व विद्वान शिक्षक म्हणून ख्यात आहेत. काटेकोर शिस्तीचे ते भोक्ते आहेत.

त्यांच्या अनुभवाचा व व्यासंगाचा महाविद्यालयाला अनेक प्रकारे उपयोग होईल व त्यांच्या कारकीर्दीत महाविद्यालयाची शान व प्रतिष्ठा उंचावली जाईल, यात कसलीही शंका नाही.

महाविद्यालयातर्फे विद्यापीठाच्या विद्वत्सभेवर त्यांची निवड झाली आहे. त्यांच्या या दुहेरी निवडीबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन.

### नवे वाढते अभ्यासक्रम : नवे अनुभवी प्राध्यापक

महाविद्यालयात साहित्य व शास्त्र विभागाकडे द्वितीय वर्गाचे व वाणिज्य विभागाकडे

पदवी परीक्षेचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. त्यासाठी महाविद्यालयामध्ये अनेक प्राध्यापकांची, पाठशिक्षकांची व प्रयोग-शिक्षकांची या वर्षी नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. ती करताना गतवर्षाप्रमाणेच संस्थेने अनेक अनुभवी व अभ्यासू व्यक्तींची कटाक्षाने निवड करण्याचे धोरण ठेविलेले होते. प्रा. मुकुंद महाजन (अर्थशास्त्र), प्रा. व. गो. नांदेडकर (राज्यशास्त्र), प्रा. डॉ. सौ. श्यामला बनारसे (मानसशास्त्र), प्रा. वा. ग. खासगीवाले (मर्कंटाईल लॉ), यांची उपप्राध्यापक म्हणून, प्रा. र. वि. शुक्ल (रसायनशास्त्र) प्रा. र. गो. मुजुमदार (रसायनशास्त्र), प्रा. वि. भा. देशपांडे (मराठी), प्रा. अ. गो. गोसावी (वाणिज्य), प्रा. मेहदळकर यांची व्याख्याते म्हणून व प्रयोगशिक्षक व पाठशिक्षक म्हणून सर्वश्री न. चं. दुधाळे (प्राणिशास्त्र), त्रि. धों. मेहेंदळे (भौतिकी), भा. गो. देशपांडे (भौतिकी), अ. पां. आपटे (गणित), दी. हि. शहा (रसायन), व. य. भिडये (रसायन), गो. म. धनसुरे (वनस्पतिशास्त्र), त्रिं. प्र. लाळे (रसायन), क. म. गोखले (रसायन), रवींद्र गंधे (वनस्पतिशास्त्र) यांच्या नेमणुकीने यावर्षी महाविद्यालयाच्या शिक्षकवर्गात मोठी भर पडली आहे. या सर्वांचे महाविद्यालय हार्दिक स्वागत करीत आहे.

तसेच वनस्पतिशास्त्राचे प्रा. डॉ. अ. के. पांडे, हिंदीचे प्रा. श्री. दा. संगोराम यांना उपप्राध्यापक म्हणून; श्री. ज. वा. वर्वे व श्री. श. मो. काटदरे यांना अनुक्रमे भौतिकी व जीवशास्त्र या विषयांत 'व्याख्याते' म्हणून बढती मिळाली आहे. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

सौ. हेमा मराठे (रसायन), सौ. उषा चापेकर (जीवशास्त्र) व श्री. स. भा. गोखले (रसायन) हे शास्त्रविभागातील प्रयोग-शिक्षक या वर्षी महाविद्यालय सोडून गेले. त्यांना शुभेच्छा.

*निष्णात प्राध्यापकवर्ग : १९७१–७२*

| अनु. प्राध्यापकांचे नाव | | शिक्षण | विषय |
|---|---|---|---|
| १. प्राचार्य मो. भा लिमये | | एम्. कॉम्. | वाणिज्य |
| २. उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ | | एम्. एस्सी., पीएच्. डी. | रसायनशास्त्र |
| ३. प्रा. स. य. गंभीर | | एम्. एस्सी. | भौतिकी |
| ४. प्रा. प. स. चिपळूणकर | | एम्. एस्सी. (गणित) (संख्या) | गणित |
| ५. डॉ. प्रा. भीमराव ब. कुलकर्णी | | एम्. ए., पीएच्. डी. | मराठी |
| ६. डॉ. प्रा. स. य. परांजपे | | एम्. एस्सी., पीएच्. डी. F. A. Z., D. A. S. F. | जीवशास्त्र (प्राणि) |
| ७. प्रा. सी. रा. रायकर | | एम्. ए. | इंग्लिश |
| ८. प्रा. म. रा. भावे | | बी. कॉम्., F. C. A. | अकौंटन्सी |
| ९. प्रा. रा. गि. भिडार, उपप्राध्यापक | | एम्. कॉम्. | वाणिज्य |
| १०. डॉ. प्रा. अ. के. पांडे | ,, | एम्. एस्सी., पीएच. डी. | जीवशास्त्र |
| ११. प्रा. श्री. दा. संगोराम | ,, | एम्. ए., एम्. एड. | हिंदी |
| १२. प्रा. मुकुंद महाजन | ,, | एम्. ए. | अर्थशास्त्र |
| १३. प्रा. व. गो. नांदेडकर | ,, | एम्. ए. | राज्यशास्त्र |
| १४. डॉ. प्रा. सौ. श्यामला बनारसे | ,, | एम्. ए., पीएच्. डी. | मानसशास्त्र |
| १५. प्रा. वा. ग. खासगीवाले | ,, | | मर्कंटाईल लॉ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. प्रा. सु. श्यं. धामगुडे व्याख्याता | | एम्. ए. | संस्कृत |
| १७. प्रा. म. आ. कुलकर्णी | ,, | एम्. ए. | इतिहास |
| १८. प्रा. अ. र. नातू | ,, | एम्. ए. | इंग्लिश |
| १९. प्रा. प. दा. आपटे | ,, | एम्. ए. | भूगोल |
| २०. प्रा. अ. लु. पायरे | ,, | एम्. ए. | अर्थशास्त्र |
| २१. प्रा. चंद्रकांत कुलकर्णी | ,, | एम्. एस्सी. | गणित |
| २२. प्रा. सौ. कल्पना वांद्रेकर | ,, | एम्. ए. | इंग्लिश |
| २३. प्रा. सौ. प्रमिला चिकटे | ,, | एम्. ए. | गणित |
| २४. प्रा. ब. वा. बर्वे | ,, | एम्. एस्सी. | भौतिक |
| २५. प्रा. श. मो. काटदरे | ,, | एम्. एस्सी. | वनस्पतिशास्त्र |
| २६. प्रा. र. वि. शुक्ल | ,, | एम्. एस्सी. | रसायनशास्त्र |
| २७. प्रा. र. गो. मुजुमदार | ,, | एम्. एस्सी. | रसायनशास्त्र |
| २८. प्रा. वि. भा. देशपांडे | ,, | एम्. ए. | मराठी |
| २९. प्रा. अ. गो. गोसावी | ,, | एम्. कॉम्. | वाणिज्य |
| ३०. प्रा. एस. डी. मेडदकर | ,, | F. C. A. Ad. Accounting & Auditing | |

३१. श्री. अ. म. सिधये (शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख)

३२. श्री. व. पां. देशपांडे (कार्यालय अधीक्षक)

३३. श्री. द. गो. बापट (ग्रंथपाल)

### प्रयोग-शिक्षक (Demonstrators)

(१) श्री. ना. ग. शिंदे (भौतिकी)
(२) श्री. न. चं. दुधाळे (प्राणिशास्त्र)
(३) श्री. श्यं. धों. मेहेंदळे (भौतिकी)
(४) श्री. आ. गो. देशपांडे (भौतिकी)
(५) श्री. दीपक शहा (रसायन)
(६) श्री. व. य. भिडे (रसायन)
(७) श्री. गो. म. वनसुडे (वनस्पतिशास्त्र)
(८) श्री. त्रिं. प्र. काळे (रसायन)
(९) श्री. कृ. म. गोखले (रसायन)
(१०, श्री. रवींद्र गंबे (वनस्पतिशास्त्र)

### पाठशिक्षक

श्री. अ. पां. आपटे, (गणित)

*अभिमानास्पद व अभिनंदनीय*

महाविद्यालयातील व बाहेरील अनेकानेक उपक्रमांमध्ये मॉडर्नचे प्राध्यापक कार्यशील राहिले आहेत. पारितोषिक-वितरण समितीचे प्रमुख व क्रीडासंघटनेचे अध्यक्ष म्हणून प्रा. गंभीर व अन्य सदस्य, विद्यार्थि-संघटनेचे अध्यक्ष प्रा. रायकर व अन्य सदस्य, पदवीपूर्व विद्यार्थ्यांची सर्वांगीण पाहणी करण्याच्या समितीचे प्रमुख प्रा. चिरपुटकर व अन्य सदस्य, वाणिज्य व नियोजन मंडळाचे कार्याध्यक्ष प्रा. महाजन व त्यांचे सहकारी यांनी त्यांच्याकडे सोपविलेले कार्य उत्तम रीतीने पार पाडले आहे. प्रा. संगोराम यांनी प्राध्यापककक्षाचे कार्यवाह या नात्याने प्राध्यापकसहली, भोजने व अल्पोपाहारांचे विविध उपक्रम कल्पकतेने सादर केले आहेत. व प्रा. नांदेडकर यांनी प्राध्यापक-चर्चामंडळाचे कार्यक्रम आखण्यामध्ये विशेष परिश्रम घेतले आहेत.

प्राध्यापकांच्या कुटुंबियांचा परस्परपरिचय सर्वांना व्हावा यासाठी प्राचार्यांनी घडवून आणलेल्या 'साहचर्य-संध्या' या अभिनव कार्यक्रमाचा या ठिकाणी विशेष उल्लेख करावयास हवा.

अहवाल-विभागावरून प्राध्यापकांच्या अन्य कार्याची कल्पना येईलच. आणीबाणीच्या प्रसंगी बचत योजनेमध्ये त्यांनी केलेली गुंतवणूक व या वेळी स्वयंसेवक म्हणून पुढे येण्यात त्यांनी दाखविलेली तत्परता अभिनंदनीय आहे.

तसेच, कर्तव्य व जबाबदारीच्या जाणिवेतून १. सद्यःपरिस्थितीत महाविद्यालयीन शिक्षकांची भूमिका व कर्तव्ये. २. गृहपाठ योजना अधिक कार्यक्षम कशी करता येईल ? ३. अभ्यासेतर कार्यक्रमांचे नियोजन व त्यामध्ये विद्यार्थ्यांना जास्त सहभाग मिळण्यासाठी काय करावे ? या विषयासंबंधी प्राध्यापकांची झालेली चर्चा उद्बोधक, मार्गदर्शक व कार्यप्रवण करणारी होती.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनेक क्षेत्रांत केलेल्या अभिमानास्पद व अभिनंदनीय कार्याची कल्पनाही अहवालावरून येऊ शकेल, परंतु आणीबाणीची परिस्थिती जाणून स्वयंस्फूर्तीने स्नेहसंमेलन न करता बचत योजनेमध्ये त्यांनी केलेली गुंतवणूक, त्यांनी या प्रसंगी केलेले ठराव व प्रतिज्ञा यांबद्दल भारताचे सरसेनापती जनरल माणेकशा यांनी पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले आहे. श्री. चंद्रशेखर जयवंत यांची याच वर्षी लष्करी अधिकारीपदाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. महाविद्यालयातील एक शिपाई श्री. अशोक गजमल हे लष्करात याच वेळी भरती झाले आहेत.

पदवीपरीक्षेस बसणाऱ्या तृतीय वर्षाच्या वाणिज्य विद्यार्थ्यांस निरोप देण्यासाठी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेला समारंभ मोठा हृद्य होता. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनीही आपली आठवण व भेट म्हणून विद्यार्थि-विश्रांतिगृहामध्ये लावण्यासाठी मोठे घड्याळ देऊन अनुकरणीय उपक्रमाचा पायंडा पाडला आहे.

*ऋणनिर्देश*

पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आपटे व विद्यापीठाच्या अनेक विभाग-प्रमुखांनी व विद्यापीठ कार्यालयाने महाविद्यालयाला मार्गदर्शन केले आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने या महाविद्यालयाला मान्यता देऊन व ग्रंथालय समृद्ध करण्यासाठी अनुदान देऊन उपकृत केले आहे. बर्वे कुटुंबियांनी कै. स. गो. बर्वे व त्यांचे वडील कै. रावबहादूर बर्वे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पंधराशे दुर्मिळ व मौलिक ग्रंथांची महाविद्यालयाला भेट दिली आहे. या संग्रहाचे मोल केवळ पैशाने करता येणार नाही. युनायटेड कमिशयल बँकेने गरीब विद्यार्थ्यांना पुस्तके घेण्यासाठी सहाशे रुपयांची देणगी दिली आहे.

सौ. कमलाबाई आपटे, श्री. एस्. एम्. जोशी, खासदार मोहन धारिया, श्री. ना. ग. गोरे, डॉ. रा. शं. वाळिंबे, श्री. चिं. वि. जोग, प्राचार्य देवदत्त दाभोळकर, प्राचार्य मा. शं. भणगे, डॉ. क्लिस, डॉ. गर्दे, प्रा. सौ. लीला मुल्हेरकर, डॉ. अरणीकर, प्रा. अरविंद मंगरूळकर, प्रा. एम्. जी. देसाई, डॉ. पळसाने, विद्यापीठ स्थानिक चौकशी समितीचे सदस्य, श्री. विनायकरावजी कुलकर्णी, डॉ. स. गं. मालशे, पुणे महानगरपालिका अनुदान मंडळाचे सदस्य, प्रा. ओकार, प्रा. पुंडलिक, प्रा. यादव इत्यादी सन्माननीयांनी महाविद्यालयाला भेट देऊन आपल्या व्याख्यानांचा व बहुमोल विचारांचा लाभ घडविला आहे.

या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

*नवे वाढते अभ्यासक्रम*

जून १९७२ पासून साहित्य व शास्त्र या दोन्ही विभागांकडे पदवी परीक्षेचे (तृतीय वर्षाचे) वर्ग सुरू करण्यात येतील.

साहित्य विभागाकडे मराठी व अर्थशास्त्र या दोन विषयांत व शास्त्र विभागाकडे रसायनशास्त्र या विषयात विशेष अभ्यासक्रमाची (Special Courses) सोय करण्यात येत आहे.

वाणिज्य विषयाच्या तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमात Cost Accounting या अधिक विषयाची विशेष अभ्यासक्रमासाठी सोय करण्यात येत आहे.

साहित्य शाखेकडे द्वितीय वर्षासाठी मराठी, इंग्रजी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र या विषयांची सोय आहे.

विशेष अभ्यासक्रमासाठी त्या त्या विषयांचे संदर्भग्रंथ व अभ्यासग्रंथ मोठ्या प्रमाणात ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात येतील. विशेष अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयात महत्त्वाची सारी क्रमिक पुस्तके घरी अभ्यास करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील व या विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष देऊन विशेष मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात येईल.

*आभार*

आकर्षक छपाई, मांडणी व लेखांची विविधता यांमुळे मॉडर्नच्या गेल्या वर्षाच्या अंकाचे अनेकांकडून स्वागत झाले व अनेकांनी शाबासकीची पत्रे पाठवून आमच्या कार्याचे चीज केले.

गतवर्षाच्या अंकाचे मुखपृष्ठ विद्यार्थी मुकुंद कहूसकर याने केले होते. त्याचे अनेकांनी कौतुक केले. या वर्षीचे मुखपृष्ठही त्यानेच केले आहे. तेही अनेकांना आवडेल अशी आशा आहे.

मांडणी व छपाई यांच्या दृष्टीने शक्यतो प्रयत्न करण्यात आले आहेत. विविधताही अर्थात आहेच. नोबेल–पारितोषिक विजेत्यांचा परिचय हे या अंकाचे एक आकर्षण आहे. जर्मनी व इतर देशांच्या वकिलातींनी त्यासाठी साहाय्य केले आहे व असा विभाग या अंकात छापला जात आहे याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

अंक लवकर काढावा यासाठी या वर्षी पहिल्या पासूनच प्रयत्न करण्यात आले परंतु आणीबाणीच्या परिस्थितीमुळे नाईलाज झाला. पुढच्या वर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यातच अंक बाहेर पडावा अशी अपेक्षा आहे. त्यासाठी आपले साहित्य विद्यार्थ्यांनी वेळेवर द्यायचे आहे व सहकाऱ्यांनी अहवालादी साहित्य तत्परतेने २६ जानेवारीपर्यंतच तयार ठेवावयाचे आहे.

अंकाच्या या उभारणीमध्ये अनेकांचे मार्गदर्शन व साहाय्य झाले. त्यामध्ये प्राचार्यांचे मार्गदर्शन विशेष मोलाचे होते. प्रा. भिसार, प्रा. रायकर व प्रा. संगोराम यांनीही वेळोवेळी मागितलेले सहकार्य दिले. महाविद्यालयाच्या कार्यालयाचे अधीक्षक श्री. देशपांडे व लिपिक श्री. दोशी यांनी अनेक प्रकारे मदत केली.

शेवटी कल्पना मुद्रणालयाचे संचालक श्री. चिं. स. लाटकर यांच्या तत्परतेबद्दल त्यांचे आभार मानतो व विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षांत सुयश चिंतितो.

*भीमराव कुलकर्णी*

# संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत महाविद्यालयाचा प्राध्यापकवर्ग व सेवकवर्ग



डावीकडून बसलेले : प्रा. पद्माकर आपटे, प्रा. रायकर, डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. ल. ह. गाडगीळ, डॉ. काळे, मुरजमल संघवी, श्री. वि. द. घाटे, प्रा. मुरु, सौ. कमलाबाई आपटे, (प्रमुख पाहुण्या) प्राचार्य लिमये, श्री. वि. त्र्यं. ताटके, प्रा. गंभीर, प्रा. चिरपुटकर, डॉ. परांजपे, प्रा. मिजार व प्रा. संगीराम.

मागे उभे रांग पहिली : प्रा. खाजगीवाले, प्रा. गोसावी, श्री. बर्वे, प्रा. महाजन, श्री. सिधये, प्रा. चंद्रकांत कुलकर्णी, श्री. देशपांडे, प्रा. पाथरे, प्रा. सौ. चिकटे, डॉ. सौ. बनारसे, प्रा. सौ. वांद्रेकर, प्रा. नातू, प्रा. मुजुमदार, प्रा. नांदेडकर, प्रा. शुक्ल, प्रा. काटदरे, डॉ. पांडे, प्रा. धायगुडे व प्रा. म. आ. कुलकर्णी.

मागे उभे रांग दुसरी : सर्वश्री चंद्रचूड, दोशी, बनमुडे, गोखले, शहा, दुधाळे, गंधे, देशपांडे, भिडे, बापट, लाळे, मेहंदळे, आपटे, शिंदे, व कुलकर्णी

मागे उभे रांग तिसरी : सर्वश्री गावडे, भोसेकर, कांबळे, खत्री, वागेभ, क्षिमण, पाटेकर, पवार, कडव, देशपांडे, मोहिते, पवार, चिनकडे, उतेकर, जाधव, कदम, नरवडे, गुंजाळ, सांडकर व जगदाळे

## संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत महाविद्यालयातील विद्यार्थि-संघटनेचे पदाधिकारी व वर्गप्रतिनिधी



बसलेले डावीकडून : उदयकुमार लागू ( ICSR, Gents ), अ. भि. तांबे ( G. S. ), प्रा. रायकर, डॉ. भीमराव कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, डॉ. काळे, श्री. सुरजमल संचेती, श्री. वि. द. घाटे, प्रा. सुरु, सौ. आपटे ( पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षा ), प्राचार्य लिमये, श्री. वि. त्र्यं. ताटके, प्रा. गंभीर, प्रा. चिरपुटकर, डॉ. परांजपे, प्रा. पद्माकर आपटे, कु. शैला कुलकर्णी ( ICSR, Ladies )

उभे रांग क्र. २ : दाते, महापुरे, बोराणा, घावटे, आसलेकर, वाघ, प्रा. महाजन, श्री. लिमये, प्रा. पाथरे, प्रा. संगोराम, प्रा. नानू, श्री. शिंदे, कु. शहा, लाळे, गोडबोले, दिवाण, जेवे

उभे रांग क्र. ३ : सावंत, पवार, आयना, महाडकर, धारिया, डोळेकर, सहस्रबुद्धे, सातारकर, बेलसरे, नाईक, जोशी, पाटील, दाणी आणि चोरडिया



# डॉ. विक्रम साराभाई

अनिल कुलकर्णी

जीवनात एकापुढे एक आनंददायी घटना घडू लागल्या की, त्यांना कोठेतरी दृष्ट तर लागणार नाही ना अशी भाबडी शंका मनात येते आणि अनेकदा खरीच ठरते. मानवी जीवनातील अनुभव राष्ट्रपुरुषांच्या जीवनालाही लागू आहे असे दिसते. भारताच्या अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे थोर वैज्ञानिक व अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात भारताचा सन्मान्य प्रवेश घडवून आणणारे डॉ. विक्रम साराभाई यांच्या आकस्मिक निधनाने सान्या देशाला मोठा धक्का बसला. देशाच्या सामर्थ्य-संपन्नतेची धरा कुठे थोडी दिसू लागते न लागते तोच हे सुखस्वप्न साकारण्याचा ध्यास घेतलेल्या एका थोर वैज्ञानिकाला मुकण्याची पाळी देशावर यावी हे दुर्दैव नव्हे काय?

सात वर्षांपूर्वी आल्प्स पर्वतावर झालेल्या विमान अपघातातल्या डॉ. भाभा यांच्या निधनाने देशाला जबर धक्का बसला. पण डॉ. विक्रम साराभाई यांनी आपल्या कुशाग्र बुद्धीने व कुशल कार्यकर्तृत्वाने ती उणीव पुष्कळ अंशी भरून काढली. तसेच अणुशक्ती व अवकाश संशोधन अशा दोन्ही क्षेत्रांत भारताला प्रतिष्ठेचे सन्मान्य स्थान प्राप्त करून दिले. पण नियतीला हे पाहवले नाही. प्रगतीच्या मार्गात आणखी एकदा ३० डिसेंबर १९७१ ला निराशेची दरी निर्माण केली.

डॉ. साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी अहमदाबाद येथे अंबालाल साराभाई या गुजराथी उद्योगपतींच्या घराण्यात झाला. हे घराणे म्हणजे विद्या, कला व विज्ञान यांचा सुरेख संगम. साराभाई घराण्यामध्ये पूर्व-पश्चिमेचा मनोज्ञ मिलाफ आहे. त्यांची पत्नी नृत्यनिपुण आहे. डॉ. साराभाई यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय भारदस्त व देखणे असे होते. त्यांचे शालेय शिक्षण शांतिनिकेतनमध्ये झाले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी "केंब्रिजच्या सेंट जोन्स" कॉलेजात घेतले. "विश्वकिरण" (कॉस्मिक रेज) हा त्यांच्या अभ्यासाचा खास विषय होता. त्यांचे कॅव्हेंडिश लॅबोरेटरीतील न्युक्लिअर फिजिक्समधील संशोधन प्रसिद्ध आहे. केंब्रिजहून परत आल्यानंतर त्यांनी बंगलोर येथे डॉ. सी. व्ही. रामन् यांच्या हाताखाली संशोधन केले.

डॉ. भाभांच्या निधनानंतर "भाभा अणुशक्ती संशोधन केंद्र, तुर्भे", "अवकाश संशोधन केंद्र, थुंबा", "राष्ट्रीय वास्तव शास्त्र संशोधन केंद्र" या व अशाच कित्येक वैज्ञानिक संस्थांच्या अध्यक्षपदांची जबाबदारी त्यांच्यावर होती. संशोधन, प्रशासन व शिक्षण या तिन्ही

क्षेत्रांत ते सारखेच अधिकारी होते. ते अमेरिकेच्या मॅसॅच्युसेटस् इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील अणुशास्त्र प्रयोगशाळेत सन्माननीय सदस्य व संशोधक म्हणून गेली दहा वर्षे भेट देत होते. मंत्रिमंडळाच्या शास्त्रीय सल्लागार समितीवर डॉ. विक्रम साराभाई काम करीत होते. भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स कमिटीचे ते अध्यक्ष होते.

डॉ. साराभाईंनी "भटनागर पारितोषिक" १९६२ साली मिळविले होते. त्यांना पद्मभूषण हा कितावही मिळाला होता. ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ होते हे त्यांच्या अण्वस्त्रांच्या वापराच्या संभाव्य परिणामाबद्दल संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस श्री. उ थांट यांना दिलेल्या सल्ल्यानुसार स्पष्ट दिसते. विकासोन्मुख देशाच्या संरक्षणाच्या समस्येची चर्चा करताना ते म्हणतात, "अण्वस्त्र उत्पादन करण्याची किंमत कमी असते, पण त्या अण्वस्त्रांनी स्वसंरक्षणाची सर्वस्पर्शी तयारी करणे मोठे खर्चाचे आहे. संरक्षणाबाबत आत्मनिर्भर होणे मोहक असले तरी भारतासारख्या विकसनशील देशाला मात्र ते परवडण्यासारखे नाही. म्हणूनच भारताचा औद्योगिक पाया बळकट करण्याचा प्रयत्न करू या. प्रत्येक राष्ट्राने आपल्या सार्वभौमत्वाचा काही भाग युनोला द्यावा. समुद्राखालील संपत्तीवर युनोचे स्वामित्व असावे. अनेक राष्ट्रांचा विकास एकाच वेळी साधणारे मोठे प्रकल्प एकदम हाती घ्यावे, म्हणजे परस्परांच्या हिताची जपणूक होईल."

त्यांनी लिहिलेल्या प्रबंधांची यादी फार मोठी आहे. आरवी उपग्रह केंद्राचे कार्य कोणातरी अमेरिकन कंपनीला ठेका म्हणून द्यावे असा सरकारी निर्णय झाला होता, पण साराभाईंनी त्याला सक्त विरोध केला, आणि त्यातील जमेल तितके कार्य स्वदेशात स्वजनांकरवी व्हावे असा आग्रह धरला. प्रत्यक्ष केल्याने जितके शिकता येते तितके ज्ञान इतर कशाने येत नाही असा त्यांचा विचार होता. आरवी येथील प्रकल्प त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली आमच्या देशातील यंत्रविशारदांनी उभा केला. डॉ. भाभांचे अप्सरा रिॲक्टर हेच जिवंत स्मारक आहे. तसेच डॉ. साराभाईंची आरवी, थुंबा ही स्थळे स्मारकेच ठरतील.

स्वदेशी उपग्रह तयार करण्याचा आणि उपग्रहामार्फत खेड्यात टेलिव्हिजन नेण्याचा आराखडा त्यांनी तयार केला. भाभांनी अणुशक्तीचे स्वप्न पाहिले आणि साराभाईंनी अविरत कष्टाने त्याला वास्तविक आकार देण्याचा व प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न केला. उटकमंडच्या रेडिओ टेलिस्कोप बनविण्यात कर्तबगारांना त्यांनी प्रोत्साहन दिले. अहमदाबाद येथे त्यांनी नवी संशोधनशाळा उपग्रहासाठीच काढली. त्या संशोधनसंस्थेस दहा वर्षांचा कार्यक्रम आखून देण्याचा हा "राज-योजक" योजकांचा राजा होता.

भाभांच्या निधनानंतर भारतीय अणुशक्ती कमकुवत झाली असे वाटत होते. परंतु साराभाईंनी अविरत प्रयत्नाने अणुशक्तीच्या क्षेत्रात अफाट प्रगती केली आणि भारतीय अणुशक्तीत नवा जोम, नवा जोश आणि उत्साह निर्माण केला. त्यांच्या निधनाने भारताचे न भरून येणारे नुकसान झाले आहे.

युद्धात जवान विजयासाठी वीरमरण पत्करत असतात. त्यांच्या वीरगतीने विजय अधिकाधिक जवळ येत असतो. अणुशक्तीच्या क्षेत्रात प्रगती करण्यासाठी भाभा, साराभाई यांनी हौतात्म्य पत्करले आहे. त्यांचा हा त्याग म्हणजे पुढील प्रगतीचा पायाच आहे. याच भक्कम पायावर भारतीय अणुशक्तीचे मंदिर उभे राहणार आहे. त्यांनी सुरू केलेले हे महान कार्य थांबणार नाही. ते असेच वेगाने वाटचाल करीत राहणार आहे.

✽

प्रेसिडेंट लिंकनकडे एक बाई आली आणि मोठ्या तोऱ्यात सांगू लागली, "माझ्या मुलाला तुम्ही कर्नलची जागा दिली पाहिजे; केवळ उपकार म्हणून नव्हे तर हक्क म्हणून आम्ही ही जागा मागत आहोत. माझ्या आजोबांनी लेक्सिंग्टनच्या लढाईत मर्दुमकी गाजविली, माझे चुलते असे एक शूर पुरुष होते की, जे ब्लॅडेनबर्गच्या लढाईतून पळून आले नाहीत, माझ्या वडिलांनी न्यू ऑर्लियन्सच्या लढाईत गाजविलेला पराक्रम मशहूर आहे; माझे पतिराज मॅंटिसरीच्या लढाईत मारले गेले."

"तुम्ही म्हणता ते बरोबर आहे." लिंकन शांतपणे म्हणाले, "तुमच्या कुटुंबाने देशासाठी खूप कष्ट केले, आता इतरांनाही थोडी संधी देऊ की!" मुरलीधर पांडे

# निकाल

## प्रदीप सिद्धये



'टिर्रऽऽऽऽर्रऽऽ' गजर ओरडायला लागला आणि बन्या बनसोडे ताडकन् उठला. हो! आज दोन तारीख होती ना! आज त्याचा एस्. एस्. सी.चा रिझल्ट होता. अंथरूण पायाने लाथाडतच तो उठला व अंगाला एक झक आळोखा देत शर्ट अडकवीतच तो बाहेर ओसरीवर आला. पाचसाडेपाच वाजले होते तरीसुद्धा बाहेर फारसा काळोख नव्हता.

उन्हाळ्याच्या शेवटी शेवटी सुद्धा सूर्य वर यायला अगदी उत्सुक दिसत होता. बन्या डोळे चोळीतच विहिरीकडे गेला. पिपातले लोटीभर पाणी घेऊन त्याने दोन खुळखुळून चुळा भरल्या तेव्हा कुठे त्याला बरे वाटले.

त्याच्या खेडेगावात कुठला पेपर यायला! पण तालुक्याला राहणाऱ्या कृष्णाला त्याने निकालाचा पेपर आणायला सांगितला होता. त्यामुळे कृष्णाची बस-थांब्याघर वाट पाहण्याखेरीज त्याला दुसरा उपायच नव्हता. गिचमीड अक्षरात नंबर लिहिलेली चिठ्ठी खिशात कोंबत त्याने वहाणा पायात सरकविल्या. त्याचा खुडबुडीने त्याची आय जागी झाली.

"प्वारा! बाईच् चाय तरी पिऊन जा!"

"नको! आता नकोच चाय! मी आता येतु!" असे चुटपुटतच तो घराच्या बाहेर पडला. रस्त्यात कोणीही भेटू नये अशी तो मनातल्या मनात प्रार्थना करत होता, तरी पण शिवा लंगट्याने त्याला हटकलेच, "काय रे! सकाळच्यापारी कुठं?" "च्या बायलीला! तुला म्हाताऱ्या कशाला रं चकवशा!" असे त्याला झटकून टाकतच बन्याने झटपट पावले टाकायला सुरुवात केली. त्याच्या दृष्टीने आज अगदी महत्त्वाचा दिवस होता. तो पास झाला तर त्याला बापाने 'कालिजात' पाठवायचे कबूल केले होते. बस-थांब्याच्या पत्र्याचे छप्पर आता थोडं थोडं अंधुक दिसायला लागले होते. बन्याची पावले अधिकच जोरात पळायला लागली.

एकदाचा तो बस-थांब्यावर येऊन पोचला. इतक्यात बसचे प्रचंड धूड धुळीचा फवारा मारतच त्याच्यापुढे येऊन उभे राहिले. कृष्णाने आपली मान काच फुटलेल्या खिडकीतून काढत ओरडतच बन्याचे अभिनंदन केले.

एक क्षणभर बन्याला तो काय म्हणतोय हे कळेनाच! दुसऱ्या क्षणी त्याने कृष्णाचा हात पकडत आपला अत्यानंद प्रदर्शित केला. कृष्णाने त्याचा हात सोडविला व तो कसाबसा बसच्या मोडक्या दरवाजातून बाहेर पडला. बन्याने आपल्या हॅंड्यातील 'नंबराचा' चुरगाळलेला कागद काढून फेकून दिला. कृष्णाचा हात पकडतच तो हॉटेलच्या दिशेकडे वळला.

कृष्णाचा निरोप घेत बन्या जवळ जवळ धावतच घरी पोचला. आपण पास झालो हे आपल्या बाला कधी सांगेन असे त्याला झाले होते! कमीत कमी आईला सांगून तरी खूष करावे या हेतूने तो मागील्दारी आई तुळशीची पूजा करत होती तिकडे गेला. तो धावतच तिच्यापाशी गेला व निकालाचा पेपर फडकवीत जोराने ओरडला, "आये! मी पास झालु! हे बग!" "अरंऽऽअरंऽऽ! म्या देवाची पूंजा करते ते दिसत नाय् का! आता तू लहान का राह्यलास!"

बन्याच्या उत्साहावर पार विरजण पडले. पण तरी नाउमेद न होता आपल्या इतर मित्रांचे काय निकाल (!) लागलेत हे पाहायला तो मित्राकडे जायला निघाला. इतक्यात दारात त्याला मामा दिसला! अंऽऽहो! तो नक्कीच मामा होता. बन्या किती दिवसांनी त्याला पाहात होता. आणि बरोबर ती (नकटी!) कोण! बन्याला वाटले, आपण उगीचच बावळटासारखे बघत बसलो. जरा सावरूनच तो पुढे आला व मामाच्या हातातले गाठोडे घेतच तो परत घरात शिरला. "अरे बन्या! हिला ओळखलीस का? अरे! ही आपली मंजुळा!"

मामानेच आपणहून बोलायला सुरुवात केली. बन्याला काही केल्या आठवेना. त्याने स्मरणशक्तीला खूप ताण दिला पणऽऽऽ! हां! आठवलं! चार-पाच वर्षांपूर्वी एकदा आईबरोबर तो मामाच्या गावाला गेला होता. तेव्हा तो मंजुळेबरोबर सागरगोटेसुद्धा खेळला होता. तेव्हा कुणी तरी—बहुधा मामाच असावा—म्हणाले होते, "अरे बन्या! लेका! आता ही तुझी बायको व्हायची आणि सागरगोटे काय खेळतोस!" त्या आठवणीने बन्याला आत्तासुद्धा हसू आले आणि त्या वाक्याचा अर्थ नव्याने लक्षात येताच त्याचा चेहरा लाजेने फुलला. अच्छा! म्हणजे हीच ती मंजुळा काय! तो नकळतच तिच्याकडे पाहू लागला—नऊवारी लुगडे ती अगदी चापूनचोपून नेसली होती. कपाळावर एक हट्टी बट डोकावत होती आणि कपाळावर गोंदलेल्या हिरव्या भागावर घामाचे बिंदू चमकत होते. तिने एकदम त्याच्याकडे बघितले. बन्याने आपली दृष्टी चटकन् फिरवली! आणि मित्राकडे जाऊन येतो या सबबीवरच तो बाहेर सटकला!

आता त्याचे मन शहराचा वेध घ्यायला लागले होते. शहराचे ते मोठे प्रशस्त रस्ते, चकचकीत मोटारी, कॉलेजची प्रचंड इमारत आणि बाहुला-बाहुलीसारखी दिसणारी पोरं-पोरी त्याला पाहायची होती! त्यांच्या प्रलोभनातच तो अडकला होता! आता त्याला चालताना सुद्धा शहराचीच स्वप्ने पडत होती! तो अभ्यास करतोय! सिनेमाला जातोय! वगैरे अनेक! त्या तंद्रीतच तो चालला होता. इतक्यात त्याला पुढून कुणाची तरी जोरदार धडक् बसली. त्याने चमकून बघितले. त्याचा मित्र बंड्या होता. बंड्याचा चेहरा उतरला होता. बन्याच्या आनंदी चेहऱ्याकडे पाहून बंड्याला आश्चर्यच वाटले. हा लेकाचा 'नापास' असून हसतोय का? बन्याची उत्सुकता आता शिगेला पोचली आणि त्याने बंड्याला निकालाबद्दल विचारताच तो ताडकन् उत्तरला, "XXX हसतोस काय? सगळी XXX झाली. आपण सगळे नापास आहोत!" त्या वाक्यासरशी बन्या तीन ताड उडाला, पण लगेच सावरून त्याने त्याच्या हातातला पेपर ओढून घेतला आणि आपला नंबर नाही हे पाहून तो चांगलाच हादरला! म्हणजे मित्र्याने बनवले होते तर!

आता काय करावं? बन्यापुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले. खरे सांगावे तर आता तो रानात काम करायला सांगणार आणि तो आईला तर सांगून बसला होता पास झाल्याचं! आतापर्यंत आईने ती 'आनंदाची' बातमी मामाला व मंजुळेला नक्कीच सांगितलेली असणार. आणि आता आपला मूर्खपणा परत सांगायचा? छे! छे! ते ऐकून मंजुळेला सुद्धा हसू येईल! त्याला काय करावे सुचेना! एकदम त्याच्या डोक्यात एक नामी शक्कल आली आणि तो त्वरेनेच घराकडे परतला.

मामा आल्याचा सांगावा गेल्याने बा घरी आला होता आणि मामाबरोबर गप्पा मारत तो तंबाखूचा आस्वाद घेत होता. बन्याने गुपचूप आत सटकायचा प्रयत्न केला. इतक्यात मामाने त्याला हटकलेच, "अहो बन्याबापू! या बरं, आमच्याशी गप्पा मारा." आता चांगलेच संकट उभे राहिले होते. त्याच्या मनात निकालाचा प्रश्न घुमत होता. खरे सांगावे तरी पंचाईत! खोटे सांगावे तर धीर होत नव्हता!...इतक्यात मामानेच विषय काढला, "आता तुम्ही मोठे झाले! आमच्या मंजूला आता करून घ्या!" बन्याला मामा काय बोलतोय् ते चटकन् कळेनाच. "XXX! असं आं काय करतुयास!" बा त्याच्यावर डाफरला. बन्याने गपकन तोंड मिटले. पुन्हा एकवार बा आणि मामाच्या गप्पा सुरू झाल्या. बन्या तेथेच बसून 'बा' ला काय सांगावे याचा विचार करत होता. मगाची युक्ती वापरावी का? याबद्दल अजून त्याच्या मनात पक्के होत नव्हते.

आता मात्र एकदाच खरे काय ते सांगावे या निर्णयपर्यंत तो आला व एका झटक्यात त्याने सांगून टाकले, "बा! मी नापास झालो!" "अरं लेकाच्या! मग इतक्यापासून तुझं त्यांड कुणी धरलं व्हतं? मला वाटलं तू पास झालास! आता तुला कालिजात कसं पाठवायचं याचा विच्यार करीत हुतो. बरं झालं!" आणि झटक्यात मामाकडे वळत तो म्हणाला, "मंग आता दादा! येळ नग! आता उद्याच्या आठवड्यातला मूर्त (मुहूर्त) बघा! चला भाणगड मिटली." असे म्हणत बाने जोरात हातावरची तंबाखू मळली आणि तोंडात चिमूट टाकली आणि ते दोघे एकमेकाकडे बघून जोरजोराने हसायलाच लागले. बन्या मात्र आं वासून त्यांच्याकडे बघतच राहिला. त्याच्या लेंग्याचा खिसा निकालाच्या पेपराने फुगला होता आणि दरवाजाच्या चौकटीतून मंजुळा अनिमिष नजरेने बन्याकडे पाहात होती!

## बांगला देश : आयात-निर्यात

शाम वाघ

पूर्व बंगाल (आताचा बांगला देश) आणि वायव्ये-कडील हिंदुस्थान यांच्या मीलनातून पाकिस्तानची निर्मिती झाली. या दोन जोडीदारांची त्या आधी कधी गाठभेट पडली नव्हती. त्यांना एकमेकांना काही खास सांगायचे नव्हते, इतकेच नाही तर त्यांच्या भाषाही वेगवेगळ्या होत्या. 'कानडीने केला मराठी भ्रतार' अशी काहीशी अवस्था होती. केवळ 'मुस्लिम' या एका भावनेने ते एकत्र आलेले होते.

परंतु, बंगाली मुसलमानांनी पाकिस्तानात विलीन होताना जी स्वप्ने उराशी बाळगलेली होती, त्या स्वप्नांना पंजाबी मुसलमानांनी मूठमाती दिली. पूर्व बंगाली लोक सापत्न भावनेनेच वागविले गेले. पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर हिंदुस्थानशी होणारा पूर्व बंगालचा व्यापार थांबला आणि कलकत्त्याची मुख्य बाजारपेठ पूर्व बंगालच्या ताग उत्पादकांना बंद झाली. आपल्या प्रदेशातील दळण-वळण, व्यापार आणि मीठ उद्योग यांचे नियंत्रण पूर्व बंगालच्या हातून काढून घेतले गेले. उर्दू हीच एकमेव राष्ट्रभाषा करण्याचे प्रयत्न केले गेले.

ज्यूट, चहा आणि सामुद्रिक उत्पादन यापासून पूर्व बंगालने कमावलेल्या परकीय चलनाचा वापर पश्चिम पाकिस्तानात वस्तूंची आयात करण्यासाठी केला जाई. परकीय चलनाचे वाटप दोन विभागांमध्ये अत्यंत विषमतेने करण्यात आले. एकंदर परकीय चलनाच्या ६० टक्के कमाई पूर्व बंगालची, तर एकूण परकीय चलनापैकी ७० टक्के चलनाचा वापर पश्चिम पाकसाठी केला जाई. परिणामी, आयात वस्तू पश्चिम भागापेक्षा पूर्व भागात अधिक महाग मिळत. पाकिस्तानच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५७ टक्के उत्पन्न पूर्व बंगालकडून पुरविले जाई. हे उत्पन्न घरून केंद्रीय सरकार पूर्व भागात तुटपुंजी अशी सार्वजनिक



क्षेत्रात गुंतवणूक कधीच करीत नसे; उलट पश्चिम पाकिस्तानात उत्पादन करण्यात येणाऱ्या खर्चिक मालाला पूर्व बंगाल हीच बाजारपेठ असे.

एकूण पूर्व बंगालची आर्थिक दृष्ट्या पुरेपूर पिळवणूक केली गेली. राजकीय पातळीवरील पिळवणूक इतकीच भयानक होती. या सर्व गोष्टी २५ वर्षे धुमसत राहिल्या, आणि या समुद्रमंथनातूनच ‘बांगला देशची’ निर्मिती झाली.

‘बांगला देश’ ही आता वस्तुस्थिती झालेली आहे. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा ‘सोनार बांगला’ ही नुसती काव्यकल्पना नसून खरोखरीच सोने पिकविणारा प्रदेश आहे. पाकिस्तानचा जागतिक व्यापार ‘बांगला देश’च्या जिवावरच चालत होता. हे वरील विवेचनावरून स्पष्ट झालेच आहे, आणि पुढे ते आणखी स्पष्ट होईल.

बांगला देश हा नैसर्गिक साधनसामग्रीच्या दृष्टीने अतिशय समृद्ध आहे. परंतु निर्मितीपासून काही काळ तरी बांगला देशला ‘दुसऱ्याच्या चोची’नेच ‘अन्न’ खावे लागणार आहे. याचाच अर्थ असा की, बांगला देशला आपली प्रगती करण्यासाठी मुख्यतः कच्च्या मालाच्या निर्यातीवर आणि पक्क्या मालाच्या आयातीवर अवलंबून राहावे लागेल.

यासाठी प्रथमतः बांगला देश कोणकोणत्या वस्तू निर्यात करू शकेल, याचा विचार करणे आवश्यक आहे. बांगला देश मुख्यतः ताग, चहा आणि तांदूळ यांचे उत्पादन करतो. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनात आगपेट्या, छपाईचा, लिहिण्याचा आणि खोकेभरडा कागद आणि छपाईचे ठसे यांचा मुख्यतः समावेश होतो. आणखी एक नैसर्गिक संपत्ती बांगलाला पुढे आणू शकेल, आणि ती म्हणजे मासे. सध्याचे पाकिस्तान आणि बांगला देश यांच्यात या गोष्टींबाबत तुलना केली, तर असे दिसून येते की, पाकिस्तानात आता या गोष्टी शून्यात जमा झालेल्या आहेत. म्हणजेच पूर्वीच्या अखंड पाकिस्तानातील ही उत्पादने १००%बांगला देशीय होती आणि अजूनही आहेत.

बांगला देश विभक्त झाल्यामुळे पाकिस्तानला बसलेला फटका जबरदस्त आहे. या फटक्याचा विचार केला असता आपल्याला असे दिसून येईल की, बांगला देशचा वाटा खूपच मोठा आहे, आणि बांगला देशच्या निर्यातीसाठी याचा पुरेपूर उपयोग करून घेता येईल.

पाकिस्तानच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी (७७२२ कोटी रु.) बांगला देशचा वाटा ४३९९ कोटी रु. इतका आहे. त्याचे प्रमाण ५७% इतके पडते. अंतर्गत आर्थिक साधनांपैकी ४२% साधने बांगला देशीय होती. तर पाकिस्तान व बांगला यांचा एकमेकांशी एकूण व्यापार २५८ कोटी रु. चा होता. त्यापैकी बांगला देश विभागाची निर्यात ९२ कोटी रु. व आयात १६६ कोटी रुपये होती. याचाच अर्थ बांगला देशचा जास्त पैसा पाकिस्तानकडे जात होता. याशिवाय बांगला देश १५५ कोटी रु. चे परकी चलन मिळवीत होता, आणि हे एकूण (पाकिस्तानच्या) परकी चलनाच्या ४८%होते.

या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की, बांगला देश निर्यातीने १५५ कोटी रु. मिळवू शकतो. शिवाय पूर्वी अंतर्विभागीय व्यापारात पाकिस्तानकडे जाणारे १६६ कोटी रु. बांगला देशला इतर मित्र राष्ट्रांबरोबरील व्यापारात गुंतविता येतील. निर्यात वाढविण्यासाठी बांगला देश जपानचा मार्ग स्वीकारणे शक्य आहे. ज्या वस्तूंना परदेशात भरपूर बाजारपेठ उपलब्ध आहे, अशा वस्तू स्वदेशात विकायच्याच नाहीत. बांगला देशच्या बाबतीत ताग, चहा, भात आणि मासे याबाबतीत हे शक्य आहे, किंबहुना या वस्तूंवरच बांगला देशची निर्यात अवलंबून आहे.

बांगला देशच्या या वस्तू आयात करण्यात भारताचा पहिला क्रमांक लागेल. बांगला देशचा सर्व ताग भारतात आयात होऊ शकेल. चहाच्या आणि मासळीच्या बाबतीत विशेषेकरून एखाद्या देशाचे नाव घेण्याचे कारणच नाही. कारण या मालाला भरपूर मागणी आहे.

बांगला देशाची निर्यातीची बाजू या सर्व गोष्टींमुळे भक्कम बनत असली तरी निर्यातीपेक्षा आयातीत बांगलाला जास्त पैसा ओतावा लागणार आहे. जोपर्यंत संपूर्ण देशाची विस्कटलेली आर्थिक घडी व्यवस्थित होत नाही, तोपर्यंत बांगला देशला स्वावलंबी बनण्याची स्वप्ने पाहणे कठीण आहे. अखंड पाकिस्तानात, बांगला देश पश्चिम पाकिस्तानकडून कापड, तंबाखू, यंत्रसामग्री, औषधे, निरनिराळ्या धातूंच्या वस्तू, सिमेंट इत्यादी १६६ कोटी (पाकिस्तानी) रु. च्या वस्तू आयात करीत असे. यातील काही वस्तू जर पाकिस्तानने स्वतःच आयात केलेल्या असतील तर त्या बांगला देशात दुपटीपेक्षाही जास्त किंमतीला मिळत. याच वेळी बांगला देशातील ९२ कोटी रु. चा

माल पश्चिम भागात जात असे. हा १६६ कोटी रु. चा माल बांगला देशला दुसऱ्या मित्रराष्ट्रांकडून आयात करावा लागणार आहे.

भारत, रशिया, पोलंड, पूर्व जर्मनी यासारखी अनेक राष्ट्रे बांगला देशला हा माल पुरविण्यास तयार आहेत. भारत कापड, तंबाखू, सिमेंट, औषधे आणि काही प्रमाणात यंत्रसामग्री ह्या सर्व गोष्टींचा पुरवठा करण्यास तयार आहे. उरलेल्या किंवा कमी पडलेल्या वस्तूंचा पुरवठा इतर राष्ट्रांकडून होणे शक्य आहे.

भारत आणि बांगला देश यांचे हितसंबंध सर्वांत चांगले राहणार आहेत. त्यामुळे या हितसंबंधांचा बांगला देशच्या आयात-निर्यातीवर काय परिणाम होतो, आणि त्यापासून एकमेकांचा काही फायदा होतो काय, हे पाहणे आवश्यक आहे. अर्थातच, भारत व बांगला देश या दोन्ही देशांतील आर्थिक क्षेत्रातील सहकार्याने दोघांचाही फायदा होईल. वर सांगितल्याप्रमाणे बांगला देशला लागणाऱ्या पोलाद, कोळसा, सिमेंट, मशिनरी आणि अशा इतर मालाची निर्यात भारत करू शकेल, तर त्या देशाकडून कच्चा ताग, मासे व तत्सम गोष्टी आयात करू शकेल. कच्चा ताग विकत घेऊन त्याचे वस्तूंमध्ये रूपांतर करून भारताला आपले परकी चलन वाढविणे सुकर होईल, तर बांगला देशला, कच्चा माल विकला गेल्यामुळे परकी चलन मिळेल. बांगला देशला वस्तू निर्यात करण्यात भारताचा तर फायदा आहेच, पण बांगला देशलाही आर्थिक दृष्ट्या ते फायद्याचेच पडणार आहे. पूर्वी, अखंड पाकिस्तानातील बांगला देशला या वस्तू दामदुप्पट किंमत देऊन घ्याव्या लागत, त्या सरळ भारताकडून आयात केल्यामुळे बांगला देशला या वस्तू जवळजवळ निम्म्या किंमतीतच मिळणार आहेत. अर्थात, ही गोष्ट बांगला देशचे पुनर्वसन होईपर्यंतच चालू राहणारी आहे. भारताने पाकिस्तानचाच कित्ता गिरविणे केव्हाही धोक्याचे ठरेल, परंतु आपली औद्योगिक वाढ साधण्यासाठी बांगला देशबरोबर आयात-निर्यातीचे धोरण सैल ठेवून शक्य तितका कच्चा माल पदरात पाडून घेणे, आणि शक्य तितका पक्का माल बांगला देशला निर्यात करणे भारताला फायदेशीरच आहे. शिवाय यातून बांगला देशची उन्नती साधण्याचे महान कार्यही घडत आहे.

एकंदरीत, परदेशीय व्यापारविषयक बातम्यांमध्ये बांगला देशला अडचणी येण्याचा संभव फार कमी आहे. याला इतर गोष्टींचाही दुजोरा मिळालेला आहे. पाकिस्तान पूर्वी ज्या तीन पायांवर उभा होता, ते म्हणजे 'एक समर्थ मुलकी प्रशासकीय व लष्करी यंत्रणा, अंतर्गत वैमनस्याचा व फाटाफुटीचा अभाव आणि (जागतिक शीतयुद्धाच्या संदर्भात) व्यूहतंत्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्थान'. ह्या तिन्ही गोष्टी बांगला देशमध्येच एकवटलेल्या आहेत. बांगला देशात नैसर्गिक उत्पन्न भरपूर आहे. त्यामुळे त्या देशाला निर्यात वाढविण्यासाठी भरपूर वाव आहे. भरपूर मनुष्यबळाचा उपयोग करून देशांतर्गत उत्पन्न वाढवून, आयात हळूहळू कमी करणेही शक्य आहे. सुदैवाने, बांगला देशला भारतासारखे सहृदय, मानवतावादी मित्र लाभलेले आहेत. याचा बांगला देशाने आपल्या व्यापार-वाढीसाठी पुरेपूर उपयोग करून घेतल्यास 'आमार सोनार बांगला' 'इस्राईल' चा वारस ठरू शकेल!

"डॉक्टर, एक दात काढण्याची आपली फी तीन रुपये आहे. आपण माझ्याकडे नऊ रुपये कसे मागता?"

"दात उपटला जात असताना तुम्ही एवढ्या मोठ्याने ओरडलात की त्यामुळे बाहेर बसलेले दोन इसम पळून गेले. तुम्ही माझे सहा रुपयांचे नुकसान केले नाही काय?"

*

निवडणुकीला उभा राहिलेला एक उमेदवार पशुरोग-चिकित्सक होता. सभेत त्याची टिंगल उडविण्याच्या हेतूने एका वात्रट श्रोत्याने विचारले, "काय हो, तुम्ही तर म्हणे जनावरांचे डॉक्टर आहात?"

"होय" उमेदवाराने शांतपणे म्हटले, "म्हणूनच तुमची प्रकृती तपासायला आलो आहे."

*

हसतमुख रोग्याकडे पाहून डॉक्टर खुशीने म्हणाले, "वा! आज प्रकृती खूपच सुधारलेली दिसते."

"होय; कारण मी तुम्ही दिलेल्या औषधाच्या बाटली-वरची सूचना तंतोतंत पाळली."

"ती कोणती?"

"बाटलीचे बूच घट्ट लावून ठेवावे. ती सूचना काल संबंध दिवसभर मी पाळली आहे डॉक्टर" रोगी उत्तरला.

हेरंब बेडेकर



## वे सुनहरे दिन

हेमा अभ्यंकर

रेकॉर्डिंग चल रहा था।...

"मी डोलकरऽ ऽऽ डोलकर ऽऽ दर्याचा राजा..."

हमारे इन्स्ट्रक्टरके चेहरेपर फैला तृप्तभाव हम देख रहे थे। गाना बहुत अच्छी तरह रिकार्ड किया गया था। केवल एक ही नहीं, आठ प्रदेशोंके लिए आठ गाने एकके आगे एक टेपरिकार्ड करने थे और वे बेहतरीन तरीकेसे रिकार्डभी हो गये। गानेवाले पंजाबी या महाराष्ट्रियन, हार्मोनियमपर मद्रासी, ढोलकपर कन्नड, आंध्रका व्हायोलिन बजैया...लेकिन गाना इतना सुरेला कि मानो सबके दिलोंका सुर एक हो। ये तैयारियाँ २६ जनवरीके समारोहके लिए चल रही थीं। अलग अलग युनिव्हर्सिटीजसे आये छात्र, एक ही जगह मिल-जुलकर रहते थे और दिल लगाकर साथ साथ काम करते थे।

हमारा Republic-day Camp तो भारतके हर प्रांतसे आये हुए युवा-कलाकारोंका मेला बन गया था। कैंपमें बस एक चक्कर लगाया। कहीं गायन, कहीं वादन, कहीं नृत्य-अरूर चलता रहता था। सब छात्र आये थे २६ जनवरीके संचलनमें भाग लेने, लेकिन साथ साथ अपना रसीला, सुरीला सांस्कृतिक कार्यक्रमभी लाये थे।

सब विद्यार्थी जलपान करके सात बजे ही प्रॅक्टिसके लिए चले जाते थे। कोई बांगला देशके टॅब्लोमें तो कोई संग्रामके टॅब्लोमें भाग ले रहा था। कोई झाँकियोंमें अपनी कलाकी झलक दिखा रहा था तो कोई समूह-गानके प्रॅक्टिसके लिए जाता था। हर एक व्यस्त और अपने गुणोंका अधिकाधिक प्रदर्शन करनेमें मस्त। सारा कैंप उत्साहसे और यौवनसे भरा हुआ। हमारे साथ आए हुये प्रोफेसरभी हमारे साथ फिरसे जवान बनकर गाते थे, नाचते थे।

दिनभर प्रॅक्टिस करके थके हुए लड़के और लड़कियाँ शामको खाना खानेके लिये इकट्ठा हो जाते थे फिर गपशप, हास्यविनोदका एकही दौरा चल पड़ता। खानेके बाद सब रंगशालाकी तरफ जाते। ठंड तो इतनी कि पूछो ही मत। लेकिन कौनसी युनिव्हर्सिटी कौनसा कार्यक्रम कर रही है, इसके बारेमें इतनी उत्सुकता मनमें रहती कि गर्मी आप ही आप आ जाती थी।

हर कार्यक्रम चुना और चुना हुआ। हर युनिव्हर्सिटी दिल लगाकर अपना कार्यक्रम पेश करती थी और वह पसन्द भी बहुत किया जाता था। हमारी युनिव्हर्सिटीका (पूना युनिव्हर्सिटी) "महाराष्ट्र-दर्शन" वाला टॅब्लो और भारूड बहुत पसन्द किया गया। जब हमारे पंजाबी या मद्रासी भाईबहन गलत शब्दोंके साथ ही भारूड गाने लगते तब बहुत मज़ा आ जाता। जब हम कन्नड गाना बिलकुल उन्हींकी अदासे गाने लगते तो हमारी कन्नड सहेलियाँ तो फूली नहीं समाती थीं।

२६ जनवरीके दिन विजय-चौकसे लेकर नॅशनल स्टेडियमतक जो जुलूस निकला, उसमें युनिव्हर्सिटीज्के छात्रोंके पेश किये हुये "आयटेम्स" बहुत अच्छे साबित हुए। १९७१ का पूरा वर्ष भारतके इतिहासमें हर प्रकारसे महत्त्वपूर्ण रहनेके कारण इस गणतंत्र दिनका महत्त्व कुछ

# आमचा मान : आमचा अभिमान



कु. हेमा अभ्यंकर



कु. प्रतिभा कान्हेरे



शाम सदाशिव वाघ

कु. हेमा अभ्यंकर  पदवीपूर्व साहित्य परीक्षेत पुणे विद्यापीठात चवथा क्रमांक व प्रथमवर्ग; भारताच्या प्रजासत्ताक दिनासाठी निवड.

कु. प्रतिभा कान्हेरे : पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत विद्यापीठात चवथा क्रमांक, प्रथमवर्ग.

शाम सदाशिव वाघ : पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत विद्यापीठात सहावा क्रमांक, प्रथमवर्ग.

## प्रथमवर्ष शास्त्र : प्रथम वर्गाचे मानकरी



विजय कोकणे



कृष्णा घाटगे



अनंत सरोदे



श्यामसुंदर महाजन



कु. माधुरी हळवे



सोहनलाल जैन

## पदवीपूर्व शास्त्र : प्रथम वर्गाचे मानकरी



कु. अरुणा करडे



संजय कुलकर्णी



श्रीकांत मेहेंदळे



श्रीकांत [illegible]



विवेक निवर्गी



अशोक सावंत



पी. कृष्णकुमार



मुरलीधर पवार



किशोर चौधरी



सतीश चिटणीस



अमरसिंग देसाई



मुरलीधर धांडे



सुहास घसास



हेमंत गोळे



चंद्रशेखर जयवंत



कु. अरुणा काळुसकर

ज्यादा था। उसी प्रकार यह दिन विजयोत्सवभी था। इसी पार्श्वभूमिपर कुछ कार्यक्रम पेश किये गये। स्वातंत्र्य-संग्रामका टॅब्लो, बांगला देशका टॅब्लो, छात्रोंनेही पेश किया। धर्मचक्र जो कि समाजवादका प्रतीक बनाया गया उसे भी छात्रोंनेही पेश किया। प्रगतिपथपर चलनेवाली "भारत स्पेशल" ट्रेनभी बनायी गयी, जिसमेंसे भारतके हर समाजका प्रतिनिधि सैर करता दिखाई दे रहा था, जो भारतके हर प्रदेशके लोकगीतोंकी धुनपर झूमती आगे बढ़ रही थी, छात्रोंके परिश्रमकाही मूर्त स्वरूप थी। इसी ट्रेनमें मैं नर्स बनी थी।

इस तरह २६ जनवरीके दिन मनाए जानेवाले गणतंत्र दिवसके उत्सवमें शरीक होनेके लिए आए हुए मेहमान, दिल्लीवालोंके मनमेंभी यादगार बनके रहे। लेकिन २६ जनवरीके बाद जब ये अपने अपने घर जाने लगे, तब पंद्रह दिन, एक साथ अनुभव किए हुए सुनहरे क्षण, मानो आँखोंमेंसे बरस पडे। नयी नयी सहेलियाँ, जो शायद कभी फिरसे मिलेंगी भी नहीं, जाते वक्त हमें रुला गयीं। हमभी दिल्लीमें बिताए हुए दिनोंकी कई यादें फिरसे मनमें जगाते हुए गाडीमें बैठे और उस सपनेको याद करते करतेही पूना पहुँचे। दिल्ली जा कर कुछ ऐसा पाया जो ज़िंदगीमें बार बार नहीं पाया जाता।



पहिला : ही गाय आणि वासरू कोणाचे आहे?
दुसरा : गाईची माहिती नाही, परंतु वासरू कोणाचे ते माहीत आहे!
पहिला : कोणाचे आहे ते?
दुसरा : गाईचे.

*

चिनी : त्यात काय झालं? आम्ही पुढल्या वर्षी चार जणांना सूर्यावर पाठविणार आहोत.
अमेरिकन : परंतु मूर्खा, सूर्यावर जाताना सर्वजण जळून जातील ना.
चिनी : अरे हट्! आम्ही त्यांना रात्री पाठविणार आहोत.

*

महिलामंडळात पुष्कळ गोंधळ चालला होता. व्यवस्थापकसुद्धा या गोंधळामुळे त्रासून गेले. शेवटी अध्यक्ष म्हणाले, "बडबड करणे ही चांगली गोष्ट नव्हे. परंतु वृद्ध स्त्रियांना बडबड करण्याची सवय लागलेली असते. म्हणून ज्या स्त्रिया वृद्ध असतील त्यांनी सोडून बाकीच्यांनी गप्प राहावे." त्यामुळे लगेच सभेत शांतता स्थापन झाली.

*

एका सरकारी ऑफिसात फाइलींचा ढीग साठला होता. त्यामुळे फाईलींचा निकाल लावण्यासाठी वरच्या ऑफिसला विचारणा झाली. वरून उत्तर आले, "स्टोअरमध्ये ठेवून द्याव्यात". ऑफिसातून परत विचारणा झाली, "की स्टोअररूममध्ये जागा नाही. तरी त्यांचा नाश करण्याची परवानगी मिळावी."

वरून उत्तर आले. "फाइलींचा नाश करण्याची परवानगी देण्यात येत आहे. परंतु नाश करण्यापूर्वी सर्व फाइलींची नक्कल करण्यात यावी."

*

इंग्लंडला जाऊन आलेल्या मंत्र्याची बायको आपल्या मैत्रिणीशी गप्पा मारीत होती. इंग्लंडची माहिती सांगताना ती म्हणाली "लंडन हे फार गजबजलेलं शहर आहे. तेथील माणसे एवढी शिकलेली आहेत की रस्त्याचे झाडूवाले देखील इंग्रजीतून बोलतात."

संकलक : सतीश शहा

## DEPOSIT MOBILIZATION BY BANKS :

**Miss Pratibha Kanhere**

Money is the centre around which all the economic science clusters. Therefore monetary policy is the pivotal policy for a country. Banks are responsible to a large extent to work out the monetary policy successfully. Deposit mobilization is one of the most important aspects of the monetary policy; and hence receives primary consideration. Especially in underdeveloped countries deposit mobilization achieves special significance.

One of the remarkable features of an underdeveloped country is that itcons ists of an organised sector and an unorganised sector and the major sector is the unorganised one. The existence of sufficient amount of capital, modern techniques and equipment is a characteristic of the organised sector and so the development and progress takes place in this sector very rapidly. But the returns of progress are pocketed by a few wealthy capitalists who can control and regulate this sector. Thus the fruits of the economic development are enjoyed by the capitalist class who reaches greater heights of material prosperity and substantially consolidates its position in social hierarchy. Thus the wealth of the nation is concentrated in the hands of a few.

Lack of funds is a crucial difficulty in the development of an underdeveloped country. Many obstacles to development are both cause and consequence of poverty. The nation is caught in the vicious circle of poverty and hence efforts at development are thwarted. Due to low income, savings are low which results into low capital accumulation. Thus the main difficulty faced by the country is lack of capital and the consequence is low standard of living,

Uneducated masses is another hindrance in the development. Due to lack of education the importance of savings is not known to the common people and saving habit which is essential for sustained growth is not developed.

In course of economic development rising prices become a necessary concomitant of developmental expenditures. In course of development the government has to undertake various activities such as construction of roads, dams, factories etc. Their benefit however is not achieved in a short period. They fructify in the long run and in the initial stages expenditure increases but the production does not. Inflation is the obvious consequence of this and inflation itself later on becomes an obstacle in the way of

economic development. Due to inflation prices show rising tendencies and so the entrepreneurs' plans become useless. In fact, they cannot plan at all. Due to rising prices the actual cost becomes considerably greater than the estimates and so development is restricted. Another consequence of inflation is that due to inflation the gap between the rich and the poor becomes still wider.

We cannot find a panacea for this. But deposit mobilization can be stated as an important remedy. In increasing the productivity and thus the national income of the country, deposits play a very important role.

Instead of hoarding money if the people keep their tiny savings in the banks this proves to be very useful. The individual savings are but a drop in a bucket when compared with financial needs. But when these tiny savings are brought together they mean huge funds for the development. So it is very necessary to collect and mobilize the small savings of the people and channellise them into productive uses. When the savings are channellised to productive use this leads to capital accumulation.

In order to increase the mobilization, banks should try to link the organised sector with the unorganised sector. These two sectors are two parts of the economy and so there should be some connection between them. But unfortunately they are not linked and so their activities are not co-ordinated. This results in restricting development and so the banks should establish a contact with the unorganised sector and thus increase deposit mobilization.

For controlling inflation saving must be increased. For this it is necessary that whenever and wherever income increases savings should increase. Today we see that surplus is created in agricultural sector. So agriculturist should be persuaded to save and his savings should be mobilised to productive uses. Thus inflation can be avoided and through mobilization productivity can be increased.

Time deposits are more useful in this respect. Time deposits can be invested for a definite period and the banks are not required to keep any cash reserves as far as their repayment is concerned. They are useful because long term investments can be undertaken. But the statistics show that though the total deposits have increased very rapidly the proportion of saving deposits to time deposits as on July 1971 is 43·6 : 66·4. This indicates that the pace of time-deposit growth is pretty show and is being achieved through paper rather than by mobilizing the true savings. In a developing economy a constant watch has to be kept on the rate of growth vis-a-vis the rise in prices and also the rate of expansion of bank credit to the government. Unless a proper relationship among all these variables is first established the expanding public sector may go on pushing up paper deposits through the medium of credit to the Government culminating ultimately in an irreversibly rising price spiral.

Hence efforts should be made to increase deposits, especially the time deposits. Today we see that the banks are working on traditional lines. But just as too many cooks can't improve the dinner, too many banks

working in the same field cannot substantially increase the productivity. So the banks should enter into such fields as are fertile yet unutilised. It is easily traceable that surplus is created in agriculture and bank procedure which is generally in English is not followed by cultivators. They should be convinced that the bank's motive is to serve the people and their time in coming and going is also saved. The transactions of banks should be done in regional languages. The bank in villages should appear like the office of the moneylenders sc that the farmers will feel familiar with them and will come to the banks.

Thus we see that for the overall economic growth of our Indian economy which has not yet reached the point of take-off, deposit mobilization is a very important fuuction. Especially the time deposits should be increased and for that banks should adopt different measures because deposit mobilization and development go hand in hand a like strength and unity.

## प्रतिज्ञा व श्रद्धांजली

*१८ डिसेंबर १९७१ च्या विद्यार्थि-सभेत केलेली व लिहिलेली*

रणांगणावरील लढाई आपण एकजुटीने व एकदिलाने जिंकली आहे आणि या विजयाने सामाजिक समतेच्या लढ्याच्या एका नव्या पर्वात आपण उतरत आहोत. रणांगणावरील विजयाबरोबरच या नव्या लढ्यासाठी आपण सिद्ध झाले पाहिजे व रणांगणावरील विजया-प्रमाणेच येथेही विजय प्राप्त करून घेतला पाहिजे. संघटना, ऐक्य, मानवता ही देशाची खरी शिदोरी आहे. ही जागृत झाली आहे. तिची आपण निष्ठेने उपासना केली पाहिजे.

आपल्यातील अंतर्गत हेवेदावे, जातिभेद, सामाजिक विषमता, स्वार्थ, पिळवणूक, दारिद्र्य, गैरशिस्त, आळस व गोंधळ यांच्याविरुद्ध या मंगलप्रसंगी आम्ही सारे एकदिलाने व प्रयत्नपूर्वक लढू अशी आम्ही प्रतिज्ञा करीत आहोत.

मॉडर्न महाविद्यालयातील आम्ही सारेजण आमच्या कर्तव्याच्या जाणिवेने आचरण करू व सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अंतःकरणपूर्वक प्रयत्न करू अशी आजच्या प्रसंगी शपथ घेत आहोत. देशाच्या या आणीबाणीच्या प्रसंगी स्वार्थत्याग हीच महत्त्वाची कसोटी असते हे लक्षात घेऊन आम्ही जास्तीत जास्त बचत करू, अनाठायी खर्च करणार नाही व जवानांनी आपल्यासाठी जे बलिदान केले त्याचे सतत स्मरण ठेवू, असे आश्वासन आम्ही या ठरावान्वये देत आहोत.

●

ज्या शूर जवानांनी, अधिकाऱ्यांनी देशासाठी आपले प्राण वेचले, रक्त सांडले व बलिदान केले त्यामागे आपल्या देशाचे स्वातंत्र्य व लोकशाही अबाधित राहावी हा असीम त्याग होता याची आम्हांला जाणीव आहे. आम्ही सारे शूर भारतीय सैनिकांच्या या बलिदाना-बद्दल कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. आपल्या शूर सैनिकांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही याची आम्हांला जाणीव आहे. त्यांच्या स्मृतीला वंदन करून आम्ही ही श्रद्धांजली व्यक्त करीत आहोत.



## नटणं — एक वेड ?

कुमुद जोशी

बापू—आमच्या शेजारचे म्हातारे गृहस्थ. त्यांचा उद्योग म्हणजे आजूबाजूला जे दिसेल त्यातले दोष काढावयाचे. सायंकाळी फिरून आले की माझ्याजवळ चर्चा करावयाची. बरं मीच काय ती त्यांची शिकार व्हायची. बाकी कोणी गप्पा ऐकण्यासाठी त्यांच्या वाऱ्याला देखील थांबत नसत. हल्ली त्यांना वेड लावलंय ते आधुनिक नटण्यानं.

रोज फिरून आले की आज कोणती 'स्टाईल' पाहिली, कपड्याचे रंग, आकार कसे होते? केशरचना कशी होती? रंग-साम्य-मॅचिंग कसे दिसले यांवर खूप चर्चा, नव्हे टीका करीत. त्यांचे म्हणणे हे की या नटण्यानं उगीच वेळ, पैसा, सौंदर्य, चैतन्य वाया घालविण्यासारखे आहे. आणि नैसर्गिक सौंदर्य हेच खरे सौंदर्य. नटण्याने ते न वाढता उलट कमी होते. आणि हळूहळू रंगात आले की खूप भडकतात. कधी वृद्धा दिसली आणि तीही छानछोकीत राहणारी की मग काय विचारायला नको. त्यांच्या वाणीपुढे गडकरीसुद्ध पिके पडतात. आणि मग वेळेचे भानसुद्धा राहात नाही त्यांना!

पण पुष्कळदा त्यांच्या बोलण्याला अर्थ नसतो, त्यातलंच हे बोलणं. ते असं एवढं चिडून का बोलतात? मुलं, स्त्रिया नटल्या तर त्यांना एवढा राग का येतो तेच समजत नाही. मनुष्य नटतो म्हणजे काही पाप करतो? निसर्गाने जसा मनुष्यदेह केलाय तसाच ठेवायचा की काय? मग लज्जारक्षणार्थ कपडे तरी कशाला? पूर्वज सालींनी—पानांनी लज्जारक्षण करीत होते. पण आपण विविध वस्त्रे वापरून करतो ही प्रगतीच आहे ना? बरं—नटणं वाईट—त्याने शील बिघडते! नटण्याचे वेड हे दारूच्या व्यसनासारखे आहे असे सांगणारे गृहस्थ सांगताना वजनदार शब्द वापरतात. शाब्दिक कसरत करतात. हेही एकप्रकारे भाषेला नटविण्यासारखेच आहे ना! सारांश, त्यांनाही नटविण्याचं वेड आहेच की.

नटणे म्हणजे वेधक कपडे घालणे, केशसंभार रचनाबद्ध करणे, चेहऱ्याला रंगरंगोटी करणे, डोळे, भिवया, ओठ कोरणे एवढाच अर्थ घेतला तर तो संकुचित होईल. कारण तो फक्त शरीरभूषणापुरताच होईल. अरुंद पँट, आखूड सदरा, रंगीत ओढ, केसांची झुलपे, कपड्यांमधील रंग—साम्य दर्शन म्हणजे नटणे हा अर्थ काही अंशी फोल ठरतो.

नटणं हे निसर्गातच नाही का? भाद्रपदाच्या दुसऱ्या पंधरवड्यात निसर्ग इंद्रधनुष्य सोडून प्रकाशकिरणांना नटवतो. तो काय वेडा म्हणून? वसंतात वृक्षांना पालवीची आभरणा चढून ते नटतात ते काय नटण्यात अर्थ नाही म्हणून? वादळ वारा तुफान वाहात असतो. ढगांचा गडगडाट होत असतो. सगळीकडे अंधाराचं साम्राज्य (सावट) पसरू पाहात असतं. अशा वेळी विजेचा झोत साऱ्या आसमंताला क्षणभर नटवून जातो. ते निसर्गात नटणं, नटवणं असतं म्हणूनच ना!

हिरवे गवत झाडाची पाने ही हिरवीच हे निसर्गाचे रंग-साम्य दर्शन नव्हे काय? झाडावरील फळे फुले हे तर त्यांचे दागिने, अलंकार. सकाळच्या वेळेला आकाशात लाली आलेली असते तर सायंकाळी अनेक संध्याराग दिसत असतात. हे सुद्धा नटणंच ना! मग जर निसर्गात नटण्याचं वेड असलं तर काय बिघडलं कुठं? बोलून चालून माणूस हा निसर्गाचं अपत्य नाही का?



## दुसऱ्या महायुद्धानंतरच्या ६१ लढाया

**संग्राहक : रवींद्र गुहागरकर**

१९४५ सालानंतर म्हणजेच दुसऱ्या महायुद्धानंतर आतापर्यंत सुमारे ६१ युद्धे लढली गेली. त्यांची संपूर्ण यादी खालीलप्रमाणे आहे.

[ १ ] इंडोनेशिया १९४५ ते १९४७
नेदरलँड्स् विरुद्ध बंडखोर
[ २ ] चीन १९४५ ते १९४९
राष्ट्रवादी विरुद्ध कम्युनिस्ट
[ ३ ] मलाया १९४५ ते १९५४
ब्रिटनविरुद्ध कम्युनिस्ट बंडखोर
[ ४ ] इंडो–चायना १९४५ ते १९५४
फ्रान्स विरुद्ध व्हिएटमिन्ह
[ ५ ] ग्रीस १९४६ ते १९४९
सरकारविरुद्ध एलास बंडखोर
[ ६ ] भारत १९४७ ते १९४९
हिंदू विरुद्ध मुस्लीम
[ ७ ] काश्मीर १९४७ ते १९४९
भारत विरुद्ध पाकिस्तान
[ ८ ] फिलिपाइन्स १९४८ ते १९५२
सरकार विरुद्ध हक्स्
[ ९ ] इस्रायल १९४८ ते १९४९
इस्रायल विरुद्ध अरब
[१०] ब्रम्हा १९४८ (चालू)
सरकार विरुद्ध कम्युनिस्ट प्रदेश
[११] कोरिया १९५० ते १९५३
युनायटेड नेशन्स् व द. कोरिया विरुद्ध चीन व उ. कोरिया
[१२] फार्मोसा १९५० (चालू)
राष्ट्रवादी विरुद्ध कम्युनिस्ट
[१३] तिबेट १९५० ते १९५९
चिनी कम्युनिस्ट विरुद्ध तिबेटवासी
[१४] केनया १९५२ ते १९५३
ब्रिटन विरुद्ध माउ माउ
[१५] क्वेमॉय-मात्सु १९५४ ते १९५८
चिनी राष्ट्रवादी विरुद्ध चिनी कम्युनिस्ट
[१६] अल्जेरिया १९५४ ते १९६२
फ्रान्स विरुद्ध बंडखोर
[१७] सुदान १९५५ (चालू)
अरब विरुद्ध काळे
[१८] सायप्रस १९५५ ते १९५९
ब्रिटन विरुद्ध एओका बंडखोर
[१९] शिनाई १९५६
इस्रायल विरुद्ध इजिप्त
[२०] हंगेरी १९५६
रशिया विरुद्ध बंडखोर
[२१] सुवेझ १९५६
ब्रिटन व फ्रान्स विरुद्ध इजिप्त
[२२] लेबेनॉन १९५८
युनायटेड स्टेटस् व लेबेनीज विरुद्ध बंडखोर
[२३] क्वायू १९५८ ते १९५९
सरकार विरुद्ध कॅस्ट्रो बंडखोर
[२४] व्हिएटनाम १९५९ (चालू)
युनायटेड स्टेटस् व द. व्हिएटनाम विरुद्ध व्हिएट-कॉँग व उ. व्हिएटनाम
[२५] हिमालय १९५९ ते १९६२
भारत विरुद्ध लाल चीन

[२६] रुआन्दा – बुरुंडी १९५९ ते १९६४
वातुसी विरुद्ध हुतु
[२७] लाओस १९५९ (चालू)
सरकार विरुद्ध पाथेट लाओ
[२८] कांगो १९६० ते १९६७
सरकार व युनायटेड नेशन्स् विरुद्ध बंडखोर
[२९] व्हेनेझुएला १९६० ते १९६७
सरकार विरुद्ध कम्युनिस्ट प्रदेश
[३०] कोलंबिया १९६० (चालू)
सरकार विरुद्ध बंडखोर
[३१] क्यूबा १९६१ (पिगच्या उपसागर)
क्युबन बंडखोर व युनायटेड स्टेटस् विरुद्ध सरकार
[३२] गोवा १९६१
भारत विरुद्ध पोर्तुगाल
[३३] कुवेत १९६१
ब्रिटन विरुद्ध इराक
[३४] अँगोला १९६१ (चालू)
पोर्तुगाल विरुद्ध बंडखोर
[३५] येमेन १९६२ (चालू)
राजनिष्ठ विरुद्ध सरकार व इजिप्त
[३६] प. न्यू गिनी १९६२
नेदरलँड्स् विरुद्ध इंडोनेशिया
[३७] क्यूबा १९६२
रशिया व क्यूबा विरुद्ध युनायटेड स्टेटस्
[३८] पोर्तुगीज गिनी १९६२ (चालू)
पोर्तुगाल विरुद्ध बंडखोर
[३९] अल्जेरिया–मोरोक्को १९६३
अल्जेरिया विरुद्ध मोरोक्को
[४०] व्हेनेझुएला १९६३
सरकार विरुद्ध बंडखोर
[४१] मलेशिया १९६३ (चालू)
ब्रिटन व मलेशिया विरुद्ध इंडोनेशिया
[४२] झांजिबार १९६४
काळे विरुद्ध अरब
[४३] ब्राझील १९६४ (चालू)
सरकार विरुद्ध बंडखोरांचा प्रदेश
[४४] थायलंड १९६४ (चालू)
सरकार विरुद्ध लाल प्रदेश
[४५] मोझांबिक १९६४ (चालू)
पोर्तुगाल विरुद्ध बंडखोर
[४६] डोमिनिकन रिपब्लिक १९६५
सरकार विरुद्ध बंडखोर
[४७] पेरू १९६५
सरकार विरुद्ध बंडखोर
[४८] पाकिस्तान–भारत १९६५
पाकिस्तान विरुद्ध भारत
[४९] इंडोनेशिया १९६५ ते १९६६
कम्युनिस्ट विरुद्ध मुस्लीम सरकार
[५०] नायजेरिया–बायफ्रा १९६६ ते १९७०
सरकार विरुद्ध बंडखोर
[५१] इस्रायल १९६७ (चालू)
इस्रायल विरुद्ध अरब
[५२] चेकोस्लाव्हाकिया १९६८
रशिया विरुद्ध चेकोस्लाव्हाकिया
[५३] मलेशिया १९६९
मलेशियन विरुद्ध चायनीज व इंडियन्स
[५४] एल् सालवाडोर १९६९
होनडूरस विरुद्ध एल् सालवाडोर
[५५] चाड १९६९ (चालू)
फ्रान्स व सरकार विरुद्ध बंडखोर
[५६] नॉर्दर्न आयर्लंड १९६९ (चालू)
कॅथालिक्स् विरुद्ध प्रोटेस्टंट
[५७] गिनी १९७०
सरकार विरुद्ध बंडखोर
[५८] ग्वाटेमाला १९७० (चालू)
सरकार विरुद्ध प्रदेश
[५९] ओमन १९७० (चालू)
सरकारविरुद्ध बंडखोर
[६०] एथिओपिया १९७० (चालू)
सरकार विरुद्ध मुस्लीम बंडखोर
[६१] बांगला देश १९७१
प. पाकिस्तान विरुद्ध बांगला देश



# गरीब

**चेकाव**

**अनुवादक : कु. जोत्स्ना विंझे**

मुलांना गोखलेबाईंची शिकवणी ठेवली होती. काही दिवसांपूर्वी मी त्यांना बोलावणे पाठविले व माझ्या अभ्यासिकेत त्यांची वाट पाहात बसलो.

" बसा, बाई ! " त्या आल्यावर त्यांना मी आसन देऊ केले आणि म्हटले, " हं, आता आपण तुमचा हिशेब पुरा करू या. सणासुदीचे दिवस जवळ आले आहेत आणि पैशाची अतिशय गरज असताही संकोची स्वभावामुळं तुम्हांला पैसे मागण्याचा धीर होत नसेल म्हणून मुद्दाम मी तुम्हांला बोलावून घेतलं. बरं, ते राहू द्या. मला वाटतं महिन्याला तीस रुपये देण्याचा आपल्यामध्ये करार झाला होता ? "

" चाळीस. "

" नाही हो, तीस रुपये. मी त्याची डायरीमध्ये नोंद ठेवली आहे. मी यापूर्वीदेखील शिकवणीदाखल सगळ्यांना तीस रुपयांवरच ठेवलं होतं. बरं, ही गोष्ट नक्की झाली !... नंतर, तुमची शिकवणी सुरू होऊन दोन महिने झाले, तेव्हा..."

" दोन महिने पाच दिवस. "

" नाही, नाही. बरोबर दोनच महिने. मी इथं त्याची बरोबर नोंद केली आहे. आता तुम्हांला साठ रुपये दिले पाहिजेत. त्यांमधून नऊ रविवार काढून टाका...आणि... तुम्ही निशीची कोणत्याच रविवारी शिकवणी घेतली नाही. रविवारी त्याच्याबरोबर पर्वतीला फिरावयाला जात होता, तसंच या काळात मध्ये तीन सुट्या..."

गोखलेबाई संतापाने लाल झाल्या. त्यांचे मुळातून गोरे असलेले नाक तापलेल्या नळीप्रमाणे दिसू लागले. परंतु आपल्या चुरगळलेल्या पदरावरून हात फिरवून तो साफ करण्यापेक्षा त्या काहीच बोलल्या नाहीत.

" तीन सुट्या ! म्हणजे बारा रुपये कमी झाले. चार दिवस निशी आजारी होता आणि त्याच्या शिकवणीला सुट्टी दिली होती आणि त्यामुळे तीन दिवस नुसत्या लिलीला तुम्ही शिकवलंत...तीन एक दिवस तुम्हांला दातदुखीचा त्रास होत होता म्हणून आमच्या मंडळींनी तुम्हांला अर्धा तासच शिकवणी घ्यायला सांगितलं होतं...बारा आणि सात...म्हणजे बारान् सात... एकोणीस...वजा करा...म्हणजे... म्हणजे ! !...एकेचाळीस रुपये...बरोबर ! "

गोखलेबाई थरथर कापत होत्या आणि त्यांचे डोळे अश्रूंनी डबडबले होते. त्यांना सौम्य खोकल्याची एक उबळ आली आणि भरलेले नाक शिंकरून त्या तशाच बसून राहिल्या. एक शब्द नाही.

" आणि हे पाहा, मी विसरलोच होतो ! " आपल्या डायरीची पाने चाळीत मी पुढे म्हटले, " गणेशोत्सवाच्या वेळी तुमच्या हातून चहा घेताना कपबशी फुटली. त्याचे दोन रुपये कमी करा. तुम्ही फोडलेला कप भारी किमतीचा होता. आमच्या लग्नात प्रेझेंट मिळालेला...पण ते जाऊ द्या. बरं आणखी काय राहिलं ? हो...तुमच्या निष्काळजीपणामुळं निशी एकदा अंगणातील झाडावर चढला आणि आपला स्वेटर त्याने फाडून घेतला. त्याचे दहा रुपयेच धरू या...फार नको...तसंच तुम्ही लिलीला एकदा देवळात घेऊन गेला होता आणि तुमचं लक्ष नसल्यामुळं तिच्या चपला चोरीला गेल्या. माणसाचं कसं सगळीकडं लक्ष पाहिजे...त्याचे पाच रुपये...आणि ...ऽ आणि काल दसऱ्याच्या सुमाराला मी तुम्हाला दहा रुपये दिले. "

" तुम्ही नाही दिले ! " बाई हळूच पुटपुटल्या.

" मग माझ्या डायरीत ही नोंद कुठून आली ! "

" बरं...ठीक आहे. "

" आता एकेचाळिसांमधून सत्तावीस काढून टाका.

## पदवीपूर्व शास्त्र : प्रथम वर्गाचे मानकरी


अभिमन्यु पिंगळे


दत्तात्रय न्यायाधीश


वसंत सवाखंडे

## पदवीपूर्ण वाणिज्य : प्रथम वर्गाचे मानकरी


कु. मीना जोग


कु. लता कुबेर


जयंत अभ्यंकर


दिलीप नाईक


सुभाष नाईक


कु. संध्या साठे

## पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलताना




१. प्रमुख पाहुण्या सौ. कमलाबाई आपटे, २. अ. मि. तांबे, ( G. S. ) ३ उदयकुमार लागू ( ICSR, Gents )
४. कु. शैलजा कुलकर्णी ( ICSR, Ladies ), ५. श्री. वि. त्र्यं. ताटके. कार्यवाह, प्रोग्रेसिव्ह एज्यु. सोसायटी
व्यासपीठावर :—प्राचार्य लिमये, श्री. वि. द. घाटे, सौ. आपटे




सौ. आपटे यांच्या हस्ते जनरल चँपियनशिपची ढाल
आयना हे स्वीकारीत आहेत.



'येऊ का ?' – छायाचित्र : सुहास घैसास
कला सहकाराने आयोजित आंतर महाविद्यालयीन
छायाचित्रस्पर्धेत पहिले पारितोषिक

म्हणजे ...५ म्हणजे ...सातन् चार अकरा. हातचा एक एकन् दोन तीन आणि तीनन् एक चार... म्हणजे चौदा रुपये राहिले."

दोन्ही डोळे पाण्याने भरून आले. सारे शरीर थरथरू लागले. क्षीण, टोकदार नाकाच्या शेंड्यावर घामाचे थेंब जमा झाले. गरीब बिचारी!

"फक्त एकदाच मी तुमच्याकडून पैसे घेतले होते." अगदी क्षीण व रडवेल्या आवाजात त्या म्हणाल्या, "आणि तेही तुमच्या मिसेसकडून... फक्त तीन रुपये... त्यानंतर एकही पैसा घेतला नाही..."

"खरंच! म्हणजे आता तुम्हीच पाहा. मी त्याची नोंद ठेविलीच नव्हती म्हणजे चौदा मधून पुन्हा तीन काढून टाकले पाहिजेत... म्हणजे फक्त अकराच राहिले का! हं, घ्या ही तुमची रकम. ह्या पाचापाचाच्या दोन व वरती ही एकाची नोट!"

मी त्यांना अकरा रुपये दिले. त्यांनी ते थरथरत्या हाताने मुकाट्याने उचलले व तसेच चुरगळून रुमालात सरकवले.

"उपकार..." त्या पुटपुटल्या.

"उपकार! कसले उपकार!" मी विचारले.

"पैसे दिल्याबद्दल..."

"अहो, पण मी तुम्हांला बनवलं, फसवलं, खरोखर तुमच्या रकमेवर सरळ सरळ घाला घातला, तुमचा खिसा कापला. मग उपकार...उपकार कसले!"

"दुसऱ्या ठिकाणी लोकांनी एवढंही दिलं नाही, काहीच दिलं नाही."

"काहीच दिलं नाही! काहीच नाही!...त्यात आश्चर्य कसलं! मी तुमची केवळ गंमत केली. एक निष्ठुर धडा... केवळ तुम्हांला धडा शिकविण्यासाठी...मी तुम्हांला तुमचे सगळेच्या सगळे ऐंशी रुपये देणार आहे! हे पाहा, इथं एका पाकिटात दहाच्या आठ नोटा घालून ठेवून दिल्या आहेत...खरोखर इतकं कणाविहीन असणं तुम्हांला शक्य आहे? तुम्ही विरोध का करीत नाही? थोडीशी मान का उंचावीत नाही? का इतक्या शांत राहता? या जगात कसलेच छक्केपंजे न ठेवता कसं राहता येईल? का अगदीच अशा खुळ्या हो तुम्ही!"

त्या नुसत्याच हसल्या परंतु त्यांचा चेहरा बोलका होता. जणू सांगत होता की, "हे सर्व शक्य आहे!"

मी त्यांची क्षमा मागितली, इतके निष्ठुर नाटक रंगविल्याबद्दल! आणि त्यांना ऐंशी रुपये दिले. त्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचा छोटासा भाव प्रगटला. जाताना फक्त सौम्य स्वरात "उपकार" एवढेच त्या पुटपुटल्या आणि हळूहळू पावले टाकीत त्या निघून गेल्या.

त्यांना जात असताना मी पाठमोरे पाहिले आणि स्वतःशीच म्हटले,

"गरिबांना पिरडणं या जगात किती सोपं आहे!"

❀

**१८ डिसेंबर १९७१ रोजी मॉडर्न महाविद्यालयातील विद्यार्थि-प्राध्यापक सभेतील ठराव**

मॉडर्न महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी हे भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहेत. कालच्या भारत-पाक युद्धात त्यांनी दाखविलेले असीम धैर्य, स्वार्थत्याग, संयम व मुत्सद्देगिरी ही भारताच्या इतिहासात अपवादात्मक गणावी लागतील. लोकशाहीच्या व मानव्यतेच्या प्रतिष्ठेसाठी भारताने त्यांच्या नेतृत्वाखाली हा देदीप्यमान इतिहास घडविला आहे. पंतप्रधानांच्या खंबीर व दूरदर्शी नेतृत्वाने व निर्णयाने या देशाची शान व प्रतिष्ठा वाढीला लागलेली आहे व या देशाची अस्मिता नव्याने साऱ्या जगाला प्रतीत झाली आहे. विजयाच्या अत्युच्च शिखरावर असताना ही त्यांनी ज्या संयमाने, निष्ठेने देशाला मार्गदर्शन केले व विनम्रतेचा धडा घालून दिला, त्याबद्दल आम्ही सारे एकमुखाने पंतप्रधानांचा हर्षपूर्वक गौरव व जयजयकार करीत आहोत, व श्रीमती इंदिरा गांधींच्या रूपाने असे नेतृत्व आम्हांला लाभल्याबद्दल या ठरावान्वये धन्यता व्यक्त करीत आहोत.

## आमचा पत्ता आपले लक्षात असू द्या !

आम्ही सर्व प्रकारची जुनी पुस्तके (शालोपयोगी, कॉलेजास लागणारी, मनोरंजक, धार्मिक, कादंबऱ्या इत्यादी) योग्य किंमत देऊन विकत घेतो व शक्य तितक्या कमी किंमतीत विकतो व नवी पुस्तके योग्य कमिशनने विकतो.

### न्यू पूना बुक डेपो

अप्पा बळवंत चौक, पुणे ३०.

लक्षात ठेवा

### वंदना बेकरी जनरल स्टोअर्स

बेकरीचा ताजा माल व इतर वस्तूंसाठी

४१८ शिवाजीनगर

जंगली महाराज देवळासमोर, पुणे ५.

### वंदन टेलर्स

जेन्ट्स स्पेशालिस्टस्

२४५ नारायण पेठ, लक्ष्मी रोड, पुणे ३०.

निर्भेळ खाद्यवस्तूंसाठी जनतामान्य झालेले,
डी. बी. गोडसे यांचे

### रंगमंदिर कॅन्टीन

बालगंधर्व रंगमंदिर, पुणे ५

शाखा नं. २ :
मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर, पुणे ५

आमचा कॅफेटेरिया विभाग मोकळ्या हवेत सायंकाळी ५ पासून रात्री ११ पर्यंत चालू असतो.
निरनिराळे चविष्ट पदार्थ, व रोज नवीन पदार्थ
मंगल प्रसंगाच्या अल्पोपाहाराच्या ऑर्डर्स आम्ही स्वीकारतो.

## फकिरचंद रामचंद खिंवसरा

१६८ शिवाजीनगर, पुणे ५

### मनिलेन्डर्स आणि बँकर्स

आमच्याकडे योग्य तारणावर कर्ज मिळेल.



# रामभौ !

लता कुबेर

" बरं, मग कसं काय रामभाऊ ? " मी विचारले.

" दिसत नाही का माझं कसं काय चाललंय ते ! दुरून चौकशी करणारी माणसं तुम्ही, कडेचे पोहणारे साले, एकलव्या परित्यज्या सदासुखी भव । " रामभाऊ कडाडले.

" अहो, पण एवढं रागवायला काय झालं रामभाऊ ? " –इति मी.

" तू माझ्याशी एक शब्द बोलू नकोस, जा जा चालायला लाग. मूर्खाणाम् शिरोमणी. "

झालं, आमचा आवाज बंद झाला. असे हे आमचे शेजारी रामभाऊ. आमच्या गावचे मोठे प्रख्यात बातमीदार. म्हणाल तर शहाणा अन् म्हणाल तर वेडा असा हा माणूस. पण शहाण्यालाही वेडे करण्याचं सामर्थ्य होतं त्यांच्या अंगात.

दिसायला म्हणाल तर साधारण बुटका, अगदी देशस्थी पक्का रंग, सदा लांबलचक खाकी हाफपँट आली वर कधी अगदी भयंकर मळकट तर कधी नवा पांढरा शुभ्र असा बनियन. हा त्यांचा अवतार. बरेच वेळा कमी दिसत असल्यामुळे उलटे कपडे घालणारा व चाचपडत, पुटपुटत चालणारा हा प्राणी.

एकदा हा महाभाग असाच चार-पाच दिवसांपूर्वीचा कोनाड्यातील भात घेऊन जेवायला बसला होता. मचू मचू आवाज करीत जेवणाऱ्या रामचे पशुपक्ष्यांवर फार प्रेम ! रामभाऊ म्हणत होते, " अरे थांब बरा, झालंच हं. दोन मिनिटांत नैवेद्य दाखवून तुला तुझा वाटा देतो. "

मला आश्चर्य वाटलं की, आसपास कोणीही नसताना हा राम बोलतोय तरी कुणाशी ? बराच वेळाने पत्ता लागला की आंब्याच्या झाडावरच्या कावळेमहाराजांशी हे संभाषण चालू होते.

बाकी काही म्हणा, हे जगच असं आहे. अगदी निरुपद्रवी प्राण्यांना भयंकर त्रास द्यायचा हा जगाचा न्याय आहे. आमचे रामभाऊ असेच रस्त्याने चालले की, गल्लीतली वात्रट कार्टी दगडी मारत त्यांच्या मागून जात व म्हणत,

" कसं काय राम्या बरं हाय का ?
काल काय ऐकलं ते खरं हाय का ? "

असहाय्य रामभाऊ बिचारे त्या मुलांना उलट दगड मारण्याचा निष्फळ प्रयत्न करून घरी येत असत.

' हं, बघतोच आता, हे आहे, ते आहे, एकेक एकेक माझ्या लक्षात आहे. ' हा त्यांचा जप चालू असे. याचा अर्थ काय म्हणाल तर अस्मादिकांना अजूनही कळलेला नाही. रामभाऊंचे बडबडणे आणि काम करणे एकाच वेळी चालू असे. दिवस असो, रात्र असो तोंडाची टकळी सतत चालूच असे.

चौकात उभे राहून कुणाच्या मरणाची तर कुणाच्या जन्माची, कुणाकडच्या हळदीकुंकवाच्या प्रोग्रॅमची तर कुठल्या नाटकाची एक ना अनेक प्रकारच्या जाहिराती ते करत असत.

आपली बगळ्यासारखी मान एका खांद्यापासून दुसऱ्या खांद्यापर्यंत हालवत व त्याचबरोबर हातवारे करत रामभाऊ जाहिरात देत असत.

" ' आज वेगळं व्हायचंय मला ' हे नाटक होणार आहे हो ऽऽऽ ! "

" जागा पागा, जागा पागा. "

पागा म्हणजे काय माहीत आहे ? अहो, आमच्या येथील तालमीचे नाव. येथेच बरेच वेळा नाटके होतात.

दुसरीत त्यांची आवडती जाहिरात.

"मी बालकमंदिरात मुलं नेतो, आणतो, पोहोचवितो. नेतो आणतो पोहोचवितो."

अर्थाची विसंगत असं बरचसं काहीतरी ते बोलत असत. एकेक शब्द दोनदोनदा म्हणण्याची त्यांची सवय होती. या अर्धवट रामला इंग्रजी मात्र छान बोलता येत असे. त्यांचे मॅट्रिकपर्यंत शिक्षणही झाले होते. खुषीत असले की भेटणाऱ्याला विचारत.

"How do you do ?"

या माणसाला हसताना मात्र फार थोड्या माणसांनी, थोड्या वेळा पाहिलेले असेल.

कथा-कीर्तने करण्याचीही त्यांना आवड होती. एकदा असेच दुपारचे १२ चे सुमारास रामभाऊ आमच्याकडे आले, अंघोळ न करता आपले कळकटमळकट धोतर पुढे करून आरोळी दिली.

"ॐ भवति भिक्षां देहि"

बाहेर जाऊन पाहिले तर रामभाऊ उभे. त्यांना थांबावयास सांगून मी आत गेले. भिक्षा घेऊन बाहेर येऊन पाहते तो काय ! डाव्या पायावर उजवा पाय टाकून रामभाऊंनी त्यांच्या किरट्या आवाजात कीर्तन सांगायला सुरुवात केली होती. ते नेहमी एक विशिष्ट गाणे म्हणत असत.

'तो होता त्या समयाला
ती होती त्याचे बरोबरीला
त्यांनी वेड लाविले सकळजनाला'

अहो, तो म्हणजे चहा आणि ती म्हणजे कॉफी आहे का कशाचा कशाला अर्थ ! पण अशा अनेक प्रकाऱ्च्या कविता ते स्वतः तयार करीत असत आणि याबद्दल त्यांना फार अभिमान होता.

पण हा बाहेरून मलिन असलेला माणूस मनाने फार चांगला होता. बरेच वेळा नंदीला [माझी मैत्रीण] व मला घरात बोलावून चहा प्यायला देत असत.

एका ॲल्युमिनियमच्या भांड्यात चहा, साखर, पाणी आणि केव्हाकाळचे नासके दूध घालून ते चुलाण्यावर ठेवत असत. एकच कागद पेटवून त्या चुलाण्याखाली ठेवत असत. कागद जळून गेला की झाला चहा. खरं म्हणजे त्या भांड्याचे बूडही गरम झालेले नसे, पण मोठ्या प्रमाने दोन चिनदांड्याच्या कपात घालून तो आम्हाला पिण्याला देत असत. त्यांची खोली म्हणजे अक्षरशः उकिरडा. वर्तमानपत्रे, पुस्तके, फोटो आणि त्यातच काही नाणी व रुपयांच्या नोटादेखील पडलेल्या असत.

एकदा त्यांच्या पायाला जबर मुका मार बसला होता. रांगत रांगत चालत होते. आमच्या मातोश्रींना त्यांची दया आली. आईबाईंनी त्यांच्या पायाला रक्तचंदन लावले. पाच-सहा दिवस नेमाने जेवण नेऊन दिले आणि बरे झाल्यावर एक दिवस रामभाऊ चक्क म्हणाले,

"माहितेय माहितेय, बंड्याची बायको ना तू ! माझ्या जेवणात विष घातले होते नाही का ! तो बंड्या माझ्या मांडीला मांडी लावून जेवला आणि आता चष कसा नोकरी करतोय तो. थांबा एकेकाला कोर्टातच खेचतो."

अशा या माणसाने गावातल्या अनेक प्रतिष्ठितांनाही कर्जे दिली होती, पण ना चिठी ना चपाटी. हे पैशाने मोठे लोक मनाने फार लहान असतात.

रामभाऊ त्यांचेकडे पैसे मागायला जात, पण हे लोक दुसऱ्या लोकांना सांगत,

"अहो वेडाच तो, काय तोंडाला येईल ते बोलतोय, तुम्ही नका लक्ष देऊ त्याच्या बोलण्याकडे."

आणि अशा प्रकारे अपमान झाल्यावर रामभाऊ लहान तोंड करून घरी येत असत, आणि मग फारच मनस्ताप झाला असला तर रात्री-बेरात्री केव्हाही उठून मोठमोठ्यांदा रडत बसत आणि मन मोकळे करत. अशा या वेड्या माणसालाही मन आहे, भावना आहेत याचा कोणीच विचार केला नाही.

त्यांच्यावर नेहमीच अन्याय होत गेला.

अशा या माणसाच्या अंतरंगाचा थांगपत्ता कधीच लागला नाही. कोणते दुःख त्यांचे मन पोखरत होते देव जाणे !

दिवसा उमलणाऱ्या व रात्री कोमेजणाऱ्या अनगिनत फुलाप्रमाणे एक दिवस रामभाऊही निघून गेले. कुणालाही त्रास दिला नाही, आजारी पडणे नाही, काही नाही. सकाळी शेजारचे गणूकाका उठवावयास गेले तर ती जीवनज्योत केव्हाच मालवलेली होती.

मनाला चटका लावून ते अचाट, अगम्य व्यक्तिमत्त्व अनंतात विलीन झाले !



# निवडणुकीची व्यथा

**मंगला जाधव**

गुलाबी थंडीतील दुपारी, मस्तपैकी झोप घेण्याच्या विचारात असतानाच दारावरची बेल नको त्या वेळी खणखणते. मी जरा नाराजीनेच दार उघडते आणि

" अय्या, निशा तू ! ये ना. " मला आनंद होतो.

निशा, माझी एक सुंदर, प्रिय मैत्रिण; बऱ्याच दिवसांनी आलेली असते. मग मात्र आमच्या गप्पांना ऊत येतो. ओघानेच मी, माझ्या आवडत्या कॉलेज–निवडणुकांकडे वळते. मी मोठ्या आवेशाने तिला म्हणते, " निशा, मला तर बाई कॉलेजच्या निवडणुका फार आवडतात. काय थ्रिल असते नाही ! "

मला पुढे बोलू न देताच ती म्हणाली,

" थ्रिल ! हंऽऽ कसली मज्जा आणि कसले काय ! माझा अनुभव तर विलक्षण आहे. ऐकायचाय ! "

माझ्या होकाराची संमती न घेताच ती सांगू लागली.

" कॉलेजमधील निवडणुकींच्या प्रचाराचा आज शेवटचा दिवस असतो. फक्त संध्याकाळपर्यंतच प्रचार करायचा असतो. त्यामुळे उमेदवारांना एक प्रकारचा जोर चढलेला असतो. सर्वत्र गोंधळ, गडबड चालू असते. प्रथमतः मला कसला अनुभव आला असेल तर तो ' घेराव ' चा. हा घेराव आणि मंत्र्यांचा घेराव यामध्ये फार अंतर, पण घेरावची कल्पना मात्र आली. ' मते आम्हाला द्या ' किंवा ' तुमचे मत आमच्या पप्पूला द्या. ' ' पप्पू ' हे त्या उमेदवाराचे बहुतेक लाडाचे नाव असावे. अशा घोषणांनी घाबरून गेलेली मी, त्या घेरावपासून कशी तरी सुटका करून घेतली. बिचारे मंत्री ! त्यांची दशा तर काय होत असेल ? आमच्या वर्गात खरं म्हणजे कोणाचेही लक्ष नव्हते. ' जास्त ' स्कॉलर मुले मुद्दामच शेवटच्या बाकावर बसलेली असतात. वर्गावरून जाणारी वर्दळ सारखी वाढतच असते. शिवाय या वर्दळीच्या जोडीला सतत वाढत जाणारा आवाज. वर्गात शिकविणाऱ्या मिस् आपल्या नाजुक आवाजात कधी नव्हे त्या सूचना करतात. पिरेड संपतो. रिसेस होते. प्रत्येक उमेदवार आपले सैन्य घेऊन येतो. बहुतेकांना वाटत असावे की आपण राजेश खन्ना तर नाही ना ? कारण प्रत्येकाच्या बोर्डवर राजेशची निरनिराळ्या पोझमधील चित्रे इतरांना आकर्षित करण्यासाठी लावलेली असतात. अशा एका धुंदीमध्ये एक मुलगा दिसतो. फुलाफुलांचा शर्ट, चट्टयापट्टयांची लुंगी आणि तोंडात पानपट्टी. त्यामुळे ते लालभडक तोंड पाहून कोणालाही हसू यावे असे ध्यान. मी आणि माझी मैत्रीण ही सर्व शांतिसेना गेल्यावर मनमुराद हसतो.

निवडणूक जशी आली तशी निघूनही गेली. पण काही गोष्टी मात्र विलक्षण घडल्या. यात बहुतेक मुलांची कँटिनची बिले फुगलेली अतात. खूप जणांनी प्रचाराच्या नावाने कँटिनमध्येच वेळ घालवलेला असतो. नंतर सर्व शांत होते. जो तो आपल्या कामात व्यग्र होतो.

अशाच, एका सुप्रभाती मी कॉलेजमध्ये पाऊल टाकते, तोच मला दर्शन होते ते त्या पानपट्टीचे. परत तेच लालभडक तोंड. छे, कसे तरीच वाटते. सकाळी सात वाजता आणि तेही कॉलेजच्या पोर्चमध्ये पानपट्टी ! महा आश्चर्यम् ! तो मुलगा ऐटीत पान चघळत असतो. ना खंत ना कशाचे सुखदुःख.

नंतर तो, कधीही पाहावा तेव्हा कोणाचा तरी शोध घेत असावा अशा दृष्टीने बघत असतो. एकदा तर चक्क गुलाबी गुलाबाचे फूल तोंडात धरून आरामात उभा असतो. रोज रोज हातात छान छान गुलाबाची फुले हातात धरून उभा असायचा. आमच्या वर्गातील बहुतेकांची नजर त्याच्या हातातील त्या सुंदर फुलांकडे वळत असे. एकदा मला कळले की मी त्याची प्रिया आहे. प्रिया, प्रेयसी, मैत्रीण ! काही असो, मी त्याच्याकडे कधी ढुंकूनही पाहात नाही. नेहमीच सरळ बघून चालते. त्याला मात्र काही केल्या

प्रतिसाद मिळत नव्हता. बहुतेक त्याला कळले असावे की मला हे 'तांबुल-सेवन' आवडत नाही. थोडेसे दिवस तो पानपट्टी खात नाही. परंतु शेवटी बिचाऱ्याच्या पदरी पडते ती निराशाच. त्याच्याबरोबर त्याची गँगही हताश होते.

एके दिवशी मी येत असते. नेहमीच्याच चालीने. मोठ्या डौलात. मी पुढे जात असते आणि माझ्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून इतरजण कुजबुजत असतात. मी वर्गात येते आणि मग मला कोणीतरी हळूच कानात सांगतात, 'ए, तुझ्या स्कर्टवर पानपट्टीची पिचकारी उडलेली आहे.' मी हबकूनच गेले. इतरांना माझी दया आली. शरमेने माझी मान खाली गेली. माझ्या मैत्रिणींना त्या मुलाचा संताप आला. आम्हा सर्वांचे हात त्याला मारण्यासाठी अजूनही शिवशिवतात. आता तूच सांग माझा काही दोष होता? मी तर या निवडणुकीत भाग सुद्धा घेतला नाही. याला कारण काय तर त्याने मला या निवडणुकीच्या काळात पाहिले होते ना. तो रोज मते मागायला वर्गात येत होता."

निशाच्या डोळ्यांतील अश्रू पाहून माझे विचारक्षम मन आक्रंदून उठले. कोठे गेली ती भारतीय पूर्वपरंपरागत चालत आलेली नीतिमत्ता? एका निवडणुकीतून अशी व्यथा उत्पन्न व्हावी? अशा किती तरी व्यथा उद्भवत असतील? पण त्यांना तोंड फुटत नसावे. खरं म्हणजे कॉलेजची वास्तूच किती पवित्र, शांत. जिथे मांगल्याचा सुवास यावा अशा ठिकाणी पानपट्टी खाऊन पिचकाऱ्या उडवून भिंती खराब व्हाव्यात? निरनिराळ्या 'शुभ्र शलाका' (सिगरेट्स्) ओढाव्यात आणि मनासारखी गोष्ट झाली नाही की एखाद्याला शरमेने मान खाली घालावी लागेल असे वर्तन करावे? किती लांच्छनास्पद गोष्ट!

या सर्व गोष्टींना गरज आहे ती संस्काराची. जे संस्कार आई-वडील, गुरु आणि समाज देत असतात ते अशा ठिकाणी अपुरे पडतात असे मला वाटते. त्या संस्कारांची मर्यादा फारच तुटपुंजी भासते, कारण ही संस्काराची लक्ष्मणरेषा कधीच ओलांडलेली असते आणि त्याचे फळ काय मिळते? ते एकाच वर्गात मार्च-ऑक्टोबरच्या विद्यापीठाच्या वाऱ्या करण्याचे फळ पदरी पडते. आपल्यालाही ही व्यथा चिंतनीय नाही का वाटत?

✤

## ख स ख स

एका कुटुंबाकडे पाहुणा येतो. रात्रीचे जेवण झाल्यावर झोपेची तयार होते.
पाहुणा : घरात ढेकूण नाहीत ना? मला नाही झोप येत ढेकणात!
यजमान : नाही, अजिबात ढेकूण नाहीत!
पाहुणा झोपतो व ढेकूण चावून अंगाची लाहीलाही झाल्याने ताडामराने उठतो. तेव्हा—
यजमान : तुम्हाला कसं चावलं, आम्हाला नाही चावत.
पाहुणा : कदाचित ते घरच्या लोकांना चावत नसतील!

*

मित्र : अरे, तू कॉलेज शिकायला आल्यावर रोज खानावळीतील खाऊन चांगलाच पैलवान झालास.
कॉलेज विद्यार्थी : सर्व जीवनसत्वयुक्त अन्न असते ना ते!

*

मित्र : अरे रामू, तुझे वडील तुला तंग विजार घालू नकोस, त्यापासून अपाय होतो असे सांगत असताही तू घालत होतास. आणि हल्ली ती घालणं का सोडलंस?
रामू : तंग विजारी वापरणे चांगले नाही असा त्याच्यावर फॉरिन (Foreign) चा शिक्का लागून आलाय ना!

*

नोकर : साहेब तुम्ही आपल्या बंगल्याचे वैकुंठ हे नाव का बदलत आहात?
मालक : आपल्या शेजारच्या स्मशानभूमीचे नाव वैकुंठ ठेविले आहे ना!

*

रामू : आपल्या येथे साम्यवाद कुठे दिसतोय?
बाळू : तो प्रथम टॉकीजमध्ये पसरत आहे. बाल्कनी ते सेकंड क्लास सर्वांना सारख्याच खुर्च्या येऊ लागल्या आहेत.

*

बाळू : अरे रामू, मी जेव्हा तुझ्याकडे येतो तेव्हा तू झोपलेलाच असतोस, काय आहे हे?
रामू : अरे काय सांगू, ऑफिसात इतकी मासिकं वाचून होतात की त्यामुळे डोळे अगदी तारवटून जातात बघ.

सु. श्री. परांजपे



## आमची आळी

**हेमा अभ्यंकर**

आमच्या आळीबद्दल ना, काही विचारूच नका ! अगदी सॅम्पल् आहे सॅम्पल् ! याचं कारण आमच्या आळीतली सॅम्पल्स. आमच्या आळीची ओळख करून घ्यायची असेल ना, तर आमचे शेजारीपाजारी म्हणजे काय चीज आहेत हे कळलं की झालं ! जगात किती तऱ्हेची माणसं आहेत असं जर कोणी मला विचारलं तर मी बेधडकपणे सांगेन– " आमच्या आळीत आहेत तेवढे प्रकार, जगातल्या तमाम तऱ्हेच्या माणसांचे प्रतिनिधित्व करतात. "

या आमच्या शेजारच्या वहिनी बरं का. तुम्ही जरा सकाळी अंगणात या. आपल्या दोन्ही ( गोजिरवाण्या ) मुलींचे प्रातर्विधी उरकवून त्या चाललेल्या दिसतील. जाता जाता वझ्याला विचारतील, " आई उठली का रे ? " उत्तर अर्थातच होकारार्थी मिळतं. मग त्या, वझ्याच्या मातुश्री आज दुपारी मंडईत येणार आहेत ना ? याची खात्री करून घेतील. आज दुपारी निवान्त मंडई करण्याचा बेत आहे, त्या अर्थी उद्या शनिवारच असणार, कारण शनिवारी मंडई बंद ना ! [ आणि " मेल्या मंडईशिवाय कुठे स्वस्त आणि हिरवी ( ? ) भाजी मिळत नाही. " हे ती. वहिनींच्या संसारानुभवाचे सार असते. ]

तुम्ही अकरा वाजता कॉलेजातून घरी आलात तर दोन्ही पोरींची दप्तरं आणि हवे अनुक्रमे उजव्या आणि डाव्या हातात [ कदाचित उलट होण्याचीही शक्यता आहे. ] घेऊन, तोंडानं " वनिता, रस्त्यानं कसं चालायचं म्हणून शिकवलंय ? असं पुढे पळायचं नाऽऽऽही. सुनीताचा हात धर बघू. " असं माफक नागरिकशास्त्र शिकवीत चाल-लेल्या वहिनी तुम्हाला हमखास दिसणार. शनिवारी दुपारी त्या तांदूळ निवडणार. रविवारी संध्याकाळी सहकुटुंब सह-परिवार सारसबागेत आणि कधी कधी पर्वतीवर भेटणार. आमच्या या वहिनी सुट्टी असूनही " मिस्टर " घरात नसले तर " गृहिणींसाठी उपयुक्त किंवा आदर्श " अशा शीर्षकाखाली छापल्या जाणाऱ्या पुस्तकांतील पाककृतींच्या थिअरीचं प्रॅक्टिकल करताना आढळतील. अशा तऱ्हेने वहिनी या थोडक्यात म्हणजे " आदर्श गृहिणी " आहेत. आदर्श गृहिणींची अशी कार्बन कॉपी ठिकठिकाणी आढळते.

हे...हे टाय लावलेले गृहस्थ पाहिलेत का ? हो तेच ! चष्मावाले. ते आमच्या आळीतील एक बुद्धिजीवी प्राणी आहेत. असे गोंधळू नका ! बुद्धिजीवी प्राणी म्हणजे ते प्रोफेसर आहेत. अर्थातच, त्यांची स्वतःची अशी काही Principles आहेत; आणि ते नेहमी त्या principles ना धरूनच वागतात. According to his own principles. समाजात असणाऱ्या बुद्धिजीवी व श्रमजीवी या दोन भागांपैकी ते पहिल्या वर्गात मोडतात. प्रो. साहेब आपल्या पेशाला अगदी " फिट्ट " आहेत. अहो अगदीच सरळ माणूस ! कोणाच्याही आल्यागेल्यात नाहीत. रस्त्यानंही जाताना कोणाकडे न पाहता, इतकंच काय पण चष्म्याच्या फ्रेमच्याही बाहेर न पाहता चालणार. आपण बोललोच तर बोलणार.

" काय ? कसं काय ? "...

" ठीक आहे, सध्या I am very busy ! प्रो. भडभड्यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहितोय..."

असं किंवा अशाच टाइपाचं संभाषण तुमच्यात व त्यांच्यात होणार. संध्याकाळी ते साहित्य परिषदेत जाणार. शहरातल्या कोणत्याही महत्त्वाच्या भाषणाला हजर राहणार. सतत काहीतरी वाचणार. वर्षातून एखादी प्रस्तावना, एखादी समीक्षा, फुटकळ लेख नक्कीच लिहिणार. खरं सांगू ? या महाशयांकडे पाहिलं ना, की मला नेहमी वाटतं की आपल्या वाट्याला आलेलं आयुष्य अगदी

टेलिफोन नंबर : ५७०५७

# हॉटेल स्वस्तिक

तुळशीबागेसमोर, पहिला मजला

- शाकाहारी जेवण व स्नॅक्स्
- टेबल व पार्टीसाठी रिझर्व्हेशन

# मयूर प्लॅस्टिक्स

आमचेकडे निरनिराळ्या प्लॅस्टिकच्या वस्तू विविध रंगांत व आकर्षक आकारात मिळतात.

एक वेळ अवश्य भेट द्या.

टीप : संक्रांतीच्या वेळी देण्यासाठी आकर्षक छोट्या प्लॅस्टिकच्या वस्तू होल्सेल भावात मिळतात.

पत्ता : तुळशीबागेजवळ, पुणे २

रोज ताजा माल मिळण्याचे एकमेव ठिकाण

# रुचिरा बेकरी

कन्याशाळेनजीक

५४८ शनवार पेठ, पुणे ३०

फोन नं. ५८१०६

फोन : ५८१०६ मंगल कार्याकरिता

मंगल कार्याकरिता सुशोभित हॉल

आणि

टेबलटेनिसकरिता अद्ययावत हॉल

# सहयोग मंगल कार्यालय

५०८ नारायण पेठ, पत्र्यामारुती चौक, पुणे ३०

संपर्क :— कॉन्ट्रॅक्टर – पळशीकर

प्रोप्रा.—स्वस्तिक ब्रास बँन्ड

६१७ शनवार पेठ, पुणे ३०

मोतीवाले

# श्रीपाद शंकर नगरकर सराफ

चोख सोन्याच्या व चांदीच्या मालाचे व्यापारी

पत्ता : ११६० बुधवार पेठ, तुळशीबागेनजीक, पुणे २

## एन. सी. सी. अधिकारी व शारीरिक शिक्षण ( पी. टी. ) संघनायक



बसलेले डावीकडून : संजय साठे, श्री. अरुण सिधये, उपप्राचार्य गाडगीळ,
प्राचार्य लिमये, प्रा. आपटे, राजीव पाटणकर व संजय निघोजकर.
मागे उभे : विजय अभ्येंकर, कु. शैलजा कुलकर्णी, दत्तात्रय सोवनी,
कु. अरुणा करंडे, साळवी, कु. प्रतिभा कान्हेरे व नरेंद्र म्हात्रे
सर्वांत मागे उभे : सर्वश्री मोहिते, देशपांडे, पवार व उतेकर.



**कु. मंगल पटवर्धन**
सर्वोत्कृष्ट छात्र ( Best Cadet )

## आंतर महाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन विजेता संघ



कु. माधुरी हळवे, कु. शैलजा कुलकर्णी,
कु. भारती शहा ( संघनायिका ), कु. सुरेखा वाळवेकर
व कु. विद्या देऊस्कर
बसलेले : श्री. अरुण सिधये ( क्रीडाप्रमुख )



**कु. भारती शहा**
आंतरविद्यापीठीय बॉलबॅडमिंटन संघात निवड



**उदयकुमार लागू**
आंतरमहाविद्यालयीन सूर मारण्याच्या
स्पर्धेत तिसरा क्रमांक



नियोजन मंडळ व वाणिज्य मंडळ यांच्या उद्घाटन प्रसंगी
नामदार मोहन धारिया यांचे भाषण चालू असता

‘ सिंबॉयसिस ’च्या विद्यार्थ्यांसमोर
‘ मॉडर्न ’चे विद्यार्थी
गीतगायन पेश करताना





‘ सिंबॉयसिस ’च्या विद्यार्थ्यांनी
सादर केलेल्या कार्यक्रमातील
एक झलक

## नोबेल पारितोषिकाचे मानकरी १९७१



Simon Kuznets (Economics)



Gerhard Herzberg ( Chemistry )



Pablo
Neruda
(Literature)



प. जर्मन गणराज्याचे
प्रमुख
विली ब्राट
( शांतता )



बांगला मुक्तिदिनी श्री. एस्. एम्. जोशी बोलताना



पं. विष्णु दिगंबर पलुस्कर
जन्मशताब्दी

## विद्यापीठ परीक्षांत महाविद्यालयात प्रथम



श्रीरंग जोगळेकर
प्रथमवर्ष वाणिज्य



कु. सुनीता धर्माधिकारी
प्रथमवर्ष साहित्य

प्रामाणिकपणे व निमूटपणे जगणाऱ्या लोकांचं ते एक "मॉडेल्च" आहेत.

आता जरा तिसऱ्या मजल्यावरच्या या घरात चला. एक तथाकथित सुंदर मुलगी, चेहऱ्यावरचे हावभाव बदलत, सतरा वेळा आरशात पाहात, "ना ना ना, ना ना ना, ना ना ना SSSSS बागोंमें बहार..." हे किंवा तत्सम गाणं म्हणत वेणी घालताना दिसेल. ती सतरा वेळा आरशात पाहून अठरा वेळा वेणी संपंथ किंवा अर्धी सोडून पुनः पुनः घालील. मग सामानिमा All right असल्याच्या खुशीतच "जर्नल" पूर्ण असल्याची खात्री करून घेईल आणि सर्व जगातला अभ्यास युनिव्हर्सिटीनं माझ्याच माथी मारला आहे असा भाव चेहऱ्यावर ठेवून कॉलेजात जाईल..बरोबर ओळखलंत! ती सायन्स स्टुडंट आहे!!! पण पोरगी आहे मात्र अगदी interesting हं! ती अभ्यास करते कधी! हे कळणार नाही, पण दरवर्षी, मैत्री स्मरून, "मला नाSS. 'रॉयल क्लास' मिळाला." असं म्हणत. दिलखुलास हसत पेढे मात्र द्यायला येईल. कधी कधी तिच्या त्या रॉयल क्लासपुढे माझा फर्स्ट क्लास मला अगदीच दीनवाणा वाटायला लागतो.

ही मुलगी, "अगदी मानलं! अगदी तोडलं!" या भाषेतच तुमच्याशी बोलणार. किशोरकुमार, राजेश खन्ना, लता मंगेशकर आणि इन्दिरा गांधी या चारच great व्यक्तींनी सारं जग व्यापलंय, या थाटात फक्त या चारच विषयांवर "तोडलं, फोडलं, मानलं" करीत बोलणार आणि अहोरात्र "चन्दा ओSS चन्दा" किंवा "ओह ल्यू ओह ल्यू" अशा गानलहरींवर शेजाऱ्यांना तरंगत ठेवणार.

या आमच्या आळीच्या काकू! तमाम दुनियेतल्या काकूंच्या अर्क आहे बरंSS!! सदा सगळ्यांकडे पाहून यांचं तोंड वाकडं! कध्धी कध्धी कोणाचं चांगलं म्हणून पाहवत नाही. सदा दुसऱ्यांकडे पाहून नाक मुरडणाऱ्या या बाईला पाहिलं की वाटतं की "दुसऱ्यांचं चांगलं पाहून तुमच्या पोटात दुखतं ना! मग ×××च्या दोन गोळ्या खा! दुःख तुरन्त दूर होईल" अशी जाहिरात यांच्या तोंडावर घडाघडा म्हणावी.

हे आप्पा! आळीच्या भविष्याची सारी चिन्ता यांना. सदा कुंडल्यांमधे डोकं घालून बसतात आणि खगोलात वावरल्यासारखेच वागतात. त्यांना पाहिलं की शनी वक्री झाल्याचाच मला भास होतो.

ही आमच्या आळीतली कुमुदसुंदरी! सौंदर्याचा ॲटम बॉम्ब, मादकतेचा नापाम बॉम्ब...वगैरे सर्व काही आपणच अशी तिची स्वतःबद्दलची गोSSड (गैर) समजूत आहे. तिचे पाय नेहमीच आकाशात वगैरेच असतात.

हे बापू! ते...पण जाऊ दे! मी जर असंच सांगत राहिले तर...

तर, तुम्हाला आमच्या आळीची थोडीशी ओळख यावरून झालीच असेल! आमच्या बहुढंगी, बहुरंगी आळीचं नाव सांगू! पण नकोच, कारण तुम्ही नीट पाहा, कदाचित तुमच्या आळीचंही चित्र असंच असेल!...

### १८ डिसेंबर १९७१ रोजी मॉडर्न महाविद्यालयातील विद्यार्थी-प्राध्यापक सभेतील ठराव

स्थलसेना, जलसेना व वायुसेना यांचे सेनापती, अधिकारी, शूर सैनिक व जवान यांनी एकदिलाने, एकजुटीने, निकराने दिलेल्या लढ्यामुळेच भारत-पाक युद्धामध्ये आपल्याला मोठा विजय प्राप्त झाला व देशाला गौरव प्राप्त झाला. या युद्धात राष्ट्रीयतेचा एक नवा प्रत्यय आला व देशातील ऐक्यभावनेचा साक्षात्कार झाला. या सर्वांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या पराक्रमाबद्दल, निष्ठेबद्दल व त्यागाबद्दल आम्ही नतमस्तक होऊन ही कृतज्ञता व्यक्त करीत आहोत.

# १९७१ चे नोबेल पारितोषिक विजेते

## चान्सेलर विली ब्रांट

*पश्चिम जर्मनीचे लोकनेते*

**व. गो. नांदेडकर**

### तत्त्वज्ञ राज्यकर्ता

संघर्षाच्या वस्तुस्थितीइतकीच शांततेची धडपडही सनातन आहे, आणि ज्या वेळी दुर्दम्य व्यक्तिमत्त्व राज्ययंत्रणेचे नेतृत्व करते त्या वेळी चिरकालीन शांततेची आशा म्हणून पुन्हा मनात पालवते. प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो आपल्या पुस्तकात असे म्हणतो, "Unless philosophers are kings or kings and princes of this world have the spirit and power of philosophy cities will never have rest from their evils."

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच जागतिक राजकारणाचा केंद्रबिन्दू असलेल्या जर्मनीमधूनं असा 'तत्त्वज्ञ राज्यकर्ता' निर्माण व्हावा हा केवळ योगायोग नाही. शांततेच्या आशा उद्ध्वस्त करणाऱ्या पहिल्या महायुद्धानंतर सहकार्याची वाट शोधणारा जर्मनीचा चॅन्सेलर स्ट्रासमान आणि तिसऱ्या महायुद्धाच्या छायेतही शांततेवर श्रद्धा ठेवणारा प. जर्मनीचा चॅन्सेलर विली ब्रांट या दोहोंनाही नोबेल शांतता पारितोषिक देऊन गौरव झालेला आहे. आक्रमक नेतृत्वाने लादलेले युद्ध संपल्यावर मानवतेसाठी सहकार्याचे व शांततेचे प्रयत्न परत जर्मनीमार्फत होण्यात एकप्रकारे ऐतिहासिक औचित्य आहे.

## विचारांची घडण

गरिबीमध्ये जन्मलेले विली प्रथमपासूनच समाजवादी विचारांनी भारले गेलेले होते. समाजवादी युवक संघटनेमध्ये कार्य करीत असताना वयाच्या १७ व्या वर्षी ते सोशल डेमोक्रॅट्स पक्षाचे सदस्य बनले. हा काल हिटलरच्या उदयाचा होता. सर्व समाजवादी शक्तींवरील विश्वास नष्ट व्हावा असा मानसिक ताण नाझी राजवटीत निर्माण झालेला होता. नाझी विचारांतील भडकपणा उथळ विचारांना आकर्षून घेत होता. अर्थात नाझी विचारांशी मिळतेजुळते घेणे विलीच्या मनाला मानवणारे नव्हते. आणि म्हणून देशांतर करून ते नॉर्वेला गेले.

नॉर्वेमधील वास्तव्याचा त्यांच्या व्यक्तित्वावर मोठा ठसा उमटलेला आहे. बालपणीच्या गरिबीने निर्माण झालेली व्यक्तिगत कणव-तिचे येथे सामाजिक जाणिवेत रूपांतर झाले. स्वातंत्र्याच्या मूल्यांना लोकशाही विचाराची चौकट प्राप्त झाली. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाजहित ह्यांच्या समन्वयाचे स्कॅंडेनेव्हियन वैशिष्ट्य त्यांच्या मनात पूर्ण रुजले. आपल्या राजकीय ध्येयविचारांना भक्कम व्यवहारवादाची बैठक त्यांनी इथेच दिली.

विली आपल्या पितृभूमीला विसरणे शक्यच नव्हते. नॉर्वेच्या भूमीवरही ते नॉर्वेचे एक सेनाधिकारी म्हणून नाझी सैन्याशी लढलेले होते, आणि युद्ध संपल्यावर, जेव्हा जर्मन नागरिकत्व पत्करणे फारसे आकर्षक नव्हते तेव्हा १९४७ साली त्यांनी जर्मन नागरिकत्वासाठी परत अर्ज केला. टेरेन्स प्रीटी [Terence Pritie] म्हणतात, "He chose to become a German again in Germany's darkest hours. He wanted to serve his country and people."

## राजकीय उमेदवारी :

आपल्या राजकीय जीवनाला त्यांनी बर्लिन येथे सुरुवात केली. कदाचित जर्मन प्रश्नाची सोडवणूक बर्लिनमध्येच आहे असा वास्तववादी विचार त्यांच्या मनात आला असावा. अज्ञातवासात असताना नॉर्वेजियन वृत्तसंस्थेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम केलेले होते. त्या वेळी मिळालेल्या अनुभवाने तयार झालेले त्यांचे वास्तववादी राजकीय तत्त्वज्ञान आता आकार घेऊ लागले.

१९४९ साली सोशल डेमोक्रॅट पक्षातर्फे ते बर्लिनमधून संघराज्याच्या विधिमंडळावर निवडून गेले. १९५७ ते १९६६ ह्या प्रदीर्घ कालखंडात ते बर्लिनचे महापौर होते. त्यांच्या धीरोदात्त वर्तनामुळेच बर्लिनच्या नाकेबंदीच्या कालखंडात बर्लिनवासियांचे नीतिधैर्य टिकू शकले. जर्मन लोकांच्या प्रवृत्तीतच त्यांनी बदल घडवून आणला. १९६६ च्या संघराज्याच्या मंत्रिमंडळात ते विदेश मंत्री होते, आणि ह्या सगळ्या सेवेचा 'झालासे कळस' असेच जणू म्हणून ते सप्टेंबर १९६९ मध्ये प. जर्मन संघराज्याचे चॅन्सेलर म्हणून निवडले गेले.—सोशल डेमोक्रॅट पक्षाचे ४० वर्षे जतन केलेले स्वप्न साकार झाले.

## राजकीय तत्त्वज्ञान :

विलींचे वर्णन विसाव्या शतकातील वास्तववादी राजकारणी म्हणून करता येईल. अतिरेकी राष्ट्रवादी हा कधीच चांगला जर्मन होऊ शकणार नाही असे ते नेहमी म्हणत. युरोपीय समाजाचे आपण घटक आहोत ही जाणीव अत्यंत महत्त्वाची आहे. एकदा ही जाणीव झाली की आक्रमक राष्ट्रवादाला आपोआप मर्यादा पडतात. विली ब्रांट ह्यांनी अधिकारसूत्रे स्वीकारताना केलेल्या पहिल्याच भाषणात असे जाहीर केले, 'We intend to be a nation of good neighbours at home and abroad.'

## राजकीय कर्तृत्व :

युरोपच्या शांततेचे मर्मस्थान जाणून त्यांनी युरोपीय शांततेच्या दृष्टीने प्रथम पावले उचलली. ऐतिहासिक दृष्ट्या शत्रू असलेल्या रशिया आणि पोलंड ह्या राष्ट्रांबरोबर अनाक्रमणाचा करार करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. अण्वस्त्र निर्मितीबाबत बंधने घालून घेतली आणि पूर्व जर्मनीचे अस्तित्वही मान्य केले. ह्या प्रत्येक पावित्र्यात धडाडी होती रुळलेली वाट सोडण्याची. संयम होता आक्रमक शक्तीचा वापर टाळण्याचा. कारण श्रद्धा होती उद्याची निळी क्षितिजे पाहण्याची.

शांततेच्या नोबेल पारितोषिकाचा आधार हीच श्रद्धा होती. नोबेल समिती त्यांचे नाव जाहीर करताना असे म्हणते, "Chancellor Brandt has stretched his hand forward in a policy of reconciliation

—: शिका :—

शॉर्टहॅन्ड — टाईपरायटिंग

S.S.C. व G.C.C. विद्यार्थ्यांसाठी खास सोय

* उत्कृष्ट मार्गदर्शन ! * माफक फी !

* सोईस्कर बॅचेस !

—: आजच भेटा :—

प्रि मि अ र

शॉर्टहॅन्ड—टाईपरायटिंग

इन्स्टिटयूट

—: चौकशी :—

सकाळी ८ ते १२ व संध्या. ४॥ ते ८॥

काका हलवाई

* पेढे
* बर्फी
* मिठाई
* पक्वान्ने
* खारा माल
* सुकामेवा

पुणे शहर : फोन ५७८६८

डेक्कन जिमखाना : फोन ५७८६७

दूरध्वनि : २७५८७

पुण्यातील प्रसिद्ध व्यापाऱ्यांनी चालविलेली, लोकादरास व विश्वासास पात्र ठरलेली

दौलत चिट फंड प्रा. लिमिटेड

[ रजि. नं. १४०४३ अंडर कंपनी ॲक्ट १९५६ ]

दौलत भिशी मंडळ

३५८ नाना पेठ, पुणे २.

भरपूर नफा देणाऱ्या लिलाव भिशा

| गट | मासिक वर्गणी रुपये | समासद संख्या | योजना काळ | भिशीची रकम |
|---|---|---|---|---|
| ग | २५० | ४० | ४० महिने | १०,००० |
| म | १२५ | ४० | ४० महिने | ५,००० |
| वैभव | ५० | ४० | ४० महिने | २,००० |
| सुवर्ण–आठवडा रु. ५० | | १०० | १०० आठवडे | ५,००० |

सर्व भिशांचे नवीन गट सुरू आहेत. आपणांस कोणत्याही गटात समासद होता येईल.

between old enemies. He has made an outstanding effort to establish conditions of peace in Europe."

बिस्मार्कच्या चाकोरीत रुळलेल्या जर्मन राष्ट्रात त्यांनी समाजवाद रुळविला. मानवी हक्क, व्यक्तिगत सुरक्षितता, आणि संपूर्ण स्वातंत्र्य हे पश्चिम जर्मनीच्या राजकीय जीवनाचे म्हणून अविभाज्य घटक होऊ शकले. पोथीनिष्ठ मार्क्सवादापासून त्यांनी सोशल डेमोक्रॅट पक्षाचे तत्त्वज्ञान मुक्त केले. त्यांच्या पक्षाने स्वीकारलेली सामाजिक न्याय, शैक्षणिक संधीची समानता आणि अखंडित औद्योगिक उत्पादन ही त्रिसूत्री ब्रांट यांच्या प्रयत्नाचेच फलित आहे. १९७० च्या श्रेयनामावलीमध्ये त्यांचा गौरव करताना टाईम या पत्राने 'जागतिक राजकारणात केवळ प्रतिक्रियात्मक कृती न करता आपल्या व्यक्तित्वाचा ठसा उमटविणारा राजकारणी' या शब्दात त्यांची प्रशंसा केलेली आहे.

आगळे व्यक्तिमत्त्व :

ज्या श्रद्धांनी त्यांच्या राजकीय जीवनाला आधार दिला त्याच श्रद्धा त्यांच्या व्यक्तिगत जीवनातही अविभाज्य घटक बनलेल्या आहेत. त्यांच्या राजकीय विचारांची जाणीव त्यांच्या In Exile–Essays and Reflections, Policy of Peace, Life of Freedom इ. त्यांच्या पुस्तकांतून आपल्याला येते. फावल्या वेळात ऐतिहासिक व्यक्तींची आत्मवृत्ते वाचण्यात विली रंगून जातात. एखादे वेळेस खास नॉर्वेजियन पदार्थांचा आस्वाद घेण्यात ते दंग झालेले असतात. थोरल्या मुलाची आणि त्यांची राजकीय मते जुळत नाहीत. कोणी सल्ला देते की, कठोरपणे वागा जरा. पण विली तितक्याच बेफिकिरीने म्हणतात, "मला हुकूमशहा व्हायचे नाही. सार्वजनिक जीवनात नाही तितकेच व्यक्तिगत कौटुंबिक जीवनातसुद्धा."–He is a Social Democrat in public life, he is equally social and democrat in his private life too.

विली ब्रांटच्या रूपाने म्हणून एक बहुरंगी व्यक्तिमत्त्व मनासमोर साकारते. एक युरोपीय : सामुदायिक बाजारपेठेसाठी धडपडणारे. एक समाजवादी : सामाजिक न्यायासाठी कार्यमग्न झालेले. एक जर्मन : देशाच्या खऱ्या हितासाठी धडाडीने प्रयत्नशील असलेले.

## २ Dr. GERHARD HERZBERG

**R. V. Shukla**

Dr. Gerhard Herzberg of the National Research Council Canada has been awarded the 1971 Nobel Prize for Chemistry for his pioneering work in Molecular Spectroscopy.

Born on Dec. 25, 1904 at Hamburg, Germany, Dr. Herzberg studied at the Darmstadt Institute of Technology and obtained his Doctorate. In order to avoid confrontation with Nazis he emigrated to Canada to join Saskatchewan University as Research Professor of Physics. Later he became Principal Reseach Officer in National Research Council at Ottawa. In 1964 he was elected FRS. He was awarded Henry Marshall Tory Medal by Royal Society of Canada.

त्या गृहस्थांना त्याला काय म्हणायचे आहे ते लक्षात आले नाही, हे पाहून तो म्हणाला,

'साहेब, त्यातला एक खेकडा वरती चढायला लागला की दुसरा त्याचे पाय ओढतोय हे तुम्हांला दिसत नाही काय?'

पुण्याचा मनुष्य कोणालाही फुकाफुकी मोठे म्हणणार नाही. तो कोणत्याही गोष्टीतील 'व्यंग' बरोबर शोधून काढील. भारत इतिहास संशोधक मंडळात किंवा नगरवाचन मंदिरांत इतिवृत्तांना तिकिट लावताना तेथले शिपाई गांधी–नेहरूंना राजकारणात काही कसे कळत नाही, याची चर्चा करतील, गांधर्व महाविद्यालयांतील कारकून अब्दुल करीम खाँ–भास्करबुवांच्या गायकीतील काही खुसपट काढील, ऑक्सफर्ड विद्यापीठाने अनेक वर्षे डोळ्यात तेल घालून तपासून छापलेल्या इंग्रजी शब्दकोशामध्ये कितीतरी स्पेलिंगच्या चुका आहेत, हे दाखविणारा वीर पुण्यालाच होता. नामदार गोखल्यांनी इंग्रजी माणसाला व्याकरणशुद्ध इंग्रजी येत नाही असे लंडनमध्ये अनेकांना पटवून दिले होते म्हणे!

म्हणूनच पुण्याची व्युत्पत्ती सांगताना पाहा उणे = पुणे अशी नवी उत्पत्ती आम्ही सुचविली तर पुण्याबाहेरील लोकांना एकदम बरे वाटेल आणि 'कसं बोललात!' म्हणून ते संमतिदर्शक टाळीसाठी हात पुढे करतील.

या निरनिराळ्या विद्वत्तापूर्ण उपपत्त्या लक्षात घेतल्या तरी या नावासंबंधीच्या आणखी कितीतरी उपपत्त्या शिल्लक राहातातच. या सर्व उपपत्त्यांपेक्षा काही वर्षांपूर्वी आम्ही स्वतः शोधलेली उपपत्ती अधिक प्रचीतीची ठरण्याचा संभव आहे. ती अशी :

अयोध्येहून दंडकारण्याला येत असता प्रथम रामचंद्रांना नासिकपेक्षा पुणे आवडले म्हणून त्यांनी या ठिकाणी काही अधिक मुक्काम केला. याच मुक्कामी भरत आपल्या लवाजम्यासह त्यांना भेटायला आला. त्यालाही हे ठिकाण खूप आवडले. मग प्रभू रामचंद्राकडे सारखे पाहुणे येऊ लागले. उन्हाळ्याच्या दिवसांत तर त्यांना पाहुण्यांनी अतिशय हैराण केले. अयोध्या, मिथिला येथील उन्हाळ्याला कंटाळून पाहुण्यांनी पुण्यात सीतामाईंना हैराण केले. या सर्वांसाठी कंदमुळे आणि फळे शोधून आणता आणता त्या मेटाकुटाला येऊ लागल्या. 'पाहुणे, पाहुणे, पावणे, पाउणे, जेव्हा पाहावे तेव्हा पुणे' (मैथली भाषेत 'पाऊ' याचा 'पु' असा उच्चार होतो.) असे त्या म्हणून गेल्या आणि त्यावेळेपासून या भागाला पुणे हे नाव प्राप्त झाले.

या उन्हाळ्याच्या दिवसांत पुणे म्हणजे पाहुणे हे समीकरण पुणेकरांच्या झटकन पसंतीस उतरेल. कारण उन्हाळा सुरू झाला म्हणजे नळाचे पाणी व्यवस्थित असूनही पुणेकराच्या तोंडचे पाणी पळते. पुण्याची हवा चांगली म्हणण्याचे त्याने अलीकडे सोडूनच दिले आहे. 'अलीकडे पुण्याची हवा फार

बिघडली. पुण्याचा उन्हाळा आताशा वाईट असतो.' असे त्याने म्हणावयास सुरुवात केली आहे. परंतु त्याचा काही उपयोग नाही. उन्हाळा सुरू झाला आणि होळी संपली की तिच्या मागोमाग पुण्याला परीक्षांचे परीक्षक, मॉडरेटर्स, वधूपिते, व्याख्याते यांची गर्दी होते आणि ते पुणेकरांच्या घराघरांतून ठाण देऊन बसतात. वधू दक्षिण ध्रुवावरची आणि वर उत्तर ध्रुवावरचा असला तरी त्यांचे लग्न पुण्यात लागते आणि मग या दिवसात पुणेकराला हक्काच्या घरात पाय पसरून झोपता येत नाही. लकडी पुलावरून किंवा लक्ष्मी रोडवरून चालता येणेही अशक्य होते. घरातले गडी, स्वैपाकी मंगल कार्यालयाकडे धाव घेतात आणि Guests have brought nine on our noses अशा रीतीने पुण्यातील गृहिणी आपला वैताग इंग्रजीत बोलून दाखवितात. अर्थात वऱ्हाड-नागपूरकडच्यांना मात्र याबाबतीत काही विचारायला जाऊ नये हां! नाहीतर फट् म्हणता ब्रह्महत्या व्हायची. मी पुणे अद्याप पाहिले नव्हते त्या वेळी एकदा नागपूरला जाण्याचा प्रसंग आला. ( अर्थात् सातारा, कोल्हापूरकडच्या माणसाला नागपूरला जायचे म्हणजे पुणे चुकत नाही. परंतु पुणे आले तेव्हा अंधार होता म्हणून म्हटले!) त्या वेळी नागपूरच्या पाहुण्यांनी पुणं म्हटल्यानंतर जे शब्द उच्चारले, ते अद्याप माझ्या लक्षात आहेत. त्यांनी पुण्यावर खूप तोंडसुख घेतले आणि शेवटी म्हटले, 'पंढरपूर आणि अहमदनगर स्टेशनवर 'या संतांच्या पवित्र भूमीवर आम्ही आपले स्वागत करतो.' अशा पाट्या आहेत. परंतु पुण्याच्या स्टेशनवर काय पाट्या आहे माहीत आहे?'

"काय?" मी विचारले.

"या शहरात पाहुण्यांना येण्याची बंदी आहे. आल्यास त्यांची फजिती करण्यात येईल."

मी पुण्यास आल्यापासून ज्या ज्या वेळेस स्टेशनवर जातो, त्या त्या वेळेस ती पाटी शोधण्याचा नेहमी प्रयत्न करतो. अद्याप मला ती कुठे सापडली नाही.

पुण्यासंबंधाचे हे सारे संशोधन हातावेगळे केल्यावर खाडबिकत पुणेकर कुणाला म्हणावयाचे असा प्रश्न येतो. मुंबईत जसा मुंबईचा कोळी हा मुंबईचा मूळचा रहिवासी ( आणि तो आता कोळी-वाड्यातही औषधाला शिल्लक नाही ) तसे पुण्यातले मूळचे पुणेकर कोण? इतिहासाचा शोध घेतला तर पहिला अस्सल पुणेकर म्हणजे शिवाजी, दुसऱ्या जिजाबाई, तिसरा दादोजी कोंडदेव; मग पेशवे वगैरे इतर. हे तर सारेच बाहेरचे होते. म्हणजे ज्याला आपण पुणेकर म्हणतो यातला अस्सल पुणेकर कोणीच नव्हे. परंतु बाहेरून येऊन त्यांनीच पुण्याला स्वराज्याचे, साम्राज्याचे केंद्र बनविले. प्रचंड इमारती, राजवाडे, पुष्करिणी, बागबगीचे बनविण्यामध्ये पुण्याच्या लोकांनी इतिकर्तव्य मानले नाही आणि असल्या विलासात व वैभवात वेळ घालविला नाही. इथे स्वातंत्र्याने व स्वाभिमानाने युक्त अशी मने बनली. शिवाजीने स्वराज्य स्थापन केले, पेशव्यांनी त्याचे साम्राज्यात परिवर्तन केले. लोकहित-वादी, म. फुले यांनी सामाजिक समतेची दीक्षा येथून दिली. रानडे, आगरकरांनी बुद्धिवाद व प्रगमनशीलता दिली, गोखले-टिळकांनी अखिल भारतीय नेतृत्व दिले. साध्या शिक्षकांनी अर्धपोटी राहून शिक्षणसंस्थांची उभारणी केली व पुण्याला विद्येचे माहेरघर बनविले आणि त्यामुळे भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधानांची जडणघडण पुण्यात झाली!

पण आज औद्योगीकरणामुळे पुणं आपले स्वत्व विसरू लागली आहे. तिला बकालपणा येत आहे. पैशामुळे तिला परंपरेचा विसर पडत आहे.

देवारे देवा! पुण्याच्या स्टेशनवरची ती अद्याप मला न दिसलेली पाटी तशीच राहू दे परंतु पुण्याला तू यापुढे अधिक बिघडवू नकोस!

# पं. सुदर्शनजीकी कहानी–कला

**प्रतिभा कान्हेरे**

हिंदी साहित्यके कहानी-लेखकोंमें स्व. पं. सुदर्शनजीका स्थान बहुत ऊँचा है। उनकी लगभग सभी कहानियोंकी जो विशेषता हमें प्रभावित करती है वह है उनका आदर्शवाद उनकी कहानीके पात्र मनके स्तरपर नहीं बल्कि 'आत्मा' के स्तरपर रहकर अपना व्यवहार करते हैं। कभी कभी पात्रोंका उन्नयन होता है और वे मनके स्तरपरसे आत्माके स्तरपर पहुँचते हैं। सुदर्शनजी अपनी कहानियोंमें इसी प्रकारका प्रयत्न करते हुए दिखायी देते हैं।

पं. सुदर्शनका यह प्रयत्न स्तुत्य ही है। भारतीय संस्कृतिमें आत्माका बडा महत्त्व है। आत्माका विकास ही वास्तविक विकास है। इसीलिए जब डॉ. राधाकृष्णन्‌जीसे लंदनमें पूछा गया कि हिंदुधर्मका सार एक वाक्यमें क्या होगा, तब उन्होंने तपाकसे जवाब दिया था—Greatness of the soul is the soul of our religion. यहाँ हम जान लें कि मानवका मन और उसकी आत्मामें अंतर है। मानवका मन काम, क्रोध, लोभ आदिके वशमें रहता है। जब मानव इन विकारोंका शिकार बनता है तब वह मनकी सतहपर चलता है। किंतु जब इन विकारोंको जीतकर वह समूचे संसारकी कल्याणकामना करता है तब वह आत्माके उच्च स्तरपर पहुँचता है। और तभी उसमें देवत्वका विकास भी होता है।

सुदर्शनजीकी कहानियोंमें हमें ऐसे पात्र दिखायी देते हैं जिनकी आत्मा विकसित रहती है या आगे चलकर विकासको प्राप्त करती है। लेखक ऐसे पात्रोंको हमारे सामने रखकर हमें उस आदर्शतक चलनेकी अप्रत्यक्ष रूपसे मानो प्रेरणा देते हैं। उदाहरणके तौरपर हम उनकी 'अलबम' कहानी ले सकते हैं। इस कहानीमें एक गृहस्वामीकी उदारता और उनके घरपर पूजा-पाठ करनेवाले ब्राह्मण पं. शादीरामकी सच्चरित्रताकी 'जुगलबंदी' हम पाते हैं। पं. शादीरामने अपने प्रभुसे पाँच सौ का ऋण लिया है किंतु उसे वापस न करनेका उन्हें बडा अफसोस है। इधर उनके स्वामी सदानंद हैं कि जो एक पाई भी नहीं चाहते हैं। ब्राह्मणोंकी सेवा करना वे अपना फर्ज मानते हैं। तथापि शादीरामको पैसा लौटानेका संतोष प्राप्त हो जाय इसलिए वे चित्रोंके अलबमकी तरकीब निकालते हैं। वे उनसे अलबम बनवाते हैं और एक व्यापारीके नामपर स्वयं ही उसे खरीदते हैं और शादीरामको एक हजार रुपये प्राप्त करा देते हैं। इस प्रकार एक आदर्श उदारताकी झलक हमें इस कहानीमें मिलती है।

किंतु जब हम सुदर्शनजीके इस आदर्शवादको कलाकी कसौटीपर परखकर देखते हैं तब हमें कुछ निराश होना पडता है। बात यह है कि जब हम किसी आदर्शतक पहुँचना चाहते हैं तब मनोवैज्ञानिक सीढियोंको पार किये बिना हम वैसा नहीं कर सकते; नहीं तो वह हनुमान-कूद ही हो जाएगी। मान लीजिये कि आप सीढीपर खडे हैं और नीचे एक गाय बालकको कुचलनेवाली है। अगर आप उस बालकको बचाना चाहते हैं तो आपको सीढी उतरकर ही जाना चाहिये। अगर आप छलांग मारकर जाना चाहें तो आप खुदही गिर जाएँगे और उद्देश्यका सफल होना तो दूर, आपकोही चोट लग जाएगी। यही

बात सुदर्शनजीकी कहानियोंमें होती है। वे आदर्शको स्पष्ट करना चाहते हैं, लेकिन कहानीकी घटना उतनी प्रभावपूर्ण नहीं होती। कहीं कहीं तो विसंगतिभी नजर आती है, जिससे कहानीकी सफलतामें बाधा पडती है।

'न्यायमंत्री' कहानीमें उन्होंने वर्णन किया है कि सम्राट् अशोक एक ब्राह्मणकी न्यायमंत्रीकी जगहपर नियुक्ति करते हैं। वे उसकी परीक्षा लेना चाहते हैं और इसलिए एक पहरेदारका खून करते हैं और न्यायमंत्रीको सात दिनके अंदर कातिलको ढूँढनेकी आज्ञा देते हैं। सात दिन बाद भरे दरबारमें वह न्यायमंत्री निर्भयतासे पहरेदारोंको सम्राट अशोकको गिरफ्तार करनेकी आज्ञा करता है क्योंकि वेही खूनी होते हैं। तब सम्राट् अशोकको न्यायमंत्रीकी नीरक्षीरविवेक वृत्तिका प्रमाण मिलता है और वे खुश हो जाते हैं। लेकिन ऐसे आदर्श न्यायमंत्रीका वर्णन करते वक्त एक निरपराध पहरेदारका खून होता है, यह बात हर वाचकको खटकती है। परीक्षा लेना ठीक है लेकिन परीक्षा लेते वक्त निरपराधीको मारना कौनसा सयानापन है? वही बात 'जीवन और मृत्यु' कहानीमें दिखाई देती है। उसमें उन्होंने एक अमीर लड़की और एक गरीब लड़केके स्वर्गीय प्रेमका वर्णन किया है। लड़कीसे शादी करनेके लिए पैसे कमाने के लिए वह लडका परदेश चला जाता है। इधर उस लड़कीके पिता उसकी शादी कर देते हैं। जब वह लड़का बहुतसे पैसे कमाकर वापस आता है तो शादीकी बात सुनकर वह दंग रह जाता है। लेकिन उसी वक्त उसे पता चलता है कि उसी दिन उसकी प्रियतमाकी मृत्यु हो गयी है। तब तो वह पागलसा बनकर उसकी कबर उखाडता है। तब उसे पता चलता है कि वह जिंदा है। बेहोश होनेपर लोगोंने उसे मृत समझकर उसको दफन किया हैं। तब वह उसे लेकर भाग जाता है। आगे क्या होता है इससे हमारा ताल्लुक नहीं है। लेकिन क्या किसी लड़कीका इसतरह दफना जाना संभव है। और यह इत्तफ़ाकभी कितना अजीब की जिस दिन वह वापस आता है उसी दिन उसकी मृत्यु होती है!

इस प्रकार ऐसा प्रतीत होता है कि सुदर्शनजीकी कहानीके पात्र उनके हाथकी कठपुतलियाँ होती हैं। 'राजपूतानीका प्रायश्चित्त' कहानीका उदाहरण क्यों न लें? उस कहानीकी नायिका सुलक्षणा अपने बचपनके प्रियतमसे मिलनेके लिए पुरुषवेश धारण करके उसके विरुद्ध लडती है और अपना प्रभाव उसपर डालकर उसका दास बनकर दो बरस उसके साथ रहती है! लेकिन जब उसे ज्ञात होता है कि उसके प्रियतमने शादी कर ली है तब वह क्रोधसे पागल बनकर प्रतिशोध लेनेपर तुल जाती है। आगे उसे अपने कृत्यपर पछतावा होता है और वह प्रियतमको कैदसे छुड़ाकर खुद अपनी जान देती है और इस तरह प्रायश्चित्त लेती है। इस कहानीमें लेखकने प्रेममें त्यागका महत्त्व स्पष्ट किया है। लेकिन क्या यह संभव है कि कोई स्त्री पुरुष बनकर दो बरस रहे और किसीको पता न चले! यह तो बिलकुल हिंदी सिनेमाकी तरह हो गया। इसलिए मैं कहती हूँ कि उनकी कहानीके पात्र कठपुतलियोंकी तरह होते हैं और उनको लेखकके कहनेके अनुसार नाचना पडता है। कहीं कहीं वातावरणनिर्मितिमेंभी दोष दिखाई देते हैं।

लेकिन इन दोषोंके बावजूद्भी उनकी कहानी श्रेष्ठ है क्योंकि सब कहानियोंमें ऐसे दोष नहीं है। और महत्त्वकी बात यह है कि उनका ध्येय ऊँचा है। और Well begun is half done के अनुसार अगर ध्येय अच्छा हो तो सफलता दूर नहीं होती। इसीलिए ध्येयकी उच्चताके कारण आजभी हमें उनकी कहानियाँ भाती हैं और हम उन्हें हिंदी साहित्यके उच्च कोटिके कहानीकार मानते हैं।



# अहवाल : १९७१–७२

## प्राध्यापकांचे कार्य

### प्राचार्य मो. भा. लिमये

१. औंध येथील 'इंडस्ट्रियल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'मध्ये Cost Accounting या विषयावर निमंत्रित प्राध्यापक म्हणून व्याख्याने दिली.

२. ललित कलाभवन व कामगार कल्याण केंद्र सहकारनगर, पुणे येथे शिक्षक सत्कार सभेचे अध्यक्षस्थान भूषविले.

३. शाहू महाविद्यालयातील वाणिज्य-संघटनेचे उद्घाटन केले.

४. बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात एम्. कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी Advanced Cost Accounting वर निमंत्रित प्राध्यापक म्हणून व्याख्याने दिली.

५. इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव येथे विद्यार्थ्यांच्या मालवीय पुस्तकपेढीचे उद्घाटन केले.

६. सांगली येथील चिंतामणराव वाणिज्य महाविद्यालयात Diploma in Business Management या विषयावर एम्. कॉम.च्या विद्यार्थ्यांसाठी निमंत्रित प्राध्यापक म्हणून व्याख्याने दिली.

७. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिकेच्या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या महाराष्ट्र मंडळाने आयोजित केलेल्या सत्कार-समारंभाचे अध्यक्षस्थान स्वीकारले.

८. गव्हर्मेंट पॉलिटेक्निकच्या वार्षिक क्रीडा संमेलनाच्या व जलवितरणस्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे.

### प्रा. भीमराव कुलकर्णी

१. 'ऐतिहासिक मराठी नाटके' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

२. पुणे विद्यापीठाची न. चिं. केळकर व्याख्यानमाला सहा व्याख्याने देऊन गुंफिली.

३. विदर्भ साहित्य संघाची बेहेरे व्याख्यानमाला तीन व्याख्याने देऊन गुंफिली.

याखेरीज काही महाविद्यालयातील वाङ्मय मंडळे व वक्तृत्व सभा यांची उद्घाटने, साहित्यिकांच्या जन्मशताब्दी व्याख्यानमाला, वसंत व्याख्यानमाला व साहित्यसंस्था व आकाशवाणी यामधून अनेक व्याख्याने दिली व नियतकालिकांतून काही लेख लिहिले.

४. महाराष्ट्र राज्य सरकारच्या ग्रंथ पारितोषिक समितीवर परीक्षक म्हणून काम केले.

पुण्यातील एकमेव अद्ययावत व आलिशान ग्रंथालय

# कल्पना वाचनालय

१६० शिवाजी नगर, पुणे ५.
(पुणे महानगरपालिका भवनाजवळ)

मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील मासिके, तसेच कथासंग्रह, नाटके, कादंबऱ्या, रहस्यकथा, चरित्र, ज्योतिषशास्त्रविषयक पुस्तके मिळण्याचे विश्वसनीय ठिकाण.

तसेच

एस. एस. सी. ते पदवी परीक्षांची पाठ्यपुस्तके, गाईडस्, पेपरसेटस व संदर्भग्रंथ अल्प वर्गणीत मिळतात.

आपणही एक वेळ अवश्य भेट द्या.

---

उत्कृष्ट व रुचकर आईस्क्रीम्स व स्नॅक्सकरिता

# – गणू शिंदे कोल्ड्रिंक हाऊस –

१०, सरस्वति–विलास बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे ३०

"एक वेळ अवश्य भेट द्या"

---

॥ श्री ॥

इतर समारंभ व गणेशोत्सवासाठी सिनेसंगीत, लावण्या, कोळीगीते, भावगीते, लोकगीते, व गीतरामायण गाणारे

# शशिकांत कुलकर्णी आणि पार्टी

यांचे कार्यक्रम ठरवा अगर लिहा

५६६ रविवार पेठ, विठ्ठल मंदिर, जुन्या तुळशीबागेजवळ, पुणे २
संपदा थिएटर्स, ८६२ सदाशिव पेठ, पुणे ३०

**प्रा. पद्माकर चिरपुटकर :**

'व्यावसायिक गणित' पदवी-पूर्व वाणिज्य विद्यार्थ्यांसाठी मराठीतून पाठ्यपुस्तक.

**प्रा. पद्माकर आपटे :**

'आधुनिक वाणिज्य भूगोल' हे पुस्तक लिहिले व नागरीसंरक्षण संघटनेने आयोजित केलेल्या कार्यशिबिरात ( Workshop ) प्रत्यक्ष भाग घेतला.

**प्रा. अ. लु. पाथरे :**

'Text book of Business Economics' हे पुस्तक लिहिले.

**प्रा. श्री. दा. संगोराम**

१. आकाशवाणी पुणे केंद्रावर 'हसत खेळत हिंदी' या सदरात १२ पाठ झाले.

२. आंतरशालेय रानडे वक्तृत्वस्पर्धेत परीक्षक या नात्याने काम केले.

३. 'हिंदी-दिना' निमित्त म. ए. सो. महाविद्यालयात व्याख्यान झाले.

४. मॉडर्न हायस्कूल मुलींची शाळा, बक्षीस समारंभाचे अध्यक्षपद.

**प्रा. वि. भा. देशपांडे**

१. 'तुकारामाचे प्रबोधन कार्य' या विषयावर दे. ऋ. ब्राह्मण संस्थेत व्याख्यान.

२. आकाशवाणी ( पुणे ) केंद्रावरील दोन भाषणे.
   ( १ ) भा. रा. तांबे यांची कविता
   ( २ ) 'मराठी नाटककार' भाषणमालेत 'नाटककार राणे'

३. डॉ. श्रीराम लागू यांची 'सोबत'च्या दिवाळी अंकात दीर्घ मुलाखत.

ॐ

## प्राध्यापक–अकादमी

प्राध्यापकांसाठी एखादे चर्चापीठ असावे असे मार्च १९७१ च्या प्राध्यापकांच्या बैठकीत ठरले. या वर्षारंभी स्थापन झालेली प्राध्यापक अकादमी ही त्याचेच मूर्त रूप होय.

आपल्या विषयातील नवनवीन विचारांची ओळख एखाद्या विषयाच्या चर्चेच्या निमित्ताने सर्व सहकारी प्राध्यापकांना व्हावी, प्रत्येक विषयाची विचार-पद्धती समजावी व प्रत्येक विषयाचा अभ्यास-वस्तूची वैशिष्ट्ये जाणून त्याचा आपल्या विषयाच्या अभ्यासालाही फायदा व्हावा हा विचार या अकादमीच्या मुळाशी आहे. चर्चेच्या वेळी त्या त्या ज्ञानशाखेतील अधिकारी व्यक्तींचेही विचार ऐकावयास मिळतात आणि चर्चेची पातळी आणखी उंचावते हा फायदाही कमी मोलाचा नाही.

वर्षाच्या सुरुवातीला पहिल्या सहामाहीचा कार्यक्रम आखण्यात आला. त्यानुसार तीन चर्चासत्रे आणि एक परिसंवादात्मक चर्चा योजण्यात आली व तीच पद्धत दुसऱ्या सहामाहीतही अंमलात आणण्याचे ठरले.

प्राध्यापक–अकादमीमध्ये वाचले गेलेले निबंध अतिशय उद्बोधक असल्याने पुढे मागे त्यांचे संग्रह प्रसिद्ध करण्याची योजना आहे. त्यापूर्वी त्यासंबंधी काही कल्पना यावी म्हणून त्यांचा अल्पांश गोषवाऱ्याच्या रूपाने खाली देण्यात येत आहे.

Phone : 58931.

*With Best Compliments from*

# HOTEL VISHVA

## Boarding & Restaurant

**Opp. Municipal Sports Club**

**Near Saras Baug, Vijayanagar Colony**

**Poona 30.**

**Prop : S. A. Hegade.**

---

Welcome ! Welcome ! ! Welcome ! ! !

# G A J A N A N

## HOSIERY

**73 & 1181 Budhawar Peth. Near Tulshibag. Poona-30**

**Stockist : Dawn Hosiery, R. R. Hosiery, Victor Hosiery.**

**For-Banians & Underavears.**

**AND NOW**

**Attractive ' SONY ' Brassiars**

**ONCE VISITED ALWAYS PATRONISED !**

**CUSTOMER'S HAPPINESS IS OUR PROFIT ! !**

**Prop : A. B. Shalgar**

| महिना | चर्चेचा विषय | प्रमुख वक्ते | बैठकीचे अध्यक्ष |
|---|---|---|---|
| जुलै–७१ | राष्ट्रीयीकरण केलेल्या पतपेढ्यांचे कार्य एक समालोचन | प्राचार्य मो. भा. लिमये | श्री. चिं. बि. जोग. कस्टोडियन बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे |
| ऑगस्ट–७१ | मराठी लघु नियतकालिके आणि अनियतकालिके. | डॉ. प्रा. भीमराव कुलकर्णी | डॉ. प्रा. रा. शं. वाळिंबे मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे |
| सप्टेंबर–७१ | जीव-शरीरातील रासायनिक संतुलन हार्मोन्सचे महत्त्व | डॉ. प्राध्यापक स. य. परांजपे | डॉ. प्रा. शील मुल्हेरकर प्राणिशास्त्र विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे |
| ऑक्टोबर ७१ | सद्यःपरिस्थितीत महाविद्यालयीन शिक्षकाची भूमिका | खुली चर्चा | प्राचार्य देवदत्त दाभोळकर फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे |
| डिसेंबर–७१ | सांस्कृतिक संधी बौद्धिक कार्य आणि निर्धनता | डॉ. प्रा. सौ. कनारसे | डॉ. प्रा. एम. एन. पळसाने प्रपाठक, प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे विद्यापीठ, पुणे. |
| जानेवारी–७२ | वाङ्मयाची संस्कार शक्ती | प्रा. सीताराम रायकर | प्रा. एम जी. देसाई इंग्रजी–विभाग, फर्ग्युसन महाविद्यालय पुणे. |
| फेब्रुवारी–७२ | किरणोत्सर्ग ( Radio-activity) | डॉ. ल. ह. गाडगीळ | डॉ. अरणीकर, प्रमुख, रसायन-शास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे. |
| मार्च–७२ | अमेरिका येथील महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचे स्वरूप | डॉ. प्रा. व्लिस | डॉ. प्रा. दि. का. गर्दे, प्रमुख, राज्यशास्त्र व पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे |

## राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या कामकाजाचा आढावा

व्यापारी बँकांनी आपल्या कामकाजामध्ये समाजातील बदलांची जरूर ती दखल घेणे व त्यात यथाशक्ती आपला वाटा उचलणे आवश्यक आहे. राष्ट्रीयीकरण हे त्या दिशेने टाकलेले योग्य पाऊल आहे असे म्हणता येईल. परंतु व्यापारी बँका हा एक व्यवसाय आहे, धंदा आहे व त्यामुळे धंद्यासाठी आवश्यक ती सर्व पथ्ये पाळूनच व्यापारी बँकांनी आपला व्यवसाय व व्यवहार केला पाहिजे.

गेल्या दोन वर्षांच्या काळात व्यापारी बँकांनी दिलेली कर्जे, व स्थापिलेल्या शाखा यामध्ये संख्येच्या दृष्टीने चांगली प्रगती झाली आहे. परंतु ठेवीतील वाढ, निरनिराळ्या विभागात असलेला कमीजास्त आर्थिक मागासलेपणा व विषमता दूर करणे, या बाबतीत आणि गुंतवणुकीवर मिळविलेल्या नफ्याचे प्रमाण अंतर्गत संघटना व परस्पर संबंध – विशेषतः ग्राहक व बँका —या बाबतीत मात्र प्रगती फारच कमी व मंद आहे असे म्हणावे लागेल.

संख्यात्मक प्रगतीबरोबरच गुणात्मक प्रगतीची नितांत आवश्यकता आहे.

मो. भा. लिमये

*With Best Compliments From*

# MIRACLE MAKERS

## Painting Contractors

**1187/20, Ghole Road, Poona 5.**

**Office Tel. 53050** **Resi. Tel. 55901**

**BRANCH OFFICES**

**Kolhapur Office**
**1528, C, Magdum Building**
**Laxmipuri Kolhapur.**
**Tel. : 1519**

**Bombay Office**
**4 F 2, Court Chambers**
**35 New Marnie Lines**
**Bombay 20 BR**
**Tel. : 299979**

**Nasik Office**
**Jail Road Corner**
**Opp. Bytco Talkies**
**Nasik Road.**

**Satara Office**
**531/B, 'Savali' Camp**
**Satara**

# KOSHI MEDICO

**Chemists & Druggists**

## All Types Of Medicines

**1321/1 J. M. Road, Opp. Modern High School,**
**Shivajinagar, Poona 5.**

**Phone : 57073**

# SAMARTH

**SUBSCRIPTION AGENCY**

Jangli Maharaj Road, POONA 5.

**Importer of technical & College books & Subscription Agents.**

## मराठीतील अनियतकालिके व लघुनियतकालिके

भीमराव कुलकर्णी

मराठीतील लघुनियतकालिके व अनियतकालिके ही गेल्या काही वर्षांत काही पाश्चात्त्यांच्या अनुकरणाने व काही परिस्थितीपोटी निर्माण झाली आहेत. पाश्चात्त्य राष्ट्रांतील तरुणांच्या मनातील असंतोष व वैफल्य ही अशा प्रकारच्या नियतकालिकांतून प्रकटली. प्रस्थापितावद्दलचा असंतोष आणि यंत्रयुगामध्ये चैतन्यशील व्यक्तिमत्त्वांची होत असलेली कुचंबणा या नियतकालिकांतून बंडखोरीच्या रूपाने प्रकटली. ही बंडखोरी अर्थातच या नियतकालिकांतून व्यक्त होणाऱ्या आशय आणि अभिव्यक्तीच्या प्रकारातच केवळ आहे.

मराठीतल्या या नियतकालिकांतून ह्या वैशिष्ट्यांचा प्रादुर्भाव झालेला दिसेल. एक प्रकारच्या मुक्त वृत्तीने, बेफिकीरीने व बेहोषीने ते लिहितात. अर्थातच त्यामध्ये कलात्मकता फारच कमी आढळते. ही बंडखोरी ही केवळ वाङ्मयीन स्वरूपाची आहे. सामाजिक व धार्मिक विश्लेषणाची व्यापक बैठक तिला नाही. सामाजिक कार्याचीही जोड नाही. त्यामुळे यातून प्रकटलेले सारे वाङ्मय तकलादू व खुरटे आहे.

ॐ

## रासायनिक सुयुक्तीकरण
### ( Chemical co-ordination )

प्रा. डॉ. स. य. परांजपे

रासायनिक सुयुक्तीकरण संप्रेरक द्रव्यामार्फत ( hormones ) केले जाते. ह्या द्रव्यांची कार्ये जीवनावश्यक व विवक्षित असतात. ही द्रव्ये प्राणी वा वनस्पती यांत आढळतात.

माणसाच्या शरीरातील संप्रेरक द्रव्ये वाढ, विविध प्रकारच्या मानसिक ताणास शरीरास तोंड देता येण्यासारखी परिस्थिती निर्माण करणे, जननसंस्था व इतर इंद्रियांच्या कार्याचे नियमन करणे, अशी अनेक महत्त्वाची कामे करतात. त्यांच्या निर्मितीत काही बिघाड झाला तर मधुमेह, गॉयटर इ. रोग उद्‌भवतात. वनस्पतीतही वाढ, त्रियांचे रुजणे, फुलोरा येणे, फळांचे पिकणे इ. दृष्टीने संप्रेरक द्रव्ये महत्त्वाची असतात.

संप्रेरक द्रव्ये पेशीवर नेमके कसे परिणामकारी कार्य करतात हे अद्याप पूर्णपणे समजलेले नाही. त्या दृष्टीने महत्त्वाचे संशोधन सुरू आहे. या संबंधात १९७१ चे इंद्रियविज्ञान व वैद्यकशास्त्र विषयातील नोबेल पारितोषिकविजेते डॉ. सदरलंड या अमेरिकन शास्त्रज्ञास देण्यात आले आहे. डॉ. सदरलंड यांनी, संप्रेरक द्रव्ये सायक्लिक एएम्‌पी ( Cyclic AMP ) द्वारे पेशीवर परिणाम कसे करतात हे दाखवून दिले आहे. या शोधामुळे मधुमेह, कॉलरा, इतकेच काय पण कॅन्सरही बरा करण्यात प्रगती होऊ शकेल अशी आशा आहे.

ॐ

## सद्यःस्थितीतील महाविद्यालयीन शिक्षकाची भूमिका

या खुल्या चर्चेमध्ये प्राचार्य लिमये, डॉ. भीमराव कुलकर्णी, प्रा. रायकर, डॉ. सौ. बनारसे, डॉ. गाडगीळ, प्रा. मिजार, प्रा. संगोराम इत्यादिकांनी प्राध्यापकांशी संबंधित असलेल्या विविध प्रश्नांची चर्चा करणारी टिपणे वाचली व त्यांवर खुली चर्चा झाली. आजच्या आणि कालच्या समाजरचनेतील फरक, आजच्या प्राध्यापकांच्या मर्यादा, या व्यवसायाकडे वळणाऱ्या व्यक्तींची कर्तव्यबुद्धी, त्यांच्या बद्दलच्या समाजाच्या अपेक्षा, पाश्चात्त्य राष्ट्रांतील प्राध्यापकांशी इथल्या प्राध्यापकांची तुलना इ. अनेक विषयांवर उद्‌बोधक विचार या प्रसंगी ऐकावयास मिळाले.

चर्चेमध्ये नेस वाडिया कॉलेजचे प्राचार्य भणगे, प्रो. ए. संस्थेचे सेक्रेटरी श्री. वि. म्यं. ताटके व मॉडर्न हायस्कूलचे श्री. घाटपांडे व गोखले यांनी भाग घेतला. प्राचार्य देवदत्त दामोळकर यांच्या अध्यक्षीय भाषणात प्रेरक व मूलभूत विचारांचे दिग्दर्शन झाले. विटगेन्स्टाइन व रसेल यांच्या संबंधीची एक आठवण सांगून ते म्हणाले की, एखाद चांगला प्राध्यापक आपल्या महाविद्यालयातून वावरतो आहे, या घटनेला फार महत्त्व असते. त्याला नियमात व वेळापत्रकात अडकल्याने त्याच्यातील चैतन्यशक्तीचा ऱ्हास होतो, हे लक्षात घेण्यासारखे आहे.

## सांस्कृतिक संधी आणि बौद्धिक कार्य

**डॉ. सौ. श्यामला वनारसे**

आजचा चर्चाविषय केवळ मानसशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचा नाही तर त्यामागे एक मोठा सामाजिक आशय आहे. व्यक्तीव्यक्तीच्या बौद्धिक कार्यात आणि कुवतीमध्ये दिसून येणारा फरक नैसर्गिक मानण्याकडे कल असतो. पण वस्तुतः तो फरक परिस्थितिजन्य आहे. संधीचा अभाव हे त्याचे महत्त्वाचे कारण असून ती तशी नाकारली गेल्याने समाजातील निर्धन वर्ग अधिक गरीब आणि अधिक उपेक्षित बनलेला आहे.

निर्धनतेचे परिणाम केवळ आर्थिक वा राजकीय नाहीत. व्यक्तीचा सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोण व वर्तणूक ह्यावर त्याचा मोठा परिणाम होतो. आपल्या समाजातील विशिष्ट सांस्कृतिक व्यूहामुळे आर्थिक निर्धनता, सांस्कृतिक मागासलेपणा बौद्धिक मंदता यांनी एकूण जीवनाचे वर्तुळ आकसले जाते आणि ह्या गोष्टी एखाद्या चक्राप्रमाणे एकमेकांभोवती फिरतात. त्याने अशा जीवनात हरतऱ्हेची उपासमारच होते. निकृष्ट घरे, निःसत्त्व व अपुरा आहार, दुरावलेले कौटुंबिक जीवन, भोवतालचे अनुत्सुक वातावरण ह्या सर्वांमुळे व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व खुरटून जाते. ह्या सर्वांचा त्याच्या (१) स्वत्व कल्पना (२) अमूर्त विचार करण्याची शक्ती (३) अवधान व विचारांची कक्षा (४) भाषिक वर्तन (५) स्मरण प्रक्रिया आणि (६) भावनिक स्थैर्य ह्या सर्व मनोव्यापाराच्या घटकांवर मोठा परिणाम होतो. सामाजिक गुन्हेगारी, विद्यार्थि-शिक्षक-शिक्षणक्रम इ० अनेक प्रश्नांत वरील प्रक्रियांचे परिणामही महत्त्वाचे आहेत.

## वाङ्मयाची संस्कारशक्ती

**प्रा. सीताराम रायकर**

फार पूर्वीपासून साहित्य मानवाचे उन्नयन करते, त्याला नैतिक बनविते अशा प्रकारची साहित्यविषयी भूमिका मांडण्यात येत आहे. या भूमिकेच्या मागे साहित्याचा वाचकाच्या मनावर खोल परिणाम होतो आणि हा परिणाम त्याच्या व्यक्तित्वात बदल घडवून आणण्याइतका असतो ही कल्पना अध्याहृत होतीच. साहित्याबद्दलच्या या कल्पनेमुळे जेव्हा विसाव्या शतकात 'साहित्यिक संस्कृती' च्या माहेरघरीच म्हणजे युरोपातील संस्कृतिसंपन्न अशा देशात जेव्हा मानवजातीवर लाजिरवाणे असे अनन्वित अत्याचार घडून आले आणि विशेषतः असे अत्याचार साहित्यावर वाढलेल्या आणि पोसल्या गेलेल्या व्यक्तींकडून केले गेले त्या वेळी साहजिकच साहित्याविषयीच्या या भूमिकेला तडा गेला व वाङ्मय खरोखरीच माणसाला नैतिक दृष्ट्या अधिक 'चांगले' करते का निव्वळ छापील शब्दांपुरतेच त्याचे भावनिक विश्व बंदिस्त करून प्रत्यक्षात आपल्या आजूबाजूला असलेल्या अमंगलाकडे पाहण्याची व त्याच्याशी झगडण्याची शक्ती नष्ट करते ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला.

असे प्रश्न वाङ्मयाच्या अभ्यासक्रमाकडूनच उपस्थित केले जातात. यावरून वाङ्मयविषयक आपली जाण अजून

किंवी अविकसित आहे हे दिसून येते. वरील आक्षेपाला उत्तर म्हणून कोणी वाङ्मय ही स्वतंत्र कला आहे आणि इतर कलांप्रमाणेच तिचा जीवनाशी काही संबंध नाही असे म्हणू शकतील, पण वाङ्मयाचा मानवी अस्तित्वाशी असलेला निकट संबंध लक्ष्यात घेता असे विधान भ्रामक आहे हे सहज ध्यानात येते. या दोन टोकाच्या भूमिका सोडल्या तर साहित्याचा जीवनाशी संबंध आहे पण तो जीवन सुधारू पाहणाऱ्या एखाद्या 'धर्माचा' जीवनाशी असतो तशा प्रकारचा नाही. साहित्यामध्ये मंगलाचे दर्शन घडते. मानवी जीवनाच्या अस्तित्वाच्या अनेक पातळीवरील शक्यता आपण साहित्यामध्ये पाहू शकतो, आणि या विस्तारलेल्या जाणिवांतूनच आपल्याला मानवी जीवनाबद्दलची एक नवी जाण येत असते. साहित्याची ही मर्यादित भूमिका लक्षात ठेवली तर आपण साहित्याचे योग्य मूल्यमापन करू शकू.

## किरणोत्सर्ग

ल. ह. गाडगीळ

मूलद्रव्याच्या प्रत्येक अणूची अंतर्रचना पाहिली असता त्याच्या केंद्रात प्रोटॉन हे धनविद्युतभारित न्यूट्रॉन हे भाररहित आणि केंद्राभोवती फिरणारे इलेक्ट्रॉन हे ऋणविद्युत्भारित कण असतात.

काही मूलद्रव्याच्या अणुकेंद्रामध्ये विघटन होऊन त्यामधून अल्फा, बीटा व ग्यामा असे किरण नैसर्गिकरीत्या बाहेर पडत असतात. त्याची भेदकशक्ती अल्फाकडून गॅमाकडे वाढत गेलेली असते. असे विघटन होत असताना तयार होणाऱ्या पदार्थांची एक साखळीही दिसून येते आणि शेवटी ह्या द्रव्याचे शिशात रूपांतर होते.

अणुकेंद्रातील विघटन कृत्रिमरीत्याही सुरू करता येते. अणुकेंद्रावर न्युटेरॉन कणांचा मारा करून तो अणू किरणोत्सर्गी बनविता येतो. युरेनियममधून असे कृत्रिम विघटन करून त्यामधून फार मोठी शक्ती मुक्त करण्यात आली. ती अणुबॉबच्या रूपाने दिसून आली.

अणुशक्ती शांततेच्या कार्यासाठीही वापरता येईल. तसेच तटस्थीय ( Isolate ) द्रव्यांचे औषधी उपयोगही खूप आहेत आणि कृत्रिम विभाजनपद्धतीचे परिणामही महत्त्वाचे आहेत.

'प्राध्यापक अकादमी'साठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य लिमये यांचे मार्गदर्शन व प्रेरणा मोठ्या प्रमाणात मिळाली हे येथे मुद्दाम नमूद केले पाहिजे.

ह. गो. नांदेडकर, कार्यवाह

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

यंदाचे वर्षी आमच्या महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बा. पां. आपटे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २२–२३ डिसेंबर १९७१ रोजी साजरे करण्याचे नियोजित केले होते. तथापी त्याच सुमारास भारत-पाक युद्धामुळे निर्माण झालेली आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेऊन स्नेहसंमेलन रद्द करावे व त्यामधून होणारी बचत राष्ट्रकार्यासाठी वापरात आणावी असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे स्नेहसंमेलनासाठी जमलेली रु. १५०० ची रक्कम अल्पबचतीमध्ये गुंतविण्यात आली व संमेलनाचे कार्यक्रम स्थगित करून फक्त वार्षिक पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी विविध खेळांच्या आंतरवर्गीय सांघिक व वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. गेल्या वर्षीपेक्षा अधिक स्पर्धा आयोजित केल्या व त्यामध्ये एकूण ६४२ विद्यार्थी सहभागी झाले.

वार्षिक पारितोषिक-वितरणाचा कार्यक्रम दिनांक २५ जानेवारी १९७२ रोजी सायंकाळी सौ. कमलाबाई आपटे

LEARN
THE BANKING HABIT
*with*

# BANK OF MAHARASHTRA

*Head Office*
1177, BUDHWAR PETH,
POOHA - 2

YOUR BANK
with the personal touch.
At your Service for years
to come

*Contdct for :—*

WORLD-WIDE TRBNSACTIONS

C. V. JOAG
Custodian

With Best Compliments From

# POONAM TILES

Manufacturer of Quality Plain & Mosaic Cement Tiles, Grills,
Benches & Mosaic Kitchen Platforms Etc.

39, Gultekadi, Shankarshet Road,
POONA-9

Grams , PATELGROUP

Phone : 24376

यांचे शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना अल्प-बचतीच्या रोख्यांच्या स्वरूपात बक्षिसे देण्यात आली.

या प्रसंगी बोलताना सौ. कमलाबाई आपटे यांनी संस्थेबद्दलची आत्मीयतेची व आपुलकीची भावना व्यक्त केली व महाविद्यालयाने अल्पावधीत केलेल्या प्रगतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. संस्थेचे कार्यवाह श्री. वि. त्र्यं. ताटके यांनीही आपल्या भावपूर्ण भाषणात कर्तव्यनिष्ठा व जिद्द यांच्या प्रेरणेने हे महाविद्यालय कसे निर्माण झाले आहे हे सांगितले व अल्पावधीतच संस्था महाविद्यालया-साठी वसतिगृहासारख्या इतरही सोयी उपलब्ध करून देईल असे आश्वासन दिले.

प्राचार्य लिमये यांनी सुरुवातीसच मुख्य पाहुण्यांचे व आमंत्रितांचे स्वागत केले व महाविद्यालयातील प्रमुख घटनांचा आढावा घेतला. महाविद्यालयाची समाधानकारक संख्या, गेल्या वर्षी विद्यार्थ्यांनी मिळविलेले नेत्रदीपक यश, या वर्षी अनेक प्रकारच्या स्पर्धांमध्ये 'मॉडर्न'च्या विद्यार्थ्यांची यशस्वी कामगिरी व युद्धकाळात विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने व स्वयंस्फूर्तीने केलेल्या कार्याचा व प्राध्यापकांच्या अनेकविध कार्यांचा गौरव केल्यानंतर प्राचार्य म्हणाले,

"१५ जून १९७० ला सुरुवात झालेल्या या महा-विद्यालयात यंदा ११२५ विद्यार्थी शिक्षण घेत असून द्वितीय वर्षीच वाणिज्य शाखेकडे पदवी वर्गाची सोय केली आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाचीही या महाविद्यालयास मान्यता मिळाली आहे. १९७०–७१ च्या ७०८ संख्ये-वरून दुसऱ्याच वर्षी गेलेली ११२५ ही संख्या व पदवी-पर्यंतचे वर्ग हे या महाविद्यालयाच्या कामाची व दर्जेदार शैक्षणिक सोयींची ग्वाही देतात असे म्हटले तर अति-शयोक्ती होणार नाही.

या दृष्टीने आमचे गेल्या वर्षीचे विद्यापीठाच्या परीक्षां-तील निकालही हीच गोष्ट जास्त स्पष्ट करतात. आमचे तीन विद्यार्थी पदवीपूर्व परीक्षेत विद्यापीठात पहिल्या दहा क्रमां-कांत उत्तीर्ण झाले.

पहिल्याच वर्षी इतके उज्ज्वल यश मिळवून या महा-विद्यालयाने एक विक्रम केला आहे याचा आम्हांला रास्त अभिमान वाटतो.

काही विद्यार्थ्यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांकाचे यश मिळवावे या प्रयत्नाबरोबरच या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी एकूण विद्यापीठ परीक्षांत उत्तीर्ण व्हावेत यासाठीही आम्ही प्रयत्न केले व त्या बाबतीतही आम्हांला उत्तम प्रतिसाद मिळाला आहे.

आमचे यंदाचे विद्यार्थी या वर्षीदेखील महाविद्या-लयाच्या या उज्ज्वल प्रतिमेस अधिक उजाळा देतील अशी मी आशाच नव्हे तर खात्री बाळगतो.

अभ्यासाबरोबरच अभ्यासेतर कार्यक्रमांतही आमचे विद्यार्थी आघाडीवर आहेत. खेळ, सहली, विविधस्पर्धा, व्याख्याने, भित्तीपत्रके या सर्व कार्यक्रमांत भरपूर उपस्थिती व सहभाग विद्यार्थ्यांनी दाखवला आहे.

यंदाचे वर्ष संकटाशी सामना करण्याचे वर्ष म्हटले पाहिजे. आपला प्रदेश, आपले राज्य, आपले राष्ट्र यावर अनेक संकटे आली आणि आंतरराष्ट्रीय संबंधातही बिकट परिस्थिती निर्माण झाली. राष्ट्राच्या या कसोटीच्या काळात प्रत्येक नागरिकाचीही कसोटी असते. आमचे विद्यार्थी या कसोटीच्या काळात कधीच कमी पडले नाहीत. त्यांच्या कर्तव्यात त्यांनी कधीही कसूर केली नाही. या बाबतीत मला मोठ्या अभिमानाने सांगावे वाटते ते हे की, आपले सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य पार पाडीत असतानाही त्यांनी विद्यार्थी या नात्याने करावयाच्या त्यांच्या प्रमुख कर्तव्याला कधीही बगल दिली नाही.

कदाचित आमच्या विद्यार्थ्यांच्या कार्याची जाहेर जाहि-रात झाली नसेल. परंतु त्यांनी जे केले ते स्वेच्छेने, स्वयं-प्रेरणेने व अत्यंत उत्साहाने आणि आत्मीयतेने केले हे येथे अवश्य नमूद केले पाहिजे. महाविद्यालयातील आपले तास बुडवून किंवा प्रॅक्टिकल्स चुकवून आमचे विद्यार्थी विजय-मोर्चामध्ये सामील झाले नाहीत हे मला अत्यंत अभि-मानाने आपल्यापुढे नमूद करावेसे वाटते.

आमच्या विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी बांगला देश निर्वासित मदतीसाठी व दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांसाठी रु. १२०० जमा केले.

४० विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले असून १९० विद्यार्थी व ७५ विद्यार्थिनींनी रक्तदानाची तयारी दाखविली आहे.

स्नेहसंमेलन रद्द करून व इतर काटकसर व बचत करून विद्यार्थी सभेने रु. ३५०० राष्ट्रीय बचत योजनेत गुंतवले आहेत.

कोणत्याही महाविद्यालयाचा केंद्रबिंदू तेथील विद्यार्थि-वर्ग होय. महाविद्यालयाचे यश हे सर्वस्वी विद्यार्थ्यांचे यश

होय. परंतु अपयशाची जबाबदारी विद्यार्थ्यांवरच टाकता येईल असे नाही. संस्थेतील प्राध्यापक व प्राचार्य यांच्यावर योग्य मार्गदर्शनाची जबाबदारी असते ती त्यांनी व्यवस्थित व जाणीवपूर्वक पार पाडल्यास त्याची पुरेपूर जाण विद्यार्थ्यांस असते व तो त्याची परतफेड करतो असा माझा व माझ्या सहकाऱ्यांचा अनुभव आहे.

गेल्या वर्षी आम्ही थोडे चाचपडत होतो, उत्साह होता पण आवाक्याची कल्पना नव्हती, सहकार्य होते, परंतु सारेच नवीन असल्याने काहीसा परकेपणा होता, परंतु यंदा मात्र हे चित्र संपूर्णतः बदलले आहे. यंदा महाविद्यालयातील शिस्त, सौजन्य व शांतता पाहून आता मनोमीलन झाले आहे हे मला अत्यंत अभिमानाने नमूद करावेसे वाटते. याचे संपूर्ण श्रेय माझ्या सहकाऱ्यांचे व माझ्या विद्यार्थि-मित्रांचे आहे.

मित्रहो, विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनात पुढे उपयोगी पडेल अशी काही शिदोरी मिळवायची असते. तुम्ही विद्यार्थ्यांनी आपल्या प्राध्यापकांच्या व येथील वास्तूच्या साहचर्यातून आपल्या विकासासाठी श्रम व कौशल्य पणाला लावून वर्षभर काही काही उपक्रम केलेत. आमचा तुमच्यावर व तुमच्यातील कर्तृत्वावर दृढ विश्वास आहे.

आमची आमच्या कार्यावर दृढ निष्ठा आहे. या निष्ठेतून व विश्वासातूनच अखेर आव्हाने स्वीकारता येतात. जीवन यशस्वी होण्यासाठी समतोल व्यक्तिमत्त्व, स्पष्ट व प्रभावी विचारदर्शन आणि शिस्तबद्धता यांची जरुरी असते.

परस्पर सहकार्याच्या प्रेरणेने आपण आपले जीवन सर्वांगसुंदर व यशस्वी करू या. The great are great only because you are on your knees. Let us rise.

समारंभ यशस्वी करण्यासाठी सान्या प्राध्यापकवर्गाने व विद्यार्थि-प्रतिनिधी व स्वयंसेवक यांनी फार मेहनत घेतली. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार."

अ. वी. तांबे ( G. S.)
शैला कुलकर्णी ( I C S R Ladies )
उदय लागू ( I C S R Gents )

प्रा. स. य. गंभीर, कार्याध्यक्ष
प्रा. पद्माकर आपटे, उपकार्याध्यक्ष

## विद्यार्थि-जगत

### विद्यार्थि-संघटना

विद्यार्थि-संघटनेचे पदाधिकारी सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निवडून दिलेले असावेत हा निर्णय या वर्षी घेण्यात आला. त्याप्रमाणे झालेल्या निवडणुकीत खालील विद्यार्थी निवडून आले.

(१) अ. मि. तांबे...( विद्यार्थि-संघटना चिटणीस )
(२) म. म. दाते...( नाट्य-विभाग चिटणीस )
(३) श्री. मं. बेलसरे...( विद्यार्थि-वाचनालय चिटणीस )
(४) मुकुंद कडूसकर...( कलामंडळ चिटणीस )
(५) वि. दे. बोराणा...( वादविवाद मंडळ चिटणीस )

प्रा. रायकर यांना विद्यार्थि-संघटनेचे कार्याध्यक्ष नियुक्त करण्यात आले होते. प्रा. महाबन, प्रा. धायगुडे, प्रा. वि. मा. देशपांडे, प्रा. संगोराम व प्रा. सौ. वनारसे यांनी प्रस्तुत वर्षी अनुक्रमे विद्यार्थी वाचनालय, वादविवाद मंडळ, नाट्यविभाग व कलामंडळ यांना बहुमोल मार्गदर्शन केले. विद्यार्थि-संघटनेचे खालील उपक्रम इतिवृत्तांच्या या वर्षात पार पडले.

### विद्यार्थिवाचनालय आणि ग्रंथालय

विद्यार्थ्यांत अभ्यासेतर वाचनाची आवड वाढावी या हेतूने या वर्षी हा विभाग नव्याने सुरू करण्यात आला. विद्यार्थ्यांनी केलेल्या सूचनेनुसार आणि प्राध्यापकांच्या शिफारसीनुसार पुस्तके घेण्यात आली. यात नाटके, काद-

री, कथा काव्य, प्रवासवर्णने, आत्मचरित्रे, निबंध इत्यादींचा समावेश आहे. या वर्षी इंग्रजी, मराठी, व हिंदी मिळून एकूण २२८ पुस्तके घेण्यात आली आहेत. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद आहे. या विभागाचे चिटणीस श्री. श्रीनिवास वेलतरे यांनी ग्रंथालयाचे काम विनावेतन केले हे नमूद करावेसे वाटते.

## कला-मंडळ

कलामंडळाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध चित्रकार प्रा. भैय्यासाहेब ओंकार यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी भरविण्यात आलेल्या रांगोळी प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्याबद्दल प्रा. ओंकार यांनी प्रशंसोद्‌गार काढले.

दिनांक २६-८-७१ ला विविध वाद्यवादन कार्यक्रम झाला. त्यात प्रसिद्ध सतारिये पं. रविशंकर यांचे आपल्या महाविद्यालयात शिकत असलेले शिष्य श्री. सरदेशमुख यांचे बहारदार सतारवादन झाले.

१५-९-७१ ला संगीत संध्या हा विविध गीत-गायनाने नटलेला कार्यक्रम सादर करण्यात आला. यातही विद्यार्थि-विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने भाग घेतला.

१२-९-७१ ला पुण्यातील परदेशी विद्यार्थ्यांना कॉलेजात पाचारण करण्यात आले होते. परस्परांशी ओळख करून घ्यावी आणि वाढवावी या हेतूने घडवून आणलेल्या या कार्यक्रमात सिंबायोसिसच या संघटनेची अतिशय मदत झाली. किंबहुना या संस्थेचे डॉ. मुजुमदार आणि डॉ. जेम्स रामलाल यांच्या सहकार्याशिवाय हा कार्यक्रम होऊच शकला नसता. या कार्यक्रमात परदेशी मुलांनी त्यांच्या देशातील नृत्य, गायन सादर केले. तसेच आपल्या महाविद्यालयातील मुलांनी लावणी, कथ्थक नृत्य इत्यादी कार्यक्रम सादर केले. १९७१ चे वर्ष वंशभेद प्रतिकार वर्ष होते. त्याला अनुरूप असाच हा कार्यक्रम करण्यात आला.

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांची वाढ व्हावी व त्यासाठी त्यांना योग्य ती साधने उपलब्ध असावीत या दृष्टीने कलामंडळाने यंदा हार्मोनियम व तबला ही वाद्ये खरेदी केली आहेत व पुढील वर्षी आणखी काही वाद्ये खरेदी करण्याचे निश्चित केले आहे. या हारमोनियमचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध हारमोनियम वादक डा. पाळकर यांचे हस्ते झाले. याप्रसंगी श्री. चंद्रकांत कामत यांनी तबल्यावर साथ केली.

*

फर्ग्युसन महाविद्यालयातील रसायन शास्त्राचे प्राध्यापक मालती केळकर यांचे विज्ञान संशोधनातील नाट्य या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान झाले.

दि. १६-९-७१ रोजी 'हिंदी दिवस' साजरा करण्यात आला. या प्रसंगी पुणे विद्यापीठातील हिंदी विभागातील रीडर डॉ. जोगळेकर यांचे व्याख्यान झाले. तसेच प्रा. मुकुंद महाजन यांचे उर्दू शायरी या विषयावर १९ जानेवारी १९७२ रोजी व्याख्यान झाले.

## वाद्‌विवाद मंडळ :

वादविवाद मंडळाचे उद्‌घाटन प्राध्यापक अरविंद मंगरूळकर यांच्या हस्ते झाले.

न्यायमूर्ती रानडे वादस्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील कु. अभ्यंकर यांना प्रशस्तिपत्रक मिळाले.

सांगली येथील स्पर्धेत श्री. पी. डी. कुलकर्णी यांना वैयक्तिक पारितोषिक मिळाले. त्याचप्रमाणे धुळे येथील वादस्पर्धेत श्री. एस्. डी. क्षीरसागर यांना प्रशस्तिपत्रक मिळाले.

## नाट्यविभाग :

पुरुषोत्तम करंडक नाट्यस्पर्धेत आपल्या महाविद्यालयाने 'बंडू, नानू आणि गुलाबी हत्ती' ही एकांकिका सादर केली. स्पर्धेतील प्रयोग उल्लेखनीय झाल्यामुळे पुन्हा एक प्रयोग महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या सौजन्याने भरत नाट्यमंदिरात सादर करण्यात आला.

गतवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी मोठ्या संख्येने व उत्साहाने रक्तदान केले.

यावर्षी दुष्काळ आणि बांगला देशातून आलेले शरणार्थी या दोन आपत्तींमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांच्या सोडवणुकीला हातभार लावावा, या दृष्टीने विद्यार्थ्यांनी बहुमोल सहकार्य दिले व जमा झालेल्या रकमेतून दुष्काळग्रस्तांना आणि शरणार्थींना मदत देण्यात आली.

डिसेंबर १९७१ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धात जे जवान जखमी झाले त्यांना वस्तू भेट द्याव्यात या उद्देशाने

Phone : 57821

*With Best Compliments From*

# The ELITE FURNISHERS

## Furniture Contractors
## &
## Interior Decorators

**1847, Sadashiv Peth, Date Wadi**

Poona 30.

विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून जमा झालेल्या रु. ५१२ या रकमेत प्राध्यापकवर्गाने ५० रुपये घातले आणि या रकमेतून विकत घेतलेल्या वस्तू जवानांना देण्यात आल्या.

अ. मि. सांबे, जनरल सेक्रेटरी

विद्यार्थी संघटनेच्या मार्गदर्शक प्राध्यापकांखेरीज प्रा. नांदेडकर आणि प्रा. मिवार यांचीही बहुमोल मदत झाली.

आमचे प्राचार्य, उपप्राचार्य व प्राध्यापकवर्ग यांनी मार्गदर्शन केले त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

प्रा. सी. रा. रायकर, अध्यक्ष

## विद्यार्थि-क्रीडा विभाग

या वर्षी आमच्या महाविद्यालयाने आंतरमहाविद्यालयीन सामन्यांतील एकूण २४ विविध स्पर्धांमध्ये हिरिरीने भाग घेतला. गेल्या वर्षी म्हणजे महाविद्यालयाच्या स्थापनेच्याच वर्षी आम्ही १८ स्पर्धांमध्ये भाग घेतला होता, त्यापेक्षा सहा जादा खेळांची या वर्षी सोय करण्यात आली. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आपल्या सर्वांगीण व शारीरिक विकासासाठी मैदानी स्पर्धांमध्ये भाग घेण्याची संधी देण्याचे आमच्या क्रीडाविभागाचे धोरण आहे. त्यानुसार यंदाचे वर्षी एकूण ४१ विद्यार्थिनींनी ६ स्पर्धांमध्ये व १३६ विद्यार्थ्यांनी १८ स्पर्धांमध्ये भाग घेतला.

वरील स्पर्धांमध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थिनींच्या आंतरमहाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या संघाने अजिंक्यपद मिळविले. महाविद्यालय स्थापन झाल्यानंतर दुसऱ्याच वर्षी असे नेत्रदीपक यश मिळवून आमच्या संघाने आंतरमहाविद्यालयीन क्रीडास्पर्धांमध्ये एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. त्याचप्रमाणे आमच्या विद्यार्थ्यांच्या बॉलबॅडमिंटन संघाने लागोपाठ दुसऱ्यांदा उपविजेतेपद मिळविले आहे. विद्यार्थिनींच्या बॉलबॅडमिंटन संघाची कर्णधार कु. भारती शहा यांची पाँडिचेरी येथे झालेल्या राष्ट्रीय बॉलबॅडमिंटन स्पर्धेसाठी गेलेल्या महाराष्ट्र राज्य बॉलबॅडमिंटन संघामध्ये निवड करण्यात आली.

वैयक्तिक स्पर्धांमध्येसुद्धा आमच्या विद्यार्थ्यांनी स्पृहणीय यश मिळविले. 'नटू मराठे शरीर-सौष्ठव स्पर्धे'मध्ये आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. सी. एम्. गोडबोले यांनी त्यांचे गटात प्रथम प्रावीण्य मिळविले. तसेच दूर मारण्याच्या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत श्री. उदय लागू यांना तिसरा क्रमांक मिळाला. श्री. सी. एम्. गोडबोले यांनी वजन उचलण्याच्या स्पर्धेत व मुष्टियुद्धात फेदरवेट गटामध्ये उपविजेतेपद संपादन केले.

पुणे विद्यापीठाच्या आंतरमहाविभागीय सामन्यांसाठी आमच्या महाविद्यालयातील पुढील विद्यार्थि-विद्यार्थिनींची निवड करण्यात आली :—

कु. संध्या देव — खोखो
श्री. एस्. आर. जाधव — कबड्डी
श्री. एस्. डी. भुजबळ — व्हॉलिबॉल
श्री. सी. एम्. गोडबोले — वजन उचलणे

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या क्रीडाविषयक सहकार्याचाही उल्लेख केल्याशिवाय हा अहवाल पूर्ण होणार नाही. प्रा. पद्माकर आपटे यांची पुणे विभागाच्या जिम्नास्टिक्स व मल्लखांब स्पर्धेच्या निवड समितीवर व त्याचप्रमाणे शारीरिक शिक्षण-विभाग-प्रमुख श्री. सिधये यांची टेबलटेनिस स्पर्धेच्या निवडसमितीवर सभासद म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच प्रा. आपटे हे पिंपळगाव बसवंत येथे झालेल्या आंतरविभागीय मल्लखांब स्पर्धेसाठी पुणे विभागाच्या संघाचे व्यवस्थापक होते.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांशिवाय महाविद्यालयांतर्गत आंतरवर्गीय सामने या वर्षीचे द्वितीय सत्रात घेण्यात आले. एकूण ६४२ विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. या सामन्यांमध्ये दिसून आलेली चुरस व खेळाडूवृत्ती यांसाठी सर्व स्पर्धक कौतुकास पात्र आहेत.

आमचे प्राचार्य व इतर प्राध्यापकवर्ग यांनी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

श्री. उदय लागू, (विद्यार्थि-क्रीडाप्रतिनिधी)
कु. शैलजा कुलकर्णी, (विद्यार्थिनी-क्रीडाप्रतिनिधी)

प्रा. स. य. गंभीर, (कार्याध्यक्ष)

# आंतरमहाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन स्पर्धा

## अरुण सिधये

आंतर महाविद्यालयीन बॉलबॅडमिंटन स्पर्धेत यंदा 'मॉडर्न'ला अजिंक्यपद मिळाले आणि 'मॉडर्न'मध्ये सगळ्यांना मोठा आनंद झाला. दाक्षिणात्यांत विशेष लोकप्रिय असलेल्या या खेळात पुण्यातील इतर महाविद्यालयांनी चांगलेच प्रावीण्य संपादन केले होते. परंतु गेल्याच वर्षी सुरू झालेल्या मॉडर्नला अजिंक्यपद मिळालेले पाहून बऱ्याच जणांना आश्चर्य वाटले.

फर्ग्युसन आणि मॉडर्न यांच्यामधल्या चुरशीच्या अंतिम सामन्याने तर अक्षरशः डोळ्यांचे पारणे फिटले. फर्ग्युसनच्या नाणावलेल्या व उत्तम राखलेल्या मैदानावर हा सामना झाला आणि विशेष म्हणजे दोन्ही महाविद्यालयांचे प्राचार्य सामन्याच्या वेळी हजर होते!

फर्ग्युसनने पहिली गेम २९–२६ अशा गुणांनी जिंकली व त्यामुळे त्यांचे नीतिधैर्य उंचावले जाऊन मॉडर्नच्या नवख्या खेळाडूंनी काहीशी दबकतच दुसऱ्या गेमला सुरुवात केली. बघता बघता 'मॉडर्न'च्या खेळाडूंमध्ये सांघिक कौशल्याला बहर आला आणि दुसरी गेम मॉडर्नने २९–२५ वर घेतली. तिसऱ्या गेममध्ये ८–६ गुणांवर आघाडी मिळवून फर्ग्युसनला कोर्ट त्यांच्या इच्छेनुसार बदलण्याची संधी मिळाली आणि खेळाला असा काही रंग चढू लागला की, प्रत्येक गुणानंतर उत्कंठा शिगेस पोचली. वाटू लागले की, फर्ग्युसनचा जोर वाढत असून यशःश्री फर्ग्युसनच्याच गळ्यात माळ घालणार! १९ व्या गुणावर दुसऱ्यांदा फर्ग्युसनला पुन्हा एकदा कोर्ट बदलण्याची संधी मिळाली तेव्हा तर नक्कीच पारडे फर्ग्युसनकडे झुकले होते!

पण या वेळी मागे पडलेला मॉडर्नचा संघ सर्व शक्तीनिशी प्रतिस्पर्ध्यावर हल्ले चढवीत होता. सेंटर खेळणारी भारती शहा हिच्या खेळाला धार चढत होती. इतका वेळ बचावात्मक खेळणारी शहा आता जोरदार फटके आणि अप्रतिम प्लेसिंग करीत होती. याचाच परिणाम की काय मॉडर्नच्या इतर खेळाडूंना स्फुरण चढले. आणि इतके वेळ बचकत खेळणारी सुरेखा वाळवेकर हिने सर्व हल्ले यशस्वीरीत्या परतवून प्रेक्षकांकडून शाबासकी मिळवली. याचा परिणाम म्हणून मॉडर्नने परत २०–१७ गुणांवर आघाडी मारली. यावेळी सर्व्हिस फर्ग्युसन कॉलेजकडे होती. त्यांनी लागोपाठ ५ गुण मिळवून २२–१७ वर परत एकदा प्रथम कोर्ट बदलून "हॅट्रिक" केली. व १७–२२ वर मॉडर्नला सर्व्हिस करण्याची संधी मिळाली.

आतापर्यंत शांतपणे खेळणाऱ्या माधुरी हळवे, विद्या देऊसकर आणि शैला कुलकर्णी यांनी उत्तम सर्व्हिसेस करून २५–२३ अशी आघाडी मारली. त्यांना भारती शहा, आणि सुरेखा वाळवेकर यांनी उत्तम साथ दिली. २५–२३ गुणांवर शेवटची सर्व्हिस मॉडर्नच्या भारती शहाची होती. वाटले आता मॅच जिंकली. पण अजून काही वेगळेच घडावयाचे होते. शेवटच्या सर्व्हिसवर फक्त ३ गुणच मिळाले आणि २८–२३ च्या गुणसंख्येवर हातातोंडाशी आलेला विजय परत फार दूर गेला. "विजयश्री खरोखर फारच चंचल असते." ते या वेळी प्रत्ययास आले. फक्त एकच गुण मॅच जिंकण्यास आवश्यक होता. पण घाईमुळे ते साध्य झाले नाही. उलट अति अवघड होऊन बसले. कारण आता सर्व्हिस करण्याची पाळी फर्ग्युसनची होती, आणि फक्त ६ गुणांची अवश्यकता होती. आणि तब्बल ५ सर्व्हिसेस शिल्लक होत्या. विजय फर्ग्युसनचाच ? पण !!! यावेळी आवश्यकता होती ती एकाग्र चित्ताची, संयमाची व आत्मविश्वासाची. नेमक्या याच वेळी पहिल्या तीन सर्व्हिसेस फेकणाऱ्या घोडचुका आणि याच वेळी देऊसकर व हळवे यांनी प्रतिस्पर्ध्यावर जोरदारपणे चढविलेले हल्ले यामुळे एकूण ५ सर्व्हिसेस करून फर्ग्युसनला फक्त एकच गुण मिळाला आणि मॉडर्नला २८–२४ वर परत एकदा मॅच जिंकण्याची संधी मिळाली.

शेवटच्या एका गुणाकरितादेखील तीन सर्व्हिसेसची किंमत द्यावी लागली. आणि शेवटी कुलकर्णीच्या सर्व्हिसवर एक गुण मिळवून हा दीर्घ काळ ( जवळ जवळ १॥ ते १॥। तास ) चाललेला अंतिम सामना संपला. सामना जरी संपला तरी खेळ उत्तम झाल्यामुळे व दोन्ही संघांनी आपापले प्रकट केलेले कौशल्य त्यामुळे हा सामना बरेच काळ लक्षात राहील व दोन्ही संघ कौतुकास पात्र राहतील. खेळ जिंकणे किंवा हरणे हे महत्त्वाचे नसून सामना कशा रीतीने खेळला गेला हे महत्त्वाचे असते, आणि त्या दृष्टीने हा एक उत्तम सामना बघण्याचे समाधान मिळाले.

## नियोजन चर्चामंडळ व वाणिज्यमंडळ

